पुणे, बुधवार, १८ जुन २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 200 • वर्ष ४ थे, अंक २०० • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News



बेशिस्त वाहन चालकांवर बिनधास्त तक्रार

P३



१२ सातारा वॉरियर्सचा रत्नागिरी जेट्सवर विजय

## At a Glance

### उबाठाची एमआयएमशी युती?

**छ. संभाजीनगर :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि एमआयएमचे माजी खासदार तथा महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील यांच्यातील वाढत्या जवळिकीने शिवसेनेच्या गोटात खळबळ उडाली आहे. राज्याचे सामाजिक न्याय तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी 'उबाठा' एमआयएमसोबत जाणार असा दावा माध्यमांशी बोलताना केला. यावरून आता दोन्ही » पान ७ वर

### नागपूरमध्ये फार्मा कंपनीत स्फोट

**नागपूर :** नागपूर जिल्ह्यातील एका फॉर्मा कंपनीत स्फोट झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेत एकाचा मृत्यू झाला असून सहा जखमी झाल्याचं सांगण्यात येतं आहे. मिळालेल्या माहितीनुसार, नागपूर जिल्ह्यातील भिलगाव येथील फार्मा कंपनीच्या युनिटमध्ये मंगळवारी स्फोट झाला. या स्फोटात एकाचा मृत्यू झाला तर सहा जण जखमी झाले आहेत, » पान ७ वर

# मध्य पूर्वेतील संघर्षाने चिंता

## तेल आणि वायूचा पुरवठा विस्कळीत होण्याची भीती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** इराण आणि इस्रायलमधील युद्धाच्या पार्श्वभूमीवर भारताची चिंताही वाढू लागली आहे. हे युद्ध लांबले तर भारताला होणारा तेल आणि वायूचा पुरवठा विस्कळीत होऊ शकतो. परिस्थिती गंभीर झाल्यास इराण होर्मुजसामुद्रधुनी बंद करू शकतो, अशी भीतीही व्यक्त केली जात आहे. हा सागरी मार्ग आहे ज्याद्वारे जगभरात तेल आणि वायूचा पुरवठा केला जातो. ते बंद झाल्याने भारतातील पुरवठ्यावरही परिणाम होणार आहे. या पार्श्वभूमीवर भारताने पर्यायी मार्गांचा शोध सुरू केला आहे. दक्षिण आफ्रिका देश आणि इतर पर्यायांवर भारताची नजर खिळली आहे.

होर्मुझची सामुद्रधुनी हा एक सागरी मार्ग आहे. हे पर्शियन आखात आणि ओमानचे आखात यांना जोडते. पर्शियन आखातातून मोकळ्या समुद्रात जाण्याचा हा एकमेव मार्ग आहे. होर्मुझ आणि पर्शियाच्या सामुद्रधुनीतून दररोज सुमारे २० दशलक्ष बॅरल कच्चे तेल जाते. सौदी अरेबिया, इराक, कुवैत यांसारख्या देशांकडून भारत या मार्गाने तेल खरेदी करतो. या मार्गावर इराणचे नियंत्रण आहे. इराण आणि इस्रायलमध्ये युद्ध सुरू झाल्यापासून तेल मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत. ईटीच्या रिपोर्टनुसार, तेलपुरवठ्यात व्यत्यय आणि तेलाच्या वाढत्या किमती मध्ये कोणते मार्ग अवलंबले जाऊ शकतात हे पाहिले जात आहे. इराणने होर्मुजसामुद्रधुनी बंद केल्यास भारताच्या ४० टक्के कच्च्या तेलावर आणि ५४ टक्के द्रवरूप नैसर्गिक वायूच्या (एलएनजी) पुरवठ्यावर परिणाम होईल.

मात्र, इराण हा मार्ग बंद करणार नाही, अशी आशा भारतीय रिफायनरी आणि गॅस कंपन्यांना आहे. असे असूनही आणीबाणीच्या तयारीची कमतरता नाही. याची दोन प्रमुख कारणे आहेत, असे केल्यास इराण आणि इतर आखाती देशांना होणारा गॅस आणि तेलाचा पुरवठा विस्कळीत होईल. याशिवाय इराणचे हे पाऊल थेट अमेरिकेशी संघर्षाला आमंत्रण देऊ शकते. एवढे असूनही हा रस्ता बंद केल्यास समस्या वाढणार आहे. इराणने हा मार्ग बंद केल्यास जगभरातील तेल » पान ७ वर

### साठवण क्षमता ७४ दिवसांची

• तेल मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, देशात कच्च्या तेलाची आणि पेट्रोलियम पदार्थांची साठवण क्षमता ७४ दिवसांच्या राष्ट्रीय वापराएवढी आहे. यात ९.५ दिवसांची मागणी पूर्ण करण्यासाठी स्ट्रॅटेजिक रिझर्व्हचाही समावेश आहे. रिफायनरी, पाईपलाईन, प्रॉडक्ट डेपो तसेच रिकाम्या टाक्यांमध्ये हा साठा आहे. मात्र, एवढं सगळं होऊनही पुरवठ्याची कमतरता भासली तर समस्या निर्माण होण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही, असं अधिकाऱ्यांचं म्हणणं आहे.

# केंद्र सरकारने नेमली उच्चस्तरीय चौकशी समिती

## केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** अहमदाबादमधील एअर इंडिया विमान अपघाताच्या चौकशीसाठी केंद्र सरकारने उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे. केंद्रीय गृह सचिव यांच्या अध्यक्षतेखालील ही समिती ३ महिन्यांत आपला अहवाल सादर करेल, असं केंद्रीय हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आज मंगळवारी सांगितलं. पुण्यात ते आज पालखी मार्गाची पाहणी करण्यासाठी पोहोचले होते, तेव्हा त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

**अहमदाबाद दुर्घटना**

अहमदाबादमध्ये गेल्या आठवड्यात एअर इंडियाचं विमान कोसळलं. या विमानात २४२ प्रवासी होते. त्यापैकी फक्त एकच व्यक्ती जिवंत राहिली. या अपघातात विमानातील इतर सर्व लोकांचा मृत्यू झाला. या विमानात गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी हे देखील होते, त्यांचाही मृत्यू झाला. हे विमान अहमदाबादहून लंडनला जात होते. अहमदाबाद विमानतळावरून उड्डाण केल्यानंतर काही वेळातच विमानाला अचानक अपघात झाला. आता या अपघातामागील कारणं तपासली जात आहेत. यासाठी केंद्रसरकारने केंद्रीय गृह सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक उच्च स्तरीय समिती नेमली आहे. याबाबत आज केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी माहिती दिली.

"एअर इंडियाकडे ३४ बोईंग ड्रीमलायनर विमाने आहेत. या सर्व ३४ विमानांची चौकशी आणि तपासणी करण्याचे आदेश दिले आहेत. ३४ विमानांपैकी १० ते १२ विमानांची तपासणी पूर्ण झाली असून अजून त्यात काही आढळून » पान ७ वर

# एअर इंडियाचे दुष्टचक्र सुरूच

## तांत्रिक त्रुटीमुळे लंडनकडे जाणारी फ्लाइट रद्द

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**अहमदाबाद :** अहमदाबादहून लंडनकडे जाणारी एअर इंडिया एआय-१५९ ही आंतरराष्ट्रीय विमान सेवा मंगळवारी अचानक रद्द करण्यात आली. या निर्णयामागे विमानात उड्डाणापूर्वी आढळलेल्या तांत्रिक बिघाडाचे कारण असल्याचे सांगण्यात आले आहे. ही फ्लाइट अहमदाबादच्या सरदार वल्लभभाई पटेल आंतरराष्ट्रीय विमानतळावरून दुपारी १.१० वाजता लंडन गॅटविककडे रवाना होणार होती. मात्र, टेकऑफच्या काही तास आधीच इंजिन संबंधित यंत्रणेत तांत्रिक अडचण आढळून आली. त्यामुळे प्रारंभी दोन तासांचा विलंब जाहीर करण्यात आला. तथापि, यंत्रणेतील बिघाड गंभीर असल्याचे समजल्यानंतर अखेरीस फ्लाइट रद्द करण्यात आली.

या घटनेमुळे प्रवाशांमध्ये प्रचंड नाराजी पसरली. प्रवाशांच्या म्हणण्यानुसार, त्यांना वेळेवर न समजावून सांगितल्यामुळे संभ्रम निर्माण झाला. सुरुवातीला केवळ विलंबाची माहिती देण्यात आली होती, पण नंतर अचानक विमान रद्द झाल्याचे सांगितल्यामुळे अनेक प्रवासी अस्वस्थ झाले. एअर इंडियाकडून पर्यायी फ्लाइट किंवा हॉटेलमध्ये थांबण्याची स्पष्ट माहितीही दिली गेली नाही, असा आरोप काही प्रवाशांनी केला आहे.

एआय-१५९ ही सेवा बोईंग ७८७-८ ड्रीमलाइनर या प्रगत तंत्रज्ञानाने सज्ज असलेल्या विमानाद्वारे दिली जाणार होती. विशेष म्हणजे, काही दिवसांपूर्वी याच मार्गावर एआय-१७१ या विमानाच्या अपघाताची घटना घडली होती. त्यामुळे आधीच चिंता व्यक्त केली जात होती. आता या तांत्रिक बिघाडामुळे प्रवाशांच्या सुरक्षेबाबत आणि एअर इंडियाच्या देखभाल व्यवस्थेवर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

दरम्यान, एअर इंडियाकडून अद्याप या प्रकरणाबाबत अधिकृत निवेदन जारी करण्यात आलेले नाही. प्रवाशांना परतावा कधी मिळणार, किंवा पुढील प्रवासाची काय सोय केली जाणार, याबाबतही अनिश्चितता आहे. त्यामुळे या घटनेमुळे » पान ७ वर

### इंडिगोच्या विमानात बॉम्ब असल्याची धमकी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** विमानात बॉम्बची धमकी दिल्याची आणखी एक घटना समोर आली आहे. हे विमान कोचीहून दिल्लीला जात होते. बॉम्बची धमकी मिळाल्यानंतर हे विमान नागपुरात उतरले. मिळालेल्या माहितीनुसार, हे विमान इंडिगो एअरलाइन्सचे होते. गेल्या पाच दिवसांत विमानाला बॉम्बची धमकी देण्याची ही तिसरी घटना आहे. याआधी सोमवारी लुफ्थान्सा एअरलाइन्सच्या विमानालाही बॉम्बस्फोटाची धमकी देण्यात आली होती. हे विमान जर्मनीहून हैदराबादला येत होते. त्याचवेळी शुक्रवारी फुकेटहून उड्डाण करणाऱ्या एअर इंडियाच्या विमानालाही बॉम्बस्फोटाची धमकी देण्यात आली होती. यानंतर हे विमान फुकेत विमानतळावर परत उतरले.

इंडिगो एअरलाइन्सचे विमान नागपूर विमानतळावर » पान ७ वर

# शेतीसाठी एआय धोरण मंजूर

## मंत्रिमंडळ बैठकीत १० मोठे निर्णय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी (१७ जून) मंत्रालयात राज्य सरकारची मंत्रिमंडळाची बैठक संपन्न झाली. या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह मंत्री उपस्थित होते. आजच्या बैठकीत शेती, धारावी पुनर्विकास प्रकल्प, मुंबई मेट्रो प्रकल्प, विरार-अलिबाग प्रकल्प आणि अनिवासी भारतीयांच्या मुलांच्या बाबतीत १० मोठे निर्णय घेण्यात आले. महाराष्ट्र कृषि-कृत्रिम बुद्धिमत्ता महाॲग्री-एआय धोरण २०२५-२९ मंजूर करण्यात आले आहे. तर अनिवासी भारतीयांच्या मुलांना, पाल्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश मिळणार आहे.


ट्रायबल इंडस्ट्रियल क्लस्टरसाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास नाशिक जिल्ह्यातील मौजे जांबुटके येथील २९ हेक्टर ५२ आर जमीन. आदिवासी समाजातील होतकरू उद्योजकांना प्रोत्साहन, रोजगारनिर्मिती व आर्थिक विकासास चालना मिळणार. (महसूल विभाग)

एमएमआरडीए आणि मेसर्स रायगड पेण ग्रोथ सेंटर लि. यांच्या संयुक्त प्रकल्पासाठी आवश्यक जमिनीवरील मुद्रांक शुल्कात सवलत. सार्वजनिक, खासगी भागिदारीतून हा राज्यातील पहिलाच मोठा प्रकल्प. ग्रोथ सेंटरमुळे विदेशी गुंतवणूक आकर्षित होणार. (महसूल विभाग)

मुंबईतील महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठासाठी आवश्यक मौजे पहाडी गोरेगाव येथील जमिनीच्या हस्तांतरणावरील मुद्रांक शुल्क माफ. विद्यापीठाला स्व-मालकीची इमारत मिळणार. हजारो » पान ७ वर

### सोनू सूद-उर्वशी रौतेलाची ईडी चौकशी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** ईडीने बेटिंग ॲप्स प्रमोट प्रकरणी सोनू सूद, उर्वशी रौतेला यांची चौकशी केलीय. यामध्ये काही क्रिकेटर्स हरभजन सिंह, सुरेश रैना, युवराज सिंहचे नाव देखील समोर आले आहे. बेकायदेशीर ऑनलाईन बेटिंग ॲप्स संबंधित ईडीने आपला तपास आणखी वाढवला आहे. ईडी अधिकाऱ्यांनी अभिनेता सोनू सूद, अभिनेत्री उर्वशी रौतेलाची चौकशी केल्याची माहिती समोर आलीय. माजी भारतीय क्रिकेटर हरभजन सिंह, युवराज सिंह, सुरेश रैना यांची देखील चौकशी झाली. बेटिंग ॲप्सचा प्रचार करण्यासंदर्भात त्यांना प्रश्न विचारण्यात आल्याचे » पान ७ वर

संधीसाधूपणा करणाऱ्यांसोबत जाणार नाही - शरद पवार

# राष्ट्रवादीसोबत युती करण्याला पूर्णविराम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्राच्या राजकारणात दोन मोठ्या युती होणार असल्याची चर्चा रंगली आहे. शिवसेना ठाकरे गटाचे सर्वेसर्वा उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे एकत्र येणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहेत. तर दुसरीकडे राष्ट्रवादीचे पवार गटाचे सर्वेसर्वा शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार एकत्र येणार असल्याच्या चर्चा सुरु होत्या. मात्र आता या चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे. संधीसाधूपणा करणाऱ्यांसोबत जाणार नाही, असे शरद पवारांनी म्हटले आहे. त्यावर आता अजित पवारांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे.

पिंपरी चिंचवडमध्ये राष्ट्रवादीचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी शरद पवार यांनी अजित पवारांसोबत जाण्याच्या चर्चांवर स्पष्ट वक्तव्य केले. "अनेक लोक वेगळ्या विचाराचे आहेत. कुणी तरी आता म्हणालं सर्वांना बरोबर घ्या. सर्वांना बरोबर घ्यायला हरकत नाही. पण सर्व म्हणजे कोण? गांधी, नेहरू यांचा विचार आणि फुले, शाहू, आंबेडकरांचा विचार मानत असेल तर त्यांनासोबत घेणं मान्य आहे. पण सत्तेसाठी भाजपसोबत जाऊन बसायचं ही भूमिका कुणी मांडत असेल तर हा काँग्रेसचा विचार नाही. » पान ७ वर

### कोण गेला त्याची चिंता करू नका

"काही लोक गेले. नवीन काही लोक येत आहे. गेले त्यांची चिंता करू नका. अनेक लोक येत आहेत. कोण आला, कोण गेला त्याची चिंता करू नका. लोक शहाणे आहेत. या देशाची लोकशाही नेत्यांमुळे टिकली नाही. सामान्य लोकांच्या सामुदायिक शहाणपण आणि एकीतून लोकशाही टिकली आहे. त्यामुळे सामुदायिक माणसाचं शहाणपण याचा सन्मान करणं आणि त्यासोबत उभं राहण्याचं काम करावं लागेल."

— शरद पवार



### उजनी धरणात ५० टक्के साठा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सोलापूर जिल्ह्यासाठी वरदायिनी असलेल्या उजनी धरणात ५० टक्के पाणीसाठा झाला आहे. भीमा, सीना नदीकाठासह उपसा सिंचन योजनेवरील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. यंदा जून महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात उजनी धरणातील पाणीपातळी ५० टक्के झाली आहे.

उजनी धरणात सोमवारी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास ९०.३० टीएमसी इतका एकूण पाणीसाठा तर २६.६४ टीएमसी इतका उपयुक्त पाणीसाठा होता. त्याची टक्केवारी ४९.७२ इतकी आहे. यंदा मे महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्यापासूनच उजनी धरण परिसरात पावसाने दमदार बॅटिंग केल्याने धरण ५० टक्के भरले. दौंडमधून उजनीत ११ हजार ७१९ क्यूसेकने पाणी येत » पान ७ वर

# ठग लाईफ चित्रपट प्रकरणी सर्वोच्च नाराजी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** दिग्दर्शक मणिरत्नम आणि अभिनेता कमल हासन यांचा 'ठग लाईफ' चित्रपट कर्नाटकात प्रदर्शित न झाल्याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी (दि. १७) तीव्र नाराजी व्यक्त केली. या प्रकरणी राज्य सरकारने बुधवारपर्यंत उत्तर दाखल करावे, असे निर्देश देत कर्नाटक उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या चित्रपट निर्मात्याची याचिका स्वतःकडे हस्तांतरित केली. पुढील सुनावणी गुरुवार, १९ जून २०२५ रोजी होईल, असे न्यायमूर्ती मनमोहन आणि न्यायमूर्ती भुयान यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले.

एखाद्याने विधान केले असेल तर तुम्ही त्याचे प्रतिवाद दुसऱ्या विधानाने करा. तुम्ही थिएटर जाळण्याची धमकी देऊ शकत नाही. कर्नाटक आणि बंगळूरमधील सुज्ञ लोकांना अभिनेते कलम हसन यांचे विधान चुकीचे वाटत असेल तर ते याबाबत आपले मत मांडू शकतात. चित्रपटगृहे जाळण्याची धमकी कशी काय दिली जाते, असा सवाल करत कर्नाटकातील लोकांना कमल हासन यांच्या मताबाबत असहमत राहण्याचे स्वातंत्र्य आहे, परंतु मूलभूत हक्कांचे रक्षण केले पाहिजे, अशा शब्दांमध्ये कमल हसन यांच्या ठग लाईफ चित्रपटावरील » पान ७ वर

# रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सिंधुदुर्ग जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** गेल्या काही दिवसांपासून मुंबईसह राज्यभरात पुन्हा एकदा मान्सून सक्रिय झालाय. भारतीय हवामान विभागाकडून देण्यात आलेल्या अंदाजानुसार पुढील २४ तासांकरिता रत्नागिरी, पुणे घाट, सातारा घाट, कोल्हापूर घाट, सिंधुदुर्ग जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आलाय. राज्यात मागील २४ तासांमध्ये (मंगळवारी सकाळपर्यंत) मुंबई उपनगर जिल्ह्यात ८३.४ मिमी पाऊस झालाय. तर ठाणे जिल्ह्यात ७३.७ मिमी, मुंबई शहर ६२.९ मिमी, रायगड ५४.१ मिमी आणि पालघर जिल्ह्यात ४९.७ मिमी इतक्या सर्वाधिक पावसाची नोंद झाली आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातील जगबुडी नदी इशारा पातळीवर आहे. जिल्हा प्रशासनामार्फत नागरिकांना सतर्क राहाण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. रत्नागिरी येथे मुंबई-गोवा महामार्गावरील खेड तालुक्यातील वळंजवडी येथे महामार्गावर १०० मीटर परिसरात भेगा पडल्याने या महामार्गावरील वाहतूक एकेरी मार्गावरून सुरू आहे. सातारा जिल्ह्यातील पाटण-चिपळूण राष्ट्रीय महामार्गावर वाहतुकीसाठी केलेला पर्यायी रस्ता पाण्याखाली जाऊन खचल्याने वाहतूक बंद करण्यात आलीय. दुचाकी आणि चार चाकी वाहतूक नेरळे-माणगाव-मणेरी-चाफेर-संगमनगर धक्का मार्गे कोयनानगर अशी वळवण्यात आलीय.

मुंबई उपनगर » पान ७ वर

# संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी समन्वय आवश्यक - जिल्हाधिकारी

**व्यवस्थापन**

### जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांचे निर्देश

आपत्ती व्यवस्थापनाच्यादृष्टीने जिल्ह्यातील धोकादायक तसेच अतिधोकादायक जुने पुल, साकव, रस्ते, इमारती, वाडे, जाहिरात फलके, रेल्वे पुलाचे येत्या ७ दिवसांत बांधकाम तपासणी (स्ट्रॅक्चरल ऑडिट) करुन त्याबाबतचा अहवाल जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडे सादर करावा.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मावळ तालुक्यातील कुंडमळा येथे घडलेली दुर्घटना आणि त्यात झालेले ४ पर्यटकांचा मृत्यू हे अतिशय दुर्दैवी आहेत. नागरिकांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देऊन संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी सर्व यंत्रणांनी एकत्रितपणे काम करावे. आपत्तीच्या काळात जिल्हा प्रशासनाच्यावतीने जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या कामकाज आढावा बैठकीत जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती



व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष जितेंद्र डूडी यांनी दिले. या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक ग्रामीण संदीप गिल, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी विठ्ठल बनोटे आदी उपस्थित होते.

जितेंद्र डुडी म्हणाले, आपत्ती व्यवस्थानाच्यादृष्टीने जिल्ह्यातील धोकादायक तसेच अतिधोकादायक जुने पुल, साकव, रस्ते, इमारती, वाडे, जाहिरात फलके, रेल्वे पुलाचे येत्या ७ दिवसांत बांधकाम तपासणी (स्ट्रॅक्चरल ऑडिट) करुन त्याबाबतचा अहवाल जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडे सादर करावा, परिक्षणात धोकादायक असलेले पुल, साकव, इमारती, वाडे, जाहिरात फलके काढून घ्यावेत, कार्यवाही करतांना नागरिकांची गैरसोय होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी, जिल्ह्यातील धोकदायक ठिकाणांची पाहणी करुन जागा निश्चिती करावी. त्याची विविध माध्यमांद्वारे » पान ७ वर

### पालखी सोहळ्यासाठी सूचना

• येत्या काळात जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज आणि संतश्रेष्ठ संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यास सुरुवात होणार आहे, यापार्श्वभूमीवर रत्याच्याकडेला असलेली अनाधिकृत जाहिरात फलके तसेच धोकदायक वृक्षे काढून घ्यावीत, सर्व रस्त्यांना बाजुला पट्टे भरुन घ्यावेत. रस्त्यावर वाहतूकीस होणाऱ्या अडथळा लवकरात लवकर करण्याची कार्यवाही करावी, असे निर्देश डुडी यांनी दिले.

## अझीम प्रेमजी फाउंडेशन कडून 'हेल्थ इक्विटी फेलोशिप'

**पुणे :** अझीम प्रेमजी फाउंडेशनने 'अझीम प्रेमजी हेल्थ इक्विटी फेलोशिप' जाहीर केली आहे. ही फेलोशिप १८ महिन्यांची असून, पदव्युत्तर डॉक्टरांसाठी एक सखोल आणि प्रत्यक्ष अनुभव देणारी शिकण्याची मोठी संधी आहे. ही फेलोशिप अझीम प्रेमजी फाउंडेशन आणि देशभरातील ११ प्रतिष्ठित आरोग्य संस्थांच्या संयुक्त प्रयत्नातून राबवली जात आहे.

या कार्यक्रमाअंतर्गत फेलोशिपधारकांना ग्रामीण भागातील रुग्णांसोबत प्रत्यक्ष काम करण्याचा अनुभव मिळणार आहे. विविध रुग्णप्रकारांच्या हाताळणीचा सराव आणि वरिष्ठ डॉक्टरांकडून मार्गदर्शन यामुळे फेलोजना प्रभावी क्लिनिकल कौशल्ये आणि समुदायातील आरोग्यविषयक अनुभव मिळणार आहे. ही फेलोशिप स्वीकारल्यास फेलोजना आरोग्यसेवेच्या आघाडीच्या पातळीवर प्रत्यक्ष कामाचा मौल्यवान अनुभव मिळणार आहे. आरोग्य क्षेत्रातील विषमतेची कारणे आणि अडथळे समजून घेण्याची संधी या फेलोशिपमुळे मिळेल. अनुभवी तज्ज्ञ आणि स्थानिक समुदायासोबत मिळून परिणामकारक उपाययोजना राबवण्याची संधीही मिळू शकते. शिवाय आरोग्य क्षेत्रात दीर्घकालीन बदल घडवण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या तत्पर व्यक्तींच्या नेटवर्कचा भाग होण्याची संधीही साधता येणार आहे.

## कात्रज घाटात कारवाईत गावठी पिस्तुले व जिवंत काडतुसे जप्त

**पुणे :** कात्रज घाट परिसरात संशयास्पद हालचाली करणाऱ्या तीन तरुणांकडून पोलिसांनी गावठी पिस्तुले, मॅगझिन आणि जिवंत काडतुसे असा शस्त्रसाठा जप्त करत मोठी कारवाई केली आहे. गुन्हे शाखेच्या युनिट दोनच्या 'कॉप्स २४' पथकाने ही कारवाई करत दोघांना अटक केली असून, एका अल्पवयीन मुलाला ताब्यात घेण्यात आले आहे. एकूण तीन लाख रुपये किमतीचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे. ही कारवाई १५ जून रोजी सायंकाळी कात्रज घाटात करण्यात आली. गुन्हे शाखेचे पोलिस अंमलदार कृष्णा म्हस्के आणि सौरभ साळवे हे गस्त घालत असताना लक्ष्मी गॅरेजसमोर तीन तरुण एका दुचाकीवर संशयास्पद हालचाली करताना दिसले. पोलिसांनी विचारपूस करण्याचा प्रयत्न केला असता, तरुणांनी पळ काढण्याचा प्रयत्न केला. तत्काळ पाठलाग करत त्यांना ताब्यात घेण्यात आले. झडती घेतल्यावर त्यांच्या कमरेजवळ लपवलेली तीन गावठी पिस्तुले, दोन अतिरिक्त मॅगझिन, नऊ जिवंत काडतुसे, तीन मोबाईल आणि एक दुचाकी असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणात अनिकेत संजय मालपोटे (वय २२, रा. सुतारदरा, दत्तनगर, कोथरूड) आणि निखिल मुकेश तुसाम (वय १९, रा. केळेवाडी, कोथरूड) यांना अटक करण्यात आली आहे. तसेच एका अल्पवयीन मुलाला ताब्यात घेण्यात आले आहे.



## प्रतिपंढरपूर विठ्ठल-रुक्मिणी उड्डाणपूल' नाव द्या : कांबळे

**पुणे :** सिंहगड रस्त्यावर उभारलेल्या उड्डाणपुलाला 'प्रतिपंढरपूर विठ्ठल-रुक्मिणी उड्डाणपूल' नाव देण्याची मागणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संघर्ष समिती महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष शशिकांत कांबळे यांनी केली. कांबळे यांनी सोमवारी (ता. १६) पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवलकिशोर राम यांना या मागणीचे निवेदन दिले. प्रसंगी माजी नगरसेवक काकासाहेब चव्हाण, सामाजिक कार्यकर्ते नितीन हनमघर, शरद दबडे, विकास कांबळे, सागर गायकवाड, संघदीप शेलार आदी उपस्थित होते.

शशिकांत कांबळे म्हणाले, "सिंहगड रस्त्यावर राजाराम पूल ते फनटाईम थिएटरपर्यंत उभारलेल्या उड्डाणपुलामुळे वडगाव धायरी, आनंदनगर, नांदेड सिटी, नऱ्हे-आंबेगाव, किरकटवाडी, सिंहगड किल्ल्याकडे जाणाऱ्या प्रवाशांची मोठी सोय झाली आहे. याबद्दल राज्य शासन, पुणे महानगरपालिका व स्थानिक पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करतो. सिंहगड रस्त्यावरील विठ्ठलवाडी येथे प्राचीन विठ्ठल-रुक्मिणी मंदिर असून, या धार्मिक स्थळाला प्रतिपंढरपूर म्हणून ओळखले जाते. एकादशीच्या व आषाढी वारीच्या निमित्ताने लाखो भाविक येथे येत असतात. हा उड्डाणपूल याच भागातून जात असल्याने या पुलाला 'प्रतिपंढरपूर विठ्ठल-रुक्मिणी उड्डाणपूल' असे नाव द्यावे, अशी आमची मागणी आहे."

तसेच या उड्डाणपुलावरून सुरक्षित वाहतुकीच्या दृष्टीने अवजड वाहनांना बंदी घालण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी केली.

## हडपसर टपाल कार्यालय पाण्याच्या विळख्यात

**हडपसर :** गेली काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे गाडीतळ येथील बंटर शाळेच्या आवारातील टपाल कार्यालयाभोवती प्रत्येकवेळी पाण्याचा विळखा पडत आहे. याठिकाणी विविध कामानिमित्त येणाऱ्या शेकडो नागरिकांसह कर्मचाऱ्यांनाही येथून कसरत करीत प्रवास करावा लागत आहे.

गेल्या आठवड्यातील पावसाच्या विश्रांतीनंतर दोन दिवसांपूर्वी पुन्हा पावसाने सुरुवात केली आहे. दरम्यान, टपाल कार्यालय परिसरात साठून राहत असलेल्या पाण्याचा निचरा होण्यासाठी कोणतीही उपाययोजना न केल्याने पुन्हा येथे मोठ्याप्रमाणात पाणी साठत आहे. या टपाल कार्यालयात सुमारे तीस कर्मचाऱ्यांसह रोज शेकडो खातेदार येत असतात. त्यामध्ये ज्येष्ठ नागरिक व महिलांची संख्या मोठ्याप्रमाणात आहे. या सर्वांना दूरवर साचलेल्या या पाण्यातून जा-ये करावी लागत आहे. याशिवाय साचलेल्या या पाण्यामुळे रोगराई पसरण्याचा धोकाही वाढला आहे.

# हडपसरमध्ये राजकीय हालचालींना वेग


## माजी नगरसेवकांचा 'सेफ झोन'चा शोध

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीचे वारे जोर पकडू लागले आहेत. येत्या काही दिवसांत निवडणूक जाहीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे राजकीय पक्षांत घडामोडींना वेग आला असून, इच्छुक उमेदवारांनी 'सेफ झोन'ची चाचपणी सुरू केली आहे. विशेषतः हडपसर विधानसभा मतदारसंघात पक्षांतराचे संकेत देणाऱ्या हालचालींनी राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

महापालिकेवर आजवर काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजप यांचे वर्चस्व राहिले आहे. मात्र, आता परिस्थिती झपाट्याने बदलत असल्याने माजी नगरसेवक, स्थानिक नेते, कार्यकर्ते आपापले हितसंबंध जपण्यासाठी नवा राजकीय आश्रय शोधत आहेत. पक्षनिष्ठेपेक्षा निवडणुकीत जिंकण्याच्या शक्यतेला प्राधान्य दिले जात असल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे.

राष्ट्रवादीतील अस्वस्थता, भाजपचा पर्याय?




हडपसर विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) या दोन्ही गटांमधील काही माजी नगरसेवक भाजपमध्ये प्रवेशाच्या तयारीत असल्याची जोरदार चर्चा आहे. काही जणांनी तर प्रत्यक्ष संपर्कही साधल्याची माहिती आहे. भाजप प्रवेश मिळाल्यास आगामी महापालिका निवडणुकीत अधिक सुरक्षित वाटेल, असा यामागचा हेतू आहे.

शरद पवार गटाला लोकसभा निवडणुकीत चांगले यश मिळाल्यानंतर अनेक इच्छुक त्यांच्याकडे झुकले होते. मात्र, विधानसभा निवडणुकीत अपेक्षित यश न मिळाल्याने नाराज माजी नगरसेवकांनी आता भाजपचा पर्याय निवडण्याची तयारी दर्शवली आहे.

दुसरीकडे, अजित पवार गटातील काही नगरसेवकांना पक्षांतर्गत विश्वासार्हतेचा अभाव वाटतोय. त्यामुळे भाजपकडे वळण्याची किंवा दुसऱ्या गटात परतण्याची शक्यता वर्तवली जात आहे. काहीजणांची भूमिका मात्र अजूनही 'वेट अँड वॉच'ची असल्याचे समजते.

शिवसेनेतील बदलते समीकरण

हडपसरमध्ये शिवसेनेच्या माजी आमदारांचा मुलगा भाजपमध्ये जाण्याच्या तयारीत असल्याची चर्चा आहे. मागील निवडणुकीत तिकीट न मिळाल्याने नाराज असले तरी माजी आमदार अद्याप शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) यांच्यासोबत असल्याचे सांगतात. मात्र, पुढील राजकीय कारकीर्द सुरक्षित करण्यासाठी त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनी भाजप किंवा महायुतीच्या इतर घटक पक्षांशी संपर्क वाढविल्याचे बोलले जात आहे.

महापालिकेतील आघाड्यांची अनिश्चितता

महाविकास आघाडीमधील काँग्रेस, राष्ट्रवादी (शरद पवार) आणि शिवसेना (उबाठा) एकत्र निवडणूक लढवतील का? यावर अजूनही स्पष्टता नाही. स्थानिक पातळीवर काँग्रेस आणि राष्ट्रवादीकडून स्वतंत्र लढतीचा सूर उमटत आहे. दुसरीकडे, भाजप, राष्ट्रवादी (अजित पवार) आणि शिवसेना (शिंदे गट) यांच्यातील समन्वयही तितकासा ठोस वाटत नाही.

या साऱ्या अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर अनेक इच्छुक उमेदवारांनी वेगवेगळ्या पक्षांचा पर्याय शोधण्यास सुरुवात केली आहे. भाजपमध्ये प्रवेश घेण्यासाठी इच्छुकांची संख्या वाढत असून, अजूनही काहींना स्पष्ट आश्वासन मिळाले नसल्याने ते सध्या वाट पाहण्याच्या भूमिकेत आहेत.

प्रभाग रचनेचा तिढा



यंदा महापालिकेतील प्रभागांची रचना चार सदस्यीय असण्याची शक्यता आहे. मात्र, कोणता प्रभाग कुणासाठी अनुकूल ठरेल, हे अद्याप स्पष्ट नाही. त्यामुळे इच्छुक उमेदवार प्रभाग रचना, संभाव्य जागा, आणि स्थानिक समीकरणं यांचा बारकाईने अभ्यास करत आहेत.

पुणे महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हडपसर भागात मोठ्या प्रमाणात राजकीय हालचाली सुरू आहेत. पक्षनिष्ठा बाजूला ठेवत अनेकजण निवडणुकीत यश मिळवण्यासाठी आपली पावले नवीन पक्षांकडे वळवत आहेत. त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीत कोण कुठून आणि कोणाच्या पाठिंब्यावर रिंगणात उतरेल, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.



# बिडकरांच्या स्टेट्समुळे चर्चेला उधाण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महापालिका निवडणुकीसाठी प्रभाग रचना करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. प्रशासनाकडून निवडणुकीची तयारी केली जात असताना, दुसरीकडे राजकीय वर्तुळात देखील धुरळा उडायला सुरुवात झाली आहे. उमेदवारी मिळवण्यासाठी मोठी गर्दी झालेल्या सत्ताधारी भाजपमधील घडामोडींकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. महापालिका वर्तुळात मुरलेला पैलवान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या माजी सभागृह नेते गणेश बिडकर यांच्या एका व्हॉट्सॲप स्टेट्समुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आलं आहे.

"पुणेकरांचं नेतृत्व दमदार, गणेश



बिडकर विकासाचे शिलेदार" असा आशय आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बिडकर यांचा फोटो असणारे हे पोस्टर खुद्द गणेश बिडकर यांनीच आपल्या स्टेटसला ठेवले आहे. कार्यकर्त्यांनी देखील लागलीच सोशल मीडियावर व्हायरल केले. त्यामुळे आगामी महापालिका निवडणुकीनंतर भाजप सत्तेत आल्यास बिडकर यांच्याकडे प्रमुख पद येणार असल्याच्या चर्चेला उधाण आलं आहे. नुकतेच शहराध्यक्ष पदाची संधी हुकल्यानंतर पक्ष नेतृत्वाने त्यांना महापालिकेच्या सत्तेतील महत्त्वाचे पद देण्याची कमिटमेंट केल्याची चर्चा आहे.

मध्यंतरी एका कार्यक्रमात कॅबिनेट मंत्री चंद्रकांत पाटील यांनी गणेश बिडकर यांच्याकडे महापालिका निवडणूक प्रमुख पदाची जबाबदारी देण्यात येणार असल्याचे सुतोवाच केले होते. याबद्दल भाजपकडून अधिकृत घोषणा झाली नसली, तरी सध्या पक्षांतर्गत सुरू असणाऱ्या घडामोडींमध्ये बिडकर यांची महत्त्वाची भूमिका दिसत आहे. महापालिका निवडणुकांमध्ये काम करण्याचा अनुभव, मतदार याद्यांपासून ते प्रभाग रचनेपर्यंत असणारा अभ्यास, ग्राउंड मॅनेजमेंटमध्ये तगडी पकड या बिडकर यांच्या जमेच्या बाजू आहेत.

2017 साली महापालिका निवडणुकीत पराभव झाल्यानंतर देखील भाजपने बिडकर यांची स्वीकृत सदस्य म्हणून निवड केली होती. यानंतर महापालिकेच्या इतिहासात पहिल्यांदाच स्वीकृत सदस्याला सभागृह नेते पद मिळाले ते बिडकर यांना. आता होऊ घातलेल्या महापालिका निवडणुकीतील पक्ष रणनीतीमध्ये देखील त्यांची महत्त्वाची भूमिका दिसत आहे. त्यामुळे भाजपाला पुन्हा सत्ता मिळाल्यास बिडकर हे महत्त्वाच्या पदावर असतील, अशी चर्चा रंगू लागली आहे. आजचे त्यांचे स्टेट्स हे याचेच द्योतक असल्याचे दिसत आहे.

# मोहोळ यांनी केली पालखी मार्गाची पाहणी



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्राच्या वारकरी, सांस्कृतिक आणि अध्यात्मिक परंपरेचा शतकानुशतके अविभाज्य भाग असणारे आषाढी वारी सोहळे लवकरच विठुरायाच्या भेटीसाठी मार्गस्थ होत आहेत. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी आणि जगद्गुरु तुकाराम महाराज पालखी सोहळा शुक्रवार, दि. २० जून, २०२५ रोजी आपल्या पुण्यनगरी पुण्यात दाखल होत असून या पालख्यांचे स्वागत परंपरेनुसार मोठ्या उत्साहात व्हावे आणि पालखी सोहळ्यातील सहभागी लाखोंच्या संख्येने येणाऱ्या वारकऱ्यांची सेवा उत्तमरित्या व्हावी, या उद्देशाने आज पुणे शहरातील प्रशासनाच्या वतीने करण्यात आलेल्या व्यवस्थेचा आणि तयारीचा आढावा प्रत्यक्ष पाहणी करुन घेतला.

पालख्यांच्या स्वागतासोबतच वारकऱ्यांसाठी आवश्यक असणाऱ्या सुविधांचा यावेळी आढावा घेत वारकऱ्यांच्या सुरक्षेचे नियोजन, स्वच्छतेची व्यवस्था, आरोग्य यंत्रणांची सज्जता, राहण्याची आणि पार्किंगची व्यवस्था, वाहतूक बदल आणि पालखी मार्गांची वाहतूक व्यवस्था याबाबत विस्तृत माहिती घेत कोणत्याही प्रकारची कमी राहू नये, याबाबत काळजी घेण्याच्या सूचना प्रशासकीय अधिकाऱ्यांना केल्या. तसेच संभाव्य पावसाच्या पार्श्वभूमीवर नियोजन करण्याचेही सूचित केले.

### सविस्तर आढावा

● पुणे महापालिकेची सुरुवात होते त्या विश्रांतवाडी चौकातून या पाहणी दौऱ्याला सुरुवात करत फुलेनगर विसावा, संगमवाडी चौक, पाटील ईस्टेट चौक, सीओईपी परिसर, श्री निवडुंगा विठोबा मंदिर आणि भवानी पेठ पालखी विठ्ठल मंदिर येथे भेट देत पाहणी केली आणि सविस्तर आढावा घेतला.

# पालिकेचा मुलं आणि पालकांसाठी संकल्प

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** लहान मुलं आणि त्यांच्या पालकांच्या कल्याणासाठी कटिबद्ध असलेल्या पुणे महानगरपालिकेने Urban95 अंतर्गत Nurturing Neighbourhoods 2.0 या उपक्रमांतर्गत बहु-क्षेत्रीय समविचार बैठकीचे आयोजन केले. यावेळी पुणे शहराला लहान मुलं व पालकांसाठी अनुकूल शहर बनवण्याच्या दृष्टीकोनाचे अनावरण करण्यात आले आणि कुटुंब-मित्र सार्वजनिक जागांसाठी



डिझाईन मार्गदर्शक तत्त्वांचे प्रकाशन करण्यात आले.

हा उपक्रम गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालय, स्मार्ट सिटी मिशन आणि वॅन लियर फाउंडेशन यांच्या सहकार्याने आणि WRI इंडिया यांच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली राबवला जात आहे. यामध्ये बाल्यावस्थेच्या आरोग्यपूर्ण विकासाला आणि पालकांच्या कल्याणाला चालना देणाऱ्या समावेशक आणि लहान मुलांसाठी अनुकूल शहरी जागा निर्माण करणे हे उद्दिष्ट आहे.

प्रत्येक झोनमध्ये सुरक्षित, समावेशक आणि आकर्षक सार्वजनिक जागा व बालविकास केंद्रांमध्ये प्रवेश सुधारणे आणि वापरात नसलेल्या जागांचा पुनर्वापर करणे यावर भर देण्यात येत आहे. मुलांचं आरोग्य त्यांच्या आजूबाजूच्या वातावरणावर आणि पालकांशी संवादावर अवलंबून असते हे लक्षात घेऊन, लहान मुलांकरिता केंद्रित सार्वजनिक जागा तयार करत आहे

# वसुंधरेसाठी 'वनांचे श्लोक' लोकांपर्यंत पोहोचवा : डॉ. शेषराव पाटील

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** " मनाचे श्लोक सांगून रामदास स्वामी यांनी मनःस्थिती बलवान केली तर 'पर्यावरणविषयक घोषवाक्ये' या पुस्तकातून वनांचे श्लोक मांडून वनाधिकारी रामदास पुजारी यांनी वसुंधरा सुस्थितीत ठेवण्याचा संदेश लोकांपर्यंत पोहचविण्याचा परिपूर्ण प्रयत्न केला आहे. वसुंधरा चांगली राहिली तर मानवी जीवन उत्तम राहिल," असे विचार सेवानिवृत्त प्रधान मुख्य वनसंरक्षक डॉ. शेषराव पाटील यांनी व्यक्त केले. साहित्यविश्व प्रकाशन, पुणेद्वारा सेवानिवृत्त वनाधिकारी रामदास पुजारी लिखित 'पर्यावरणविषयक घोषवाक्ये' या



पुस्तकाचे प्रकाशन पुणे येथील वनभवनात मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी पुण्याचे मुख्य वनसंरक्षक व कुंडल वनप्रबोधिनीचे महासंचालक एन.आर.प्रविण प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच सामाजिक वनीकरण वृत्त, पुणेचे उपवनसंरक्षक पंकज कुमार गर्ग, विभागीय वनाधिकारी राम धोत्रे, माजी मुख्य वनसंरक्षक रंगनाथ नाईकडे, रवी वानखडे, नानासाहेब लडकत, माजी विभागीय वन अधिकारी यशवंत पाटील, बबनराव हगवणे, मनोहर सैंदाणे, सहायक वनसंरक्षक दीपक पवार, श्री. बोंगाळे, लेखक, कवी व माजी सहा. वनसंरक्षक रामदास पुजारी, प्रा. विजय लोंढे, कवी लक्ष्मण शिंदे व साहित्यविश्व प्रकाशनचे संस्थापक विक्रम मालन आप्पासो शिंदे उपस्थित होते.

एन.आर.प्रविण म्हणाले," निसर्गाची सेवा केल्यामुळे लेखकाने या उत्तम पुस्तिकेची निर्मिती केली आहे. कमी शब्दांमध्ये प्रभावी संदेश देण्याचे सामर्थ्य घोषवाक्यांमध्ये आहे. रामदास पुजारी यांचे पुस्तक पर्यावरण जनजागृतीसाठी महत्वपूर्ण राहिल.

# देशभरातील खाद्यप्रेमींना 'कुक्कड़ कार्निवल चिकन फेस्टिव्हल पर्वणी




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आपल्या वैशिष्ट्यपूर्ण आणि चविष्ट बुफे प्रकारांसाठी जगभर प्रसिद्ध असलेल्या रेस्टॉरंट साखळी बार्बिक्यू नेशन तर्फे 'कुक्कड़ कार्निवल - चिकन फेस्टिव्हल' सुरू करण्यात येत असल्याची घोषणा करण्यात आली आहे. देशभरातील खाद्यप्रेमी १० जुलै २०२५ पर्यंत आपल्या जवळच्या बार्बिक्यू नेशन रेस्टॉरंटमध्ये या खास चिकन फेस्टिव्हलचा आस्वाद घेऊ शकतील!

बार्बिक्यू नेशन ही भारतातील आघाडीची रेस्टॉरंट साखळी असून तिचे लाइव्ह ग्रिल्स आणि विविध प्रकारचे बुफे यासाठी ती ओळखली जाते. 'कुक्कड़ कार्निवल'च्या माध्यमातून, ग्राहकांना एक अनोखा आणि संस्मरणीय डायनिंग अनुभव देण्याचा उद्देश आहे.

१) खास आणि तोंडाला पाणी सुटेल अशा डिशेसचा समावेश आहे

२) चिकन मरग सूप, स्टार्टर्समध्ये – भुना रसीला कुक्कड़, चिकन कीमा समोसा, चिकन कीमा पाव, हरा मसाला तवा चिकन, स्टफ्ड चिकन, मेन कोर्समध्ये – चिकन हलीम, दम का मुर्ग आदी गोडीने शेवट करण्यासाठी डिजर्ट्समध्ये आहेत.

३) मिठ्या बुंदी आणि रबडीचा संगम ची लज्जत असणार आहे.

> या फेस्टिव्हलच्या माध्यमातून आम्ही आमच्या प्रिय ग्राहकांना एक फ्रेश आणि युनिक डायनिंग अनुभव देऊ इच्छितो. बार्बिक्यू नेशनची खास ओळख असलेल्या थीम डेकोर, ॲम्बियन्स आणि युनिफॉर्ममध्ये सजलेल्या स्टाफद्वारे ग्राहकांना एक परिपूर्ण थीम-आधारित अनुभव दिला जाणार आहे.
>
> **- राहुल अग्रवाल,** सीईओ, बार्बिक्यू नेशन हॉस्पिटॅलिटी लिमिटेड

> आम्ही आमच्या प्रत्येक फेस्टिव्हलमध्ये ग्राहकांना एक विशेष अनुभव देण्याचा प्रयत्न करतो आणि 'कुक्कड़ कार्निवल' हे खास नॉनव्हेज फूड लव्हर्ससाठी आमचे खास भेट आहे. यात आमच्या सिग्नेचर डिशेस आणि नवकल्पना ग्राहकांच्या पसंतीनुसार सादर करण्यात आल्या आहेत.
>
> **- शाकीर अली,** वेस्ट रीजनल मॅनेजर, बार्बिक्यू नेशन

# बेशिस्त वाहन चालकांवर बिनधास्त तक्रार

## 'पीटीपी ट्रॅफिकॉप' वर तक्रारींचा भडीमार

## दोन दिवसांत १५० हून अधिक तक्रारींची नोंद




■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** पुणे शंहरातील बेशिस्त वाहनचालकांविरोधात नागरिकांना थेट तक्रार करता यावी, यासाठी पुणे पोलिसांनी विकसित केलेल्या 'पीटीपी ट्रॅफिकॉप' या मोबाइल अॅपला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. अॅपच्या वापराद्वारे केवळ दोन दिवसांत १५० हून अधिक तक्रारी नोंदवण्यात आल्या असून, वाहतूक विभागाकडून त्यावर तातडीने कार्यवाही केली जात असल्याची माहिती अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील यांनी दिली.

या अॅपचे उद्घाटन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. त्यानंतर अल्पावधीतच पुणेकरांनी अॅपचा वापर करून ट्रिपल सीट प्रवास, उलट दिशेने वाहन चालवणे, वाहन चालवताना मोबाईलवर बोलणे, अशा प्रकारच्या नियमभंगांची तक्रार मोठ्या प्रमाणावर केली आहे.

गुप्तता आणि कार्यवाहीची खात्री

तक्रारदाराची ओळख गोपनीय ठेवण्याची पूर्ण हमी देण्यात आली असून, प्रत्येक तक्रारीची ४८ तासांच्या आत पडताळणी करून कारवाई केली जाते. कार्यवाहीबाबतचा प्रतिसादही संबंधित तक्रारदाराला अॅपद्वारे मिळतो.

- **१)नागरिक अॅपच्या माध्यमातून खालील प्रकारच्या नियमभंगांची तक्रार करू शकतात:**
- **२)पदपथांवर चुकीची वाहनतळणी**
- **३)उलट दिशेने वाहन चालवणे**
- **४) ट्रिपल सीट प्रवास**
- **५)वाहन चालवताना मोबाईलचा वापर**
- **६)फॅन्सी किंवा अप्रामाणिक क्रमांक**
- **७) काळी फिल्म लावलेली वाहने**
- **८) वाहतूक अडथळ्यांबाबतही माहिती देता येणार**

### अॅपच्या वैशिष्ट्यपूर्ण सुविधा

पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या संकल्पनेतून विकसित झालेल्या या अॅपमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. छायाचित्र कधी व कुठे काढले गेले याची अचूक माहिती अॅपद्वारे मिळते. हे अॅप ई-चलन प्रणालीशी संलग्न असल्यामुळे दंडात्मक कारवाई थेट केली जाऊ शकते. अॅपच्या माध्यमातून नागरिक विविध प्रकारच्या वाहतूक नियमभंगांविरोधात थेट तक्रार दाखल करू शकतात. पदपथावर उभी असलेली वाहने, विरुद्ध दिशेने चालवली जाणारी वाहने, एकाच दुचाकीवर तीन जण बसणे (ट्रिपल सीट), वाहन चालवताना मोबाईलचा वापर करणे, फॅन्सी नंबर प्लेट लावणे आणि गाड्यांवर काळी फिल्म लावणे अशा प्रकारांच्या नियमांचे उल्लंघन झाल्यास नागरिक संबंधित वाहनांची माहिती आणि छायाचित्रे अॅपवर अपलोड करू शकतात.



**फक्त वाहतूक नियमभंगच नव्हे, तर रस्त्यावरील अपघात, खड्डे, पाण्याचे साचलेले भाग, झाडे कोसळणे, वाहन बिघाड यांसारख्या अडथळ्यांबाबत नागरिक अॅपद्वारे माहिती देऊ शकतात,**
**-अमोल झेंडे,** पोलीस उपायुक्त, वाहतूक शाखा



**शहरात वाढत्या वाहन संख्येमुळे वाहतूक नियंत्रणाचे आव्हान अधिक गडद झाले आहे. नागरिकांच्या सक्रिय सहभागामुळेच शिस्तबद्ध वाहतूक संस्कृती निर्माण होऊ शकते. त्यामुळे या अॅपचा अधिकाधिक वापर करावा"**
**-मनोज पाटील,** अतिरिक्त पोलीस आयुक्त,

# युवा, ज्येष्ठ कलाकारांना ऐकण्याची पुणेकरांना संधी


पंडित व्यंकटेश कुमार


सिद्धार्थ बेलामनू


भुवनेश कोमकली


रागिणी शंकर


विराज जोशी

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** 'माझे विद्यार्थी हेच माझा बँक बॅलन्स' असे म्हणणारे विद्यार्थीप्रिय शिक्षक, समाजधुरीण प्रा. श्रीराम पुजारी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त दोन दिवसीय विशेष सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यात युवा कलाकारांसह ज्येष्ठ कलाकारांना ऐकण्याची संधी रसिकांना मिळणार आहे. कार्यक्रम शनिवार, दि. २१ रोजी सायंकाळी ५.३० वाजता आणि रविवार, दि. २२ जून रोजी सकाळी ९ आणि सायंकाळी ५.३० या वेळात पुण्याई सभागृह, पौड रोड, कोथरूड येथे आयोजित करण्यात आला आहे.

शनिवारी भारतरत्न पंडित भीमसेन जोशी यांचे नातू विराज जोशी आणि पंडित विनायक तोरवी यांचे शिष्य सिद्धार्थ बेलामनू यांचे गायन होणार आहे. त्यापूर्वी प्रा. श्रीराम पुजारी यांच्या जीवनप्रवासावर आधारित चित्रफित दाखविली जाणार आहे.

रविवारी सकाळी ९ वाजता सुप्रसिद्ध व्हायोलिन वादक पद्मभूषण एन. राजम् यांची नात रागिणी शंकर यांचे व्हायोलिन वादन तर विख्यात गायक पंडित कुमार गंधर्व यांचे नातू भुवनेश कोमकली यांचे शास्त्रीय गायन होणार आहे. सायंकाळी प्रसिद्ध हिंदुस्थानी शास्त्रीय गायक पंडित व्यंकटेश कुमार यांच्या गायनाने दोन दिवसीय सांगीतिक कार्यक्रमाची सांगता होणार आहे.

# कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या खांद्यावर महापालिकेचा कारभार

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**



**पुणे :**राज्यातील सर्वात मोठ्या पुणे महापालिकेचा दैनंदिन कारभार आज मोठ्या प्रमाणावर कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या खांद्यावर सुरू आहे. शहरातील रस्ते, पाणी, आरोग्य, वीज यांसारख्या मूलभूत सुविधा पुरवणाऱ्या यंत्रणेमध्ये सुमारे १० हजार कंत्राटी कर्मचारी कार्यरत असले तरी, त्यांना आजही किमान सेवा-सुविधा मिळत नाहीत, ही बाब लक्षवेधी ठरत आहे.

महापालिकेच्या जुन्या हद्दीसाठी १६,३६९ पदे मंजूर असून, हद्दवाढीनंतर देखील मनुष्यबळ वाढवले गेलेले नाही. यातील ७,३३६ पदे रिक्त असल्याने, प्रशासनाला कंत्राटी कर्मचाऱ्यांवर अवलंबून राहावे लागत आहे. यामुळे महापालिकेच्या प्रत्येक विभागात विविध दर्जांचे कर्मचारी हंगामी स्वरूपात काम करत आहेत.

* काम जास्त, सुविधा कमी

कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून कायम कर्मचाऱ्यांपेक्षा जास्त दिवस व तास काम करून घेतले जात असले तरी त्यांना आरोग्य सेवा, सुट्ट्या, दिवाळी बोनस यांसारख्या मूलभूत सुविधा नाकारल्या जात आहेत. स्वच्छता व सुरक्षेचे काम करणारे कर्मचारी आठवड्याचे सहा दिवस काम करतात, तर कायम कर्मचारी पाच दिवस.

विशेष म्हणजे, पिंपरी-चिंचवड आणि नवी मुंबई महापालिकांमध्ये कंत्राटी कर्मचाऱ्यांना बोनस व घरभाडे भत्ते दिले जातात, पण पुण्यात मात्र हे सर्व लाभ वंचित आहेत. मात्र, या वेतनामध्ये महागाई आणि कुटुंबाच्या गरजा भागवणे अशक्य होत चालले आहे, अशी भावना कर्मचाऱ्यांमध्ये आहे.

### वेतन श्रेणी ठरलेली, पण अपुरी

**सध्या कंत्राटी कामगारांना ठराविक वेतन दिले जाते –**
**१) कुशल कामगार: ₹२३,१००**
**२) अर्धकुशल: ₹२२,१००**
**३) अकुशल: ₹२०,६००**

### धोरणात्मक निर्णयाची गरज

"पुणे महापालिकाही स्थानिक स्वराज्य संस्था असल्याने, सध्या बोनससारख्या सुविधा देणे शक्य नाही. यासाठी स्वतंत्र धोरण तयार करणे अत्यंत आवश्यक आहे," असे कामगार कल्याण अधिकारी नितीन केंजळे यांनी स्पष्ट केले.

### वाढत्या शहराला मजबूत मनुष्यबळाची गरज

पुणे शहराचा झपाट्याने होत असलेला विस्तार आणि त्यासोबत वाढणाऱ्या नागरी गरजा पाहता, केवळ तात्पुरत्या कंत्राटी भरतीवर अवलंबून राहणे ही दीर्घकालीन उपाययोजना होऊ शकत नाही. त्यामुळे आता रिक्त पदांची भरती, कंत्राटी कर्मचाऱ्यांना हक्काच्या सुविधा आणि मानव संसाधनाचे योग्य नियोजन ही काळाची गरज बनली आहे.

# पुण्यात 'ओपन हाऊस ट्रेनिंग'

## विकासकांच्या अडचणी सोडवण्यासाठी प्रयत्नशील




**पुणे :** "बांधकाम क्षेत्रातील पारदर्शी व्यवहार, ग्राहकांच्या व विकासकांच्या हितासाठी 'महारेरा' ही नियामक संस्था नेहमीच प्रयत्नशील आहे. दोन्ही बाजूने सारासार विचार करून सातत्याने नियमांत बदल व प्रणालीमध्ये सुसूत्रीकरण आणण्यावर भर दिला जात आहे. यामुळे बांधकाम क्षेत्राचा विकास व जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाला चालना मिळत आहे," असे प्रतिपादन महाराष्ट्र रिअल इस्टेट रेग्युलेटरी ऑथॉरिटीचे (महारेरा) माजी अध्यक्ष व गृहार्मोनी रिडेव्हल्पमेंट स्टेकहोल्डर्स फेडरेशनचे संस्थापक गौतम चॅटर्जी यांनी केले. विकासकांनी 'महारेरा'कडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलायला हवा, असेही त्यांनी नमूद केले.

बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडियाच्या (बीएआय) पुणे सेंटरच्या वतीने 'बांधकाम क्षेत्राचा विकास व स्वयं-पुनर्विकास' यावर आयोजित चर्चासत्रात चॅटर्जी बोलत होते. शनिवार पेठेतील विष्णुकृपा सभागृहात आयोजित चर्चासत्रामध्ये 'महारेरा'चे सचिव प्रकाश साबळे, तक्रार निवारण संचालक सुधाकर देशमुख, 'बीएआय' महाराष्ट्राचे अध्यक्ष जगन्नाथ जाधव, आयोजक व 'बीएआय'पुणे सेंटरचे अध्यक्ष अजय गुजर, सी. एच. रतलानी, महेश राठी, आनंद गुप्ता, राजाराम हजारे, आर्कि. ज्योती चौगुले आदी उपस्थित होते. बांधकाम व्यावसायिक, विकासक, स्थापत्य अभियंते, एमईपी सल्लागार, सरकारी कंत्राटदार, गृहनिर्माण संस्थांचे प्रतिनिधी, कर सल्लागार यांच्यासह ४०० पेक्षा अधिक लोकांनी सहभाग नोंदवला.

'बीएआय'च्या वतीने 'ओपन हाऊस ट्रेनिंग' उपक्रम सुरू करण्यासह इतर काही मागण्यांचे निवेदन साबळे यांच्याकडे दिले. त्याला साबळे यांनी मान्यता देत 'ओपन हाऊस ट्रेनिंग' सुरू करण्याची घोषणा केली.

"जुन्या इमारतींचा पुनर्विकास ही काळाची गरज असून, मुंबईपाठोपाठ पुण्यामध्ये मोठ्या प्रमाणात पुनर्विकास प्रकल्प होत आहेत. सोसायट्यांनी स्वतः एकत्रित येऊन पुनर्विकास करण्यासाठी चालना दिली जात आहे. पुनर्विकास करताना पारदर्शकता, विश्वास आणि वेळेचे बंधन या तीन गोष्टींना खूप महत्व आहे. प्रकल्पाला पूर्णत्वास नेण्यासाठी घरमालक आणि विकासक यांच्यातील समंजसपणा व समन्वय गरजेचा असतो."
**- गौतम चॅटर्जी**

"घर खरेदीदारांची फसवणूक होऊ नये, त्यांना योग्य वेळेत घराचा ताबा मिळावा, यासाठी विकासकावर नियमनासाठी काम करणारी 'महारेरा' ही संस्था आहे. 'महारेरा'कडे देशात दीड लाख प्रकल्पांची नोंद झाली असून, त्यातील ५० हजार प्रकल्प महाराष्ट्रातील, तर एकट्या पुण्यातील १२७८० प्रकल्पांची नोंद झालेली आहे. पुण्यातील विकासकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे."
**- प्रकाश साबळे**



## उधारीवर दारू न दिल्याने कामगाराला मारहाण

**येरवडा :** शहरातील येरवडा भागात उधारीवर दारू न दिल्याने वाईन शॉपमधील एका कामगाराला बेदम मारहाण करण्यात आल्याची घटना घडली.या प्रकरणी येरवडा पोलिसांनी एकाला अटक केली. रोहित पिल्ले (वय २५, रा. जयजवानगर, लक्ष्मीनगर, येरवडा) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, येरवडा भागातील एका वाईन शॉपमध्ये रविवारी रात्रीच्या सुमारास आरोपी रोहित पिल्ले हा गेला होता.त्यावेळी तेथील कामगाराकडे त्याने उधारीवर दारूची बाटली मागितली. उधारीवर दारू देण्यास कामगाराने नकार दिला.त्यामुळे आरोपी रोहित पिल्ले हा चिडला आणि कामगाराला लाथाबुक्क्यांनी मारण्यास सुरुवात केली. त्या मारहाणीत कामगाराचा दात पडला आणि गंभीर दुखापत देखील झाली. या मारहाण प्रकरणी येरवडा पोलीस स्टेशन येथे तक्रार देताच, आरोपी रोहित पिल्ले विरोधात याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करुन त्याला अटक करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले.

## युवाप्रज्ञाशोध निबंध स्पर्धेचे आयोजन

**पुणे :** आदर्श व समर्थ भारताचे निकष काय असावेत? या विषयावर एक राष्ट्रीय पातळीवरील युवाप्रज्ञाशोध निबंध स्पर्धा कौशलम् न्यास, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर, सावरकर स्मारक आणि कॉसमॉस फाउंडेशन यांच्या संयुक्त प्रयत्नातून घेण्यात येत असून याकरिता नोंदणी करण्याचा शेवटचा दिनांक ३० जून २०२५ असल्याची माहिती कौशलम् न्यासच्या प्रमुख विश्वस्त रोहिणी कुलकर्णी यांनी दिली.

या स्पर्धेत शालेय विद्यार्थी, महाविद्यालयीन विद्याथी व प्रौढ नागरिक अशा तीन श्रेणीत ही स्पर्धा घेण्यात येणार असून निबंधाची भाषा हिंदी, मराठी, कोकणी, गुजराती, तेलगू व संस्कृत अशा सहा भाषेत आहे. संस्कृत भाषेसाठी मात्र फक्त एकच प्रौढ वयोगट ही श्रेणी ठेवण्यात आली आहे. प्रत्येक श्रेणीसाठी व प्रत्येक भाषेसाठी रोख रु. दहा हजार, रु. साडेसात हजार व रु. पाच हजार अशी प्रथम ३ पारितोषिके देण्यात येणार आहेत. ज्या शाळा, महाविद्यालय व संस्था यांच्याकडून जास्तीत-जास्त निबंध येतील त्यांना विशेष प्रोत्साहनासाठी स्वतंत्र पारितोषिके देण्यात येणार आहेत. या निबंध स्पर्धेसाठी पौढ नागरिकांनी ७ ते १० निकष घेऊन तीन हजार शब्दात (संस्कृतसाठी ५ ते ७ निकष बाराशे शब्दात), महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी (१२ वीच्या पुढील) ७ ते १० निकष घेऊन दोन हजार पाचशे शब्दात आणि शालेय विद्यार्थ्यांनी (१२ वी पर्यंतचे) ३ ते ५ निकष घेऊन बाराशे शब्दात डिजीटल पध्दतीने निबंध सादर करावयाचा आहे. या स्पर्धेसाठी नोंदणीचा शेवटचा दिनांक ३० जून २०२५ असून निबंध सादर करण्याचा अंतिम दिनांक ३१ जुलै २०२५ आहे. नोंदणीसाठी https://shorturl.at/nr6aL या लिंकवर जाऊन गुगल फॉर्म भरावा असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

## आदिवासी तरुणाच्या खुनाने पानशेत हादरले

**पुणे :** पर्यटकांसह स्थानिक नागरिकांची वर्दळ असलेल्या पुण्यातील पानशेत येथील दाट लोकवस्तीच्या रस्त्यावर आदिवासी तरुणाचा निर्घृण खून करण्यात आला. लाथा बुक्यांनी मारहाण आणि दगडाने ठेचून आदिवासी कातकरी समाजाच्या युवकाचा निर्घृण खून करण्यात आला. घटनेनंतर दुचाकीवरून आलेले सर्व हल्लेखोर फरार झाले. रोहिदास काळुराम काटकर ( वय २४, रा.कादवे, ता. राजगड) असे मयत युवकाचे नाव आहे. या घटनेमुळे पानशेत वरसगाव परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. आदिवासी कातकरी समाजावर शोककळा पसरली आहे. या प्रकरणी वेल्हे पोलिसांनी पाच अज्ञात हल्लेखोरां विरोधात खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. अद्याप खूनाचे कारण स्पष्ट झाले नाही. हा प्रकार काल रविवारी (१५) रात्री आठ वाजण्याच्या सुमारास पानशेत येथे नंदाबाई कुंभार यांच्या हॉटेल समोर घडला. या प्रकरणी मयत रोहिदास काटकर याचा भाऊ अविनाश काटकर याने वेल्हे पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. वेल्हे पोलिस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक नितीन खामगंळ यांच्या देखरेखीखाली पोलीस उपनिरीक्षक अमित देशमुख तपास करत आहेत. पानशेत पोलीस चौकीचे पोलिस अंमलदार आकाश पाटील, युवराज सोमवंशी, ज्ञानदीप धिवार आदी पोलिस जवानांसह वेल्हे व ग्रामीण पोलीस फरार हल्लेखोरांचा शोध घेत आहेत.

## ग्रंथाचा प्रकाशन सोहळा

**पुणे :** संवाद, पुणे आणि महाराष्ट्र कला संस्कृती मंच, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'शिव-शक्ती संप्रदायाची लोक-गान परंपरा' या ग्रंथाचा प्रकाशन समारंभ शनिवार, दि. २१ जून रोजी सायंकाळी ५.३० वाजता आयोजित करण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ प्रकाशित आणि प्रा. डॉ. प्रकाश खांडगे संपादित या ग्रंथाचे प्रकाशन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते होणार आहे. मराठी भाषा आणि उद्योग मंत्री उदय सामंत, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे उपाध्यक्ष प्रा. डॉ. प्रदीप ढवळ, संत साहित्य आणि लोकसाहित्याचे गाढे अभ्यासक प्रा. डॉ. अनिल सहस्रबुद्धे प्रमुख पाहुणे आहेत. ज्येष्ठ कवयित्री, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या माजी अध्यक्षा डॉ. अरुणा ढेरे, साहित्य संस्कृती मंडळाच्या सचिव डॉ. मीनाक्षी पाटील यांची विशेष उपस्थिती असणार आहे, अशी माहिती संवाद, पुणेचे सुनील महाजन, निकिता मोघे, महाराष्ट्र कला संस्कृती मंचच्या शैला खांडगे यांनी निवेदनाद्वारे कळविली आहे. कार्यक्रम सर्वांसाठी खुला.

**SINHGAD COLLEGE OF NURSING**
Sinhgad Institutes www.sinhgad.edu
Narhe, Pune - 411041 **Phone:** 020 - 67537143 / 67537142
**Email:** principal.scon@sinhgad.edu
**(Approved by INC, New Delhi; MNC, Mumbai; Affiliated to MUHS, Nashik & NAAC "A" Accredited)**

**WANTED**

Applications are invited, in the prescribed format, from the eligible candidates for the following posts in the Sinhgad Technical Education Society's Sinhgad College of Nursing, Narhe, Pune - 411041.

| No. | Designation | Subject | No. of Post |
|---|---|---|---|
| 1 | Professor cum Principal | Any Nursing Specialty | 1 (Open) |
| 2 | Professor cum Vice - Principal | Any Nursing Specialty | 1 (Open) |
| 3 | Professor | Community Health Nursing | 1 (Open) |
| 4 | Assistant Professor / Lecturer | Medical Surgical Nursing | 1 (ST),1 (Open) |
| | | Community Health Nursing | 1 (Open) |
| | | Pediatric Nursing | 1 (SC), 1 (Open) |
| | | Obstetric Gynaecological Nursing | 1 (SC) |
| | | Psychiatric Nursing | 1 (ST),1 (Open) |
| 5 | Tutor / Clinical Instructor | Nursing | 2 (SC), 1(ST), 1(VJ-A) 1 (NT-B), 1 (NT-C), 3 (OBC), 2 (SEBC), 2 (EWS), 2 (OPEN) = (Total - 15) |

**Qualifications, Experience & Pay Scale:** Requisite qualification, experience, pay scale as per the norms prescribed by MUHS, Nashik. The prescribed application format and the detail requisite about the posts are available on the MUHS website www.muhs.ac.in (refer MUHS DIRECTION NO. 01/2017).

**How to Apply:** Application along with complete bio-data, attested copies of testimonials and two passport size recent colour photographs should reach in the office of "**The Secretary, Sinhgad Technical Education Society, S. No.19/15, Erandwane, Smt. Khilare Marg, Off Karve Road, Pune - 411004**" within 14 days from the date of publication of this advertisement. Attach copy of latest Salary Slip, if already in service, to the application. An envelope containing application should be superscribed the post applied and category. The candidates should bring their resume, attested copies of testimonials, experience certificates & recent passport size color photograph and all the original documents at the time of interview. Candidates should bring recent copy of Non-Creamy Layer Certificate, if applicable, at the time of interview.

*Subject to Pune Jurisdiction Only

**Dr. (Mrs.) Sunanda M. Navale**
Founder Secretary

# 'शिवसृष्टी' च्या माध्यमातून शिवकाळाची सफर

## रेल्वे मंत्रालय आणि बालभारतीच्या अधिकाऱ्यांची शिवसृष्टीला भेट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** छत्रपती शिवाजी महाराज यांची दृष्टी सत्यात दाखविणारी शिवसृष्टी पाहण्यासाठी केंद्रीय रेल्वे मंत्रालय आणि बालभारतीच्या अधिकाऱ्यांनी नुकतीच आंबेगाव बुद्रुक येथे साकारत असलेल्या शिवसृष्टीला भेट दिली.

रेल्वे मंत्रालयाच्या इंडियन रेल्वे केटरिंग अँड टुरिझम कॉर्पोरेशन लिमिटेड अर्थात आयआरसीटीसीच्या वतीने व महाराष्ट्र शासनाच्या पुढाकारने 'भारत गौरव यात्रा टुरिस्ट ट्रेन' या विशेष उपक्रमाच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज सर्किट सुरु करण्यात आली असून याद्वारे ७५० जणांनी शिवसृष्टीला भेट दिली आणि छत्रपती शिवाजी महाराजांचा काळ, त्यांची दृष्टी यांचा अनुभव घेतला.

याबरोबरच पुण्यातील बालभारती संस्थेच्या अधिकारी वर्गाने देखील शिवसृष्टीला भेट दिली यामध्ये संचालक कृष्णकुमार पाटील, वित्त व लेखा अधिकारी शुभांगी माने, बालभारतीच्या किशोर मासिकाचे संपादक किरण केंद्रे, साठा व वितरण व्यवस्थापक दत्तात्रय दिघे, विशेषाधिकारी केतकी जानी, ग्रंथपाल प्रशांत धामापूरकर, विधी अधिकारी रवींद्र माने, सहायक विशेषाधिकारी वर्षा सरोदे आणि सहायक संशोधन अधिकारी निकम यांचा समावेश होता.



या सर्व अधिकाऱ्यांनी यावेळी शिवसृष्टीमधील दुर्गवैभव', 'रणांगण' ही दालने, महाराजांच्या आग्राहून सुटकेचा थरार उभा करणारे दालन, प्रत्यक्ष शिवराय आपल्याशी संवाद साधत असल्याचा अनुभव देणारे श्रीमंत योगी हे दालन, राज्याभिषेकाचा देखावा असलेला 'सिंहासनाधिश्वर' हे दालन यांना भेट दिली. छत्रपती शिवरायांची दूरदृष्टी, त्यांना असलेला स्वभाषा, स्वराज्य आणि स्वधर्माचा अभिमान, त्यांच्यावर आलेली संकटे आणि या सर्वांवर मात करून त्यांनी उभारलेले स्वराज्य या सर्वांची माहिती शिवसृष्टीच्या माध्यमातून पाहताना अंगावर शहारे आल्याचे सर्वांनी सांगितले.

याबरोबरच शिवसृष्टीच्या दुसऱ्या टप्प्याचे मुख्य आकर्षण असलेले टाइम मशीन थिएटर आणि महाराजांच्या काळात काढलेल्या व सध्या जगातील प्रसिद्ध संग्रहालयांमध्ये असलेल्या चित्रांच्या (पेंटिंग्ज) हाय रेझोल्युशन इमेजेसच्या प्रिंट्सही या सर्वांनी पाहिल्या. 'लीडिंग फ्रॉम द फ्रंट' अशी ख्याती असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या हयातीत खूप लढायांचे नेतृत्व केले. त्यातील आपल्याला फारशी माहिती नसलेल्या लढायांची माहिती घेताना जणू शिवकाल समोर उभा ठाकल्याचे त्यांनी आवर्जून नमूद केले. छत्रपती घराण्याचे कुलदैवत असलेल्या तुळजा भवानी मातेचे मंदिर आणि गंगासागर तलाव याचे देखील दर्शन या सर्वांनी घेतले.

यावेळी पर्यटन आणि मार्केटिंग विभागाचे संचालक राहुल हिमालियन, पर्यटन विभागाच्या महाव्यवस्थापिका प्रोमिला गुप्ता, पश्चिम मुंबई विभागाचे महा व्यवस्थापक गौरव झा, अतिरिक्त महा व्यवस्थापक डॉ. अचूत सिंग, रथीश चंद्रन आर, पुणे व सोलापूर विभागाचे विभाग अधिकारी गुरुराज सोन्ना उपस्थित होते.



## खुनी आरोपीला चोवीस तासात अटक

**पुणे :** मित्राच्या बहिणीची छेड काढल्याच्या कारणातून झालेल्या वादात एकाचा दगडाने ठेचून खून करण्यात आला. ही घटना शनिवारी रात्री साडेदहाच्या सुमारास आंबेगाव, जांभूळवाडी तलावावरील बांधावर घडली. रोहित नामदेव ढमाळ (रा. भूमकरवस्ती, नऱ्हे) असे खून झालेल्याचे नाव आहे. मित्राच्या बहिणीची छेड काढल्याच्या कारणातून झालेल्या वादातून सुरज सूर्यवंशी याने रोहित ढमाळ याचा खून केला आहे. आरोपी सुरजला पोलिसांनी मध्य प्रदेशातील इंदूर येथून चोवीस तासांच्या आत पकडले, असे आंबेगाव ठाणे चे वरिष्ठ पोलिस निरीक्षक शरद झिने यांनी सांगतले.



## १३ ठिकाणी झाड -पडी

**पुणे :** शहरात झालेल्या पावसामुळे १३ ठिकाणी झाडे पडल्याची घटना घडल्या. सुदैवाने या घटनेत कोणी जखमी झाले नाही. अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन फांद्या हटवून रस्ते वाहतुकीस खुले करून दिले. शहर परिसरात मध्यरात्रीनंतर जोरदार पाऊस झाला. त्यानंतर सोमवारी दिवसभर पावसाची रिपरिप सुरू होती. मध्यरात्रीनंतर शहराच्या वेगवेगळ्या भागात झाडे, तसेच फांद्या पडण्याच्या घटना घडल्या.

सोमवारी सायंकाळपर्यंत १३ ठिकाणी झाडे पडल्याची माहिती अग्निशमन दलाच्या मुख्य नियंत्रण कक्षाने दिली. प्रभात रस्ता गल्ली क्रमांक १४, पाषाण रस्त्यावरील अभिमानश्री सोसायटी, पाषाण परिसरातील सोमेश्वरवाडी, बालेवाडीतील श्री शिव छत्रपती क्रीडा संकुल, कोथरूडमधील महात्मा सोसायटी, सिंहगड रस्त्यावरील नित्यानंद हॉल, सोमवार पेठेतील नरपतगिरी चौक, महापालिका भवन, घोरपडीतील सोपानबाग, बिबवेवाडीतील हॉटेल रुपाली, खराडीतील ठुबेनगर, कोथरूडमधील रामबाग कॉलनी परिसरात झाड कोसळण्याच्या घटना घडल्या. सुदैवाने या घटनेत कोणी जखमी झाले नाही.



## सध्याची परिस्थिती त्रासदायी ममता सपकाळ यांची खंत

**पुणे :** 'मानवनिर्मित घटना असो की नैसर्गिक, अपवाद वगळता आजूबाजूच्या वातावरणात सकारात्मक असे काहीही घडत नाही. समाजात ऐकण्यासारख्या, बघण्यासारख्या चांगल्या गोष्टी दिसत नाहीत. सध्याची परिस्थिती जिवाला त्रास देणारी आहे,' अशी खंत सामाजिक कार्यकर्त्या ममता सिंधूताई सपकाळ यांनी सोमवारी व्यक्त केली. 'वसुंधरा फाउंडेशन'च्या वतीने सपकाळ यांच्या हस्ते 'वसुंधरा गौरव' पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. त्यावेळी त्या बोलत होत्या. संस्थेचे अध्यक्ष धनंजय भोसले, सामाजिक कार्यकर्ते उदय जगताप, आनंद सराफ, पीयुष शहा, गायक राजेश दातार, शाम भुर्के, माजी प्रशासकीय अधिकारी मोहन ठोंबरे, अभिजित पाठक, सुरेश काळे या वेळी उपस्थित होते. याच कार्यक्रमात सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा, योग अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या प्रिया सावंत, शैलजा लोखंडे, स्नेहल जाधव, अजित माने, सुनील रोट्टी, मेधा जेरे, कौशल्य विकास, प्रसाद शिवरकर, सुनीता जाधव, विठ्ठल सूर्यवंशी आणि डॉ. दत्तात्रय शिंदे यांना 'वसुंधरा गौरव' पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## झाडणकामाची होणार चौकशी,आयुक्तांचे आदेश

**पुणे :** झाडणकाम करणारे कर्मचारी शहरातील पुढाऱ्यांचे घरगडी झाले आहेत. अनेक जण मूळ काम सोडून दुसरीकडे काम करत आहेत, तर काही जण कामाला न येता पगार घेत आहेत, अशा प्रकारामुळे रस्त्यावर झाडण्यासाठीचे ४ हजार ३२९ कर्मचारी गायब आहेत. त्यांची गंभीर दखल आयुक्त नवलकिशोर राम यांनी घेतली आहे. त्यांनी यासंदर्भातील अहवाल सादर करा, असे आदेश अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांना दिले आहेत.पुणे महापालिकेच्या कायम सेवेतील आणि कंत्राटी असे मिळून एकूण १० हजार २२० कर्मचारी नियुक्त केले आहेत. त्यांच्या पगारावर महापालिका दरवर्षी शेकडो कोटी रुपये खर्च करत आहे. पण यातील ४० टक्केही कर्मचारी कामावर नाहीत. केवळ ५ हजार ४०६ कर्मचारीच प्रत्यक्षात काम करतात. त्याच प्रमाणे क्षेत्रीय कार्यालय स्तरावर आरोग्य निरीक्षक व मुकादम यांच्या संगनमताने कामे न करता कर्मचाऱ्यांची हजेरी लावणे, कंत्राटी कामगार घेण्यासाठी त्यांच्याकडून २० हजार ते १ लाखापर्यंत लाच घेणे, सुट्या घेतल्यानंतर गैरहजेरी न लावणे, पगार देऊन त्यातील ५० टक्के हिस्सा स्वतः घेणे, कायम सेवक स्वतः काम न करता दुसरा पगारी नोकर ठेवतात. शहरातील अनेक राजकारण्यांच्या घरी सफाई काम करणे, पुसणे, भाजी आणणे, गाडी धुवणे, गाडी चालवणे यासारखी कामे करत आहेत. त्यांचा पगार महापालिका देत आहे. हे प्रकार शहरात होत असताना त्यावर क्षेत्रीय कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त, परिमंडळ उपायुक्तांचे कोणतेही नियंत्रण नाही. चुकीच्या कामांना ते पाठीशी घालत आहेत.

# शहरात फक्त २४ होर्डिंग अनधिकृत ?

### आयुक्तांकडून तपासण्यासाठी स्वतंत्र पथकाची नेमणूक

शहरात सगळीकडे होर्डिंगचे व फ्लेक्सचा सुळसुळाट पाहायला मिळत असताना महापालिकेच्या आकाश चिन्ह व परवाना विभागाकडे शहरातील व समाविष्ट गावांमधील अनधिकृत होर्डिंगची माहितीच नाही. ज्यांनी रीतसर परवानगी घेतली आणि ज्या होर्डिंगवर कारवाई करण्यात आली. सध्या शहरात असंख्य अनधिकृत होर्डिंग उभे असतानाच पालिकेच्या १५ क्षेत्रीय कार्यालयांकडून फक्त २४ च होर्डिंग अनधिकृत ही आकडेवारी पाहून आयुक्तांनाच धक्का बसला असून, आता अनधिकृत होर्डिंगची संख्या नक्की किती आहे, हे तपासण्यासाठी स्वतंत्र पथकाची नेमणूक करण्यात येणार आहे. त्यामुळे खोटी माहिती देणाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असे आयुक्तांकडून स्पष्ट करण्यात आले.



> अनधिकृत होर्डिंगची संखा प्रत्यक्षात अधिक असल्याचे नाकारता येत नाही. त्यामुळे आपण स्वतंत्र टीम नेमून अनधिकृत होर्डिंगची तपासणी करणार आहोत. तसेच, या तपासणीत अहवालापेक्षा जास्त होर्डिंग सापडल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल. तसेच जे २४ अनधिकृत होर्डिंग आहेत, त्यावर आठ दिवसांत कारवाई करावी, असे निर्देश दिले आहेत.
>
> **-आयुक्त नवलकिशोर राम**

> "सिंहगड रोड आणि दांडेकर पुल च्या जवळ पास होर्डिंग आणि अतिक्रमण केल्यामुळे रस्त्यावर धोका निर्माण होत आहेत, परंतु कोणतीही कारवाई होत नाही.
>
> **-श्रीपाद शिंगवेकर**



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महापालिका हद्दीत कोठेही होर्डिंग किंवा फ्लेक्स उभे करण्यासाठी आकाश चिन्ह व परवाना विभागाकडून सशुल्क परवानगी दिली जाते. महापालिकेने परवानगी दिलेल्या होर्डिंगचे स्ट्रक्चर ऑडिट करण्याची व दरवर्षी परवान्याचे नूतनीकरण करण्याची जबाबदारी संबंधित होर्डिंग मालकावर असते. परवानगी दिलेल्या कालावधीनंतर संबंधितांनी सदर जाहिरात काढली नाही, तर महापालिकेकडून त्याच्यावर कारवाई केली जाते. मात्र, महापालिकेची कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता शहरातील विविध रस्ते, चौक, पदपथ, इमारती आणि सार्वजनिक ठिकाणी अनधिकृतपणे होर्डिंग आणि फ्लेक्स उभारले जातात. यामुळे महापालिकेचे उत्पन्न बुडते. अशा बेकायदेशीर जाहीरातबाजीवर महापालिकेकडून कारवाई केली जाते. मात्र अधिकारी, कर्मचारी आणि व्यावसायिकांचे असणारे लागेबांधे आणि त्याला मिळणारे राजकीय पाठबळ यामुळे कारवाईला लगाम लागतो. त्यामुळे शहरात अनधिकृत फ्लेक्सबाजी, जाहिरातबाजी आणि होर्डिंगचा आलेख दिवसेंदिवस वाढताच आहे. परिणामी शहराचे विद्रुपीकरण होते. त्यातच पावसाळ्यांच्या तोंडावरच नुकतीच वाघोली येथे होर्डिंग कोसळण्याची दुर्घटना घडली होती. त्यामुळे होर्डिंगच्या सुरक्षिततेचा मुद्दा ऐरणीवर आला होता. केवळ २४ अनधिकृत होर्डिंग असल्याचा दावा आकाश चिन्हकडून करण्यात आला.

### आकाश चिन्ह निरीक्षकांकडून चुकीची माहिती

**● एकीकडे अनेक चौकात आणि रस्त्यालगत नियम धाब्यावर बसवून उभारलेले होर्डिंग दिसत असताना आकाश चिन्ह निरीक्षकांकडून चुकीची माहिती दिली जात असल्याचे स्पष्ट होत आहे. त्यातच या अनधिकृत होर्डिंगच्या आकडेवारीचा अहवाल महापालिका आयुक्तांना नुकताच सादर झाला आहे. १५ क्षेत्रिय कार्यालयाच्या हद्दीत केवळ २४ अनधिकृत होर्डिंग असल्याची आकडेवारी पाहून त्यांनाही धक्का बसला.**

# जि. प. शाळांतील बदली प्रक्रियेत गैरप्रकार?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्यातील जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये जिल्हांतर्गत बदलीसाठी शिक्षकांकडून मोठ्या प्रमाणावर खोट्या वैद्यकीय व दिव्यांगत्वाच्या प्रमाणपत्रांचा वापर केल्याचे प्रकार समोर येत आहेत. अशा तक्रारींची गंभीर दखल घेत राज्य शासनाने आता कारवाईचा निर्णय घेतला असून, खोट्या कागदपत्रांच्या आधारे बदली टाळणाऱ्या शिक्षकांविरोधात फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. राज्याच्या ग्रामविकास विभागाच्या कार्यासन अधिकारी ज्योत्स्ना अर्जुन यांनी यासंदर्भात राज्यातील सर्व जिल्हा परिषदा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना जारी केल्या आहेत.

जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदल्यांमध्ये काही 'विशेष संवर्ग'ना सवलतीचे प्रावधान आहे. या संवर्गात गंभीर आजारांनी ग्रस्त शिक्षक, दिव्यांग शिक्षक, दिव्यांग मुलांचे पालक, घटस्फोटित अथवा परित्यक्ता महिला शिक्षक, ५३ वर्षे वरील शिक्षक, कुमारिका, विधवा शिक्षक आणि ज्यांचे जोडीदार गंभीर आजाराने पीडित आहेत अशांचा समावेश होतो.

मात्र या सवलतीचा गैरवापर करत काही शिक्षकांनी बनावट आजारांची आणि दिव्यांगत्वाची खोटी



प्रमाणपत्रे सादर केली असल्याचे निदर्शनास आले आहे. यामुळे अनेक शिक्षकांना सोयीच्या शाळांमध्ये वर्षानुवर्षे बदली न करता कायम ठेवता आले आहे.

शिक्षकांनी सादर केलेल्या वैद्यकीय प्रमाणपत्रांमध्ये शंका वाटल्यास संबंधितांची वैद्यकीय तपासणी जिल्हा शल्यचिकित्सकांकडून करण्यात येणार आहे.

### न्यायालयाचेही सरकारला निर्देश

बदली प्रक्रियेतील या गोंधळाबाबत काही न्यायालयीन प्रकरणांमध्ये न्यायालयाने राज्य शासनाकडे खुलासा मागितला आहे. विविध संवर्ग निर्माण करून विशिष्ट शिक्षकांना बदलीतून सूट का दिली गेली, यावर उत्तर देण्याचे आदेश शासनाला देण्यात आले आहेत.

# मार्केट यार्डात पालखीच्या आगमनाची तयारी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मार्केट यार्ड :** संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांची पालखी शुक्रवारी (ता. २०) आणि शनिवारी (ता. २१) पुण्यात मुक्कामी आहेत. दरवर्षी मार्केट यार्डात अंदाजे २०० ते २५० दिंड्या मुक्कामी असतात. त्या पार्श्वभूमीवर पुणे बाजार समितीसह मार्केट यार्डातील विविध व्यापाऱ्यांनी पालखीच्या आगमनाची जय्यत तयारी सुरू केली आहे.

बाजार समितीच्या मार्केट यार्डातील गूळ-भुसार, फळे, तरकारी, फुले, कांदा-बटाटा आदी विभागांत अनेक दिंड्या मुक्कामासाठी असतात. व्यापारी, कामगार, पदाधिकारी यांच्यासह प्रत्येक जण वारकऱ्यांची सेवा करून पांडुरंगाची सेवा करत पुण्य कमावत असतो. अनेकजण सकाळी नाष्टा, दुपारी जेवण, सांयकाळी जेवण, दिवसभर विविध धार्मिक भजन-कीर्तनाचे कार्यक्रमाचे आयोजन करतात.

> वारकऱ्यांची कोणतीही गैरसोय होणार नाही, याची काळजी घेतली जाणार आहे. यंदा वारकऱ्यांना बाजार समितीतर्फे रेनकोटचे वाटप केले जाणार आहे. पालखी आगमनाच्या पार्श्वभूमीवर आरोग्य, स्वच्छता, मोबाईल टॉयलेट, औषध फवारणी, पाणी आदी सुविधांची तयारी सुरू आहे. याबाबत महापालिका, पोलिस प्रशासन यांना पत्रव्यवहार केला आहे.
>
> **- दिलीप काळभोर,** सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, पुणे



अनेक व्यापारी गाळ्यांसमोर मंडप टाकून मुक्काम, जेवणासह विविध सुविधांची तयारी करत आहेत. वारकऱ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून स्वच्छता, सुरक्षा व्यवस्था, औषधे व पावडर फवारणी, लाइट व्यवस्था, शौचालयाची व्यवस्था, पाणीपुरवठा, वाहतूक व्यवस्था आदी तयारी करत असल्याचे बाजार समितीचे सचिव डॉ. राजाराम धोंडकर यांनी सांगितले.

# अकरावी कॅप प्रवेश सुरु; २६ जूनला पहिली यादी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्यातील अकरावी प्रवेशासाठीच्या कोटाअंतर्गत प्रक्रियेचा टप्पा पूर्ण झाला असून, आता केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया (कॅप) सुरू झाली आहे. या प्रक्रियेद्वारे विद्यार्थ्यांना गुणवत्ता यादीच्या आधारे उच्च माध्यमिक शाळांची निवड करता येणार आहे. या निवड प्रक्रियेवर विभागीय समित्यांकडून बारकाईने परीक्षण करण्यात येणार असून, २६ जून रोजी कॅपच्या पहिल्या गुणवत्ता यादीची अधिकृत घोषणा करण्यात येणार आहे. त्यानंतर, २७ जून ते ३ जुलै या कालावधीत गुणवत्ता यादीत नाव असलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येईल. पहिल्या फेरीनंतर उर्वरित जागांची यादी ५ जुलै रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे.





दरम्यान, यंदाच्या शैक्षणिक वर्षात कोटाअंतर्गत प्रवेशासाठी १ लाख १३ हजार ४८ विद्यार्थ्यांनी अर्ज केला होता. यापैकी ६० हजार ४८७ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष प्रवेश घेतला आहे. आता उर्वरित विद्यार्थी कॅप फेरीतून प्रवेश घेतील. सद्य:स्थितीत १२ लाख ७१ हजार २०१ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून, कॅपच्या पहिल्या फेरीत प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थी व पालकांनी वेळापत्रकाचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन शिक्षण विभागाकडून करण्यात आले आहे.

# आयुष्य काव्य आहे ते जगणे म्हणजे आव्हान : मकरंद देशपांडे





■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कवितेत एखाद्याचे आयुष्य सामावलेले असते. मुळात आयुष्य हेच एक काव्य आहे. हे काव्य जगणे एक आव्हान आहे, असे मत प्रसिध्द अभिनेते आणि लेखक मकरंद देशपांडे यांनी व्यक्त केले. शब्द मल्हार प्रकाशनातर्फे कवी स्वानंद बेदरकर यांच्या 'पावसाच्या गर्भतळी' या काव्यसंग्रहाच्या प्रकाशन सोहळ्याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिराच्या फिरोदिया सभागृहात झालेल्या या कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष आणि महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलींद जोशी, प्रसिध्द समीक्षक डॉ. रणधीर शिंदे आणि कवी स्वानंद बेदरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रा. मिलींद जोशी म्हणाले, पाऊस आणि कविता यांच्या निर्मितीत एक साम्य असते. ते म्हणजे दोन्हीकडेही निर्मितीपूर्वी घुसमटून यावे लागते, तगमग सहन करावी लागते. पाऊस असो की कविता कोसळण्यापूर्वीच शब्दात व्यक्त करता येत नाही आणि कोसळल्यानंतर शब्दात पकडता येत नाही. मराठीत बऱ्याच वर्षांनी एकाच विषयाला वाहिलेला कवितासंग्रह आलेला आहे, हे या संग्रहाचे वैशिष्ट्य आहे. अशा प्रकारच्या कविता लेखनासाठी अव्वल दर्जाची प्रतिभा तर लागतेच पण त्याचबरोबर चिंतनात सातत्य देखील लागते.

यावेळी प्रसिध्द समीक्षक डॉ.रणधीर शिंदे यांनी पुस्तकाची समीक्षात्मक मांडणी केली. कवी स्वानंद बेदरकर यांनी पुस्तक लिहिण्यामागील प्रक्रिया आणि प्रेरणा उलगडली. पियु शिरवाडकर-आरोळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून आभार मानले.

> कवितेमध्ये ताकद असते. काव्याला मापदंड नसतात आणि सीमाही नसतात. कवितेमुळे जीवनाला किनारा लाभतो. पावसाच्या प्रत्येकाच्या काही ना काही आठवणी असतात. पाऊस तुम्हाला भिजवत असतो. भिजणे हे प्रत्येकाच्या मनोभूमिकेवर अवलंबून असते. बाहेर जेवढे स्वच्छ पाहाल तेवढे तुमचे अंतरमन स्वच्छ होते. जगणे ही मोठी प्रक्रिया आहे.
>
> **- मकरंद देशपांडे**



## आमदार अमित गोरखे यांनी अनुभवला प्रेरणादायी क्षण

**चिंचवड :** आमदार अमित गोरखे यांनी स्वतः शिकलेल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका शाळेत नवीन शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांचे स्वागत करत त्यांच्या आयुष्यातील एक भावनिक व प्रेरणादायी क्षण अनुभवला. शासनाच्या '१०० शाळांना भेट' या अभिनव उपक्रमांतर्गत निवड झालेल्या "स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर, काळभोर नगर" मनपा शाळेला भेट देण्यासाठी आमदार अमित गोरखे उपस्थित होते. या निमित्ताने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी आपल्या शालेय आठवणींना उजाळा दिला. "ही तीच शाळा आहे, जिथे मी विद्यार्थी म्हणून बसलो होतो, शिकलो होतो, घडलो होतो. आज आमदार म्हणून या शाळेत परत आलो, हे माझ्यासाठी अत्यंत अभिमानास्पद व भावनिक क्षण आहे," अश्या भावना त्यांनी व्यक्त केल्या.



## वारकऱ्यांच्या सेवेत टँकर दाखल

**पिंपळे गुरव :** संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज व जगद्गुरू संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांना मोफत पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी पिंपळे गुरव येथील मराठवाडा जनविकास संघाच्या वतीने आठ टँकर पालखी सोहळ्यासोबत पाठविण्यात येत आहेत. संत महंतांच्या हस्ते टँकरचे पूजन करून ते वारकऱ्यांच्या सेवेत दाखल करण्यात आले. वारीसाठी विशेष सहकार्य विजय भोसले , गणेश शेलार यांनी मोलाचे योगदान दिले

या टँकरद्वारे आळंदी ते पंढरपूर दिंडी क्र.११ ह.भ.प.सोपान काका कराडकर, दिंडी क्र.18 कै. ह.भ.प. धोंडूजी बुवा चिझघरकर, देहू ते पंढरपूर दिंडी क्र.२२१ ह.भ.प.रामकृष्ण प्रासादिक, दिंडी क्र. ९ ह. भ. प. भागवत महाराज बोळेगावकर, दिंडी क्र. ३८७ स्वयंभू श्री राम प्रभू, दिंडी क्र. २ श्री देहूकर सांप्रदायिक दिंडी समाज, श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी, दिंडी क्र.१९७ ह.भ.प. बाबुराव महाराज तांदळे आदी दिंड्यासोबत पिण्याच्या पाण्याचे टँकर वारकऱ्यांच्या सेवेसाठी पंढरपूरपर्यंत पाठविण्यात येत आहेत. पिंपळे गुरव येथे झालेल्या कार्यक्रमास भंडारा डोंगर ट्रस्टचे सदस्य ह.भ.प.जगन्नाथ नाटक पाटील, ह.भ.प. बब्रुवान वाघ महाराज, ह.भ.प. तुकाराम भाऊ महाराज, ह.भ.प. बाबुराव तांदळे महाराज, ह.भ.प. गजानन वाव्हळ महाराज, महाराष्ट्र राज्य वारकरी महामंडळाचे शहराध्यक्ष विजय जगताप, ह.भ.प. धारूमामा बालवडकर, समाज प्रबोधनकार शारदा मुंडे, युवराज माने, माजी नगरसेवक राजेंद्र जगताप, मराठवाडा जनविकास संघाचे अध्यक्ष अरुण पवार उपस्थित होते.



## रोटरी क्लब कडून ग्रामस्थांना रोलर ड्रमचे वाटप

**पिंपरी :** रोटरी क्लब ऑफ निगडीच्या वतीने पाण्याची वाहतूक करण्यासाठी खरोशी, वाळद,आव्हाट (ता. खेड) या खेडयातील ग्रामस्थांना १०० रोलिंग ड्रमचे वितरण करण्यात आले. तसेच बोरघर (ता.आंबेगाव) येथील शाश्वत संस्थेच्या आनंद कपूर प्रशिक्षण केंद्रात बसविण्यात आलेल्या सौर ऊर्जा प्रकल्पाचे उद्घाटन केले. आदिवासींसाठी हिरडा, मसाला प्रक्रिया केंद्र चालवले जाते. यांना वीज बील भरणे शक्य होत नसे. यामुळे रोटरी क्लबने सौर ऊर्जा प्रकल्प बसवून दिले.


यावेळी क्लबचे अध्यक्ष सुहास ढमाले, सेवा संचालक अश्विन कुलकर्णी,जयंत येवले, सोनाली जयंत, धनश्री कुलकर्णी, शाश्वत फाउंडेशनचे विश्वस्त सुरेश राजवाडे, अशोक आढाव, प्रतिभा तांबे, सुमंत सिंग, सुलाताई गवारी आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात रोलिंग ड्रम मिळाल्याने ग्रामस्थांना खूप आनंद झाला. हे ड्रम या ग्रामस्थांचे जीवन जगणे सोपे आणि आरामदायी बनवण्यात खूप मदत करतील,असा विश्वास अध्यक्ष श्री.ढमाले यांनी व्यक्त केला.

## प्राध्यापकांनी दिले विदेशातील विद्यापीठात धडे

**पिंपरी :** जेएसपीएमच्या ताथवडे येथील राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या स्थापत्य अभियांत्रिकी विभागातील प्राध्यापकांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर आपले कौशल्य सिद्ध करत संस्थेचा झेंडा परदेशातही फडकवला आहे. विभागातील डॉ. राजकुवर डुबल (संरचना शास्त्र), डॉ. मीनाक्षी शर्मा (दळणवळण अभियांत्रिकी) आणि डॉ. सौरव कर (मृदुबल अभियांत्रिकी) यांना व्हीएसबी टेक्निकल युनिव्हर्सिटी, ऑस्ट्रावा, चेक रिपब्लिक या नामांकित संस्थेत अध्यापनासाठी विशेष आमंत्रण मिळाले.

या दौऱ्यात त्यांनी चेक टेक्निकल युनिव्हर्सिटी, प्राग येथे स्थापत्य विभागाशी शैक्षणिक करार केला. याशिवाय, टेक्निकल युनिव्हर्सिटी ड्रेस्डन, जर्मनी येथे रेल्वे अभियांत्रिकीतील प्रकल्प अभ्यासासाठीही या तिघांची निवड झाली. भूकंप प्रतिबंधक तंत्रज्ञानात आघाडीवर असलेल्या बर्लिन मधील 'गर्ब'या औद्योगिक समूहानेही या तिघांना त्यांच्या संशोधनाची सादरीकरणे पाहण्यासाठी आमंत्रित केले होते.

# पालखीचे आज प्रस्थान; देहूनगरी स्वागतास सज्ज



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**देहू :** आषाढी वारीसाठी संत श्री तुकाराम महाराज पालखी सोहळा आज बुधवारी (ता.१८) दुपारी अडीच वाजता देहूतील मुख्य देऊळवाड्यातून पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार आहे. या सोहळ्याला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती संत तुकाराम महाराज पालखी सोहळा प्रमुख दिलीप महाराज मोरे यांनी दिली.

### अवजड वाहतूक बंद

भाविकांच्या सुरक्षेसाठी ४०० पोलिस तैनात करण्यात आले आहेत. त्यामुळे देहूला छावणीचे स्वरुप प्राप्त झाले आहे. मंगळवारी (ता. १७) ते गुरुवार (ता. १९) पर्यंत देहूतील अवजड वाहतूक पूर्णपणे बंद करण्यात येणार आहे. तसेच गुरूवारी पुणे - मुंबई महामार्गावरील निगडी ते देहूरोड दरम्यान वाहतूक कात्रज बाह्यवळण महामार्गाने वळविण्यात आलेली आहे. गावाबाहेर वाहन तळाची व्यवस्था करण्यात आली आहे.

"यंदाचा ३४० वा पालखी सोहळा आहे. त्याचा प्रस्थान कार्यक्रम बुधवारी दुपारी अडीच वाजता मुख्य देऊळवाड्यातील भजनी मंडपातून सुरू होईल. संस्थानच्यावतीने संपूर्ण तयारी करण्यात आलेली आहे. चांदीच्या पालखी रथाचे काम पूर्ण झाले असून त्याला उजाळा देण्यात आला आहे. सोहळ्यात सहभागी होणाऱ्या दिंड्या देहूत दाखल झालेल्या आहेत. ५०० दिंड्या आहेत. यंदा संस्थानने तीन बैलजोडी स्वतः खरेदी केल्या आहेत. देऊळ वाड्याला आकर्षक फुलांची सजावट करण्यात आलेली आहे."

**-दिलीप महाराज मोरे,** पालखी सोहळा प्रमुख



### देहूतील पूर्वतयारी, सोयी-सुविधा...

- मुख्य देऊळवाड्यात दर्शनासाठी भाविकांची पहाटेपासून गर्दी
- संत तुकाराम महाराज संस्थान, देहू नगरपंचायतीकडून पालखी प्रस्थान सोहळ्याची जय्यत तयारी
- राज्याच्या कानाकोपऱ्यातून हजारो वारकरी, भाविक देहूत दाखल
- त्यांच्या स्वागतासाठी देहूनगरीतील ग्रामस्थ सज्ज, इंद्रायणी नदीचा काठ वारकऱ्यांनी फुलला
- भाविकांच्या स्वागतासाठी पालखी मार्गावर जागोजागी कमानींची उभारणी
- देहूतील विविध संस्था आणि ग्रामस्थांच्यावतीने अन्नदानासाठी मंडपांची उभारणी
- नगरपंचायत प्रशासन, आरोग्य विभाग, पोलिस यंत्रणा, महावितरण, सार्वजनिक बांधकाम विभाग यंत्रणा सज्ज
- आरोग्य विभागाकडून चार ठिकाणी बाह्य रुग्ण विभाग सुरू, गावातील पाण्याच्या नमुनांची तपासणी
- एकूण दहा रुग्णवाहिका वारकरी, भाविकांच्या सेवेत राहणार
- नगरपंचायत, आरोग्य विभागाकडून ५०० दिंड्यांना आरोग्य कीटचे वाटप होणार
- सार्वजनिक बांधकाम विभागाकडून देहू ते देहूरोड पालखी मार्गाची दुरुस्ती पूर्ण
- इंद्रायणी नदीच्या घाटावर जीवरक्षकांची तैनाती
- गाव परिसरात सुमारे १२०० फिरती स्वच्छतागृहांची व्यवस्था

### पालखी प्रस्थान सोहळा कार्यक्रम

- बुधवारी (ता.१८) पालखी प्रस्थान कार्यक्रमास सुरुवात होणार
- पहाटे साडेचार वाजता देऊळवाड्यात काकडा
- पहाटे पाच वाजता श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात संस्थानच्यावतीने महापूजा
- पहाटे साडेपाच वाजता संत तुकाराम महाराज शिळा मंदिरात महापूजा
- सकाळी सहा वाजता वैकुंठस्थान येथील संत तुकाराम महाराज मंदिरात महापूजा
- सकाळी सहा वाजता पालखी सोहळ्याचे जनक तपोनिधी नारायण महाराज समाधी मंदिरात विश्वस्तांच्यावतीने महापूजा
- सकाळी ८ ते ९ यावेळेत गाथा भजनाची सांगता
- सकाळी दहा ते बारा या वेळेत देहूकर महाराज यांचे काल्याचे कीर्तन
- दुपारी बारा ते दोन या वेळेत महाप्रसादाचा कार्यक्रम
- इनामदारवाड्यातून संत तुकाराम महाराज पादुकांचे दुपारी दोन वाजता मुख्य देऊळवाड्यात आगमन
- पालखी प्रस्थान सोहळ्यास दुपारी अडीच वाजता प्रमुख मान्यवरांच्या हस्ते कार्यक्रमास सुरुवात
- पालखीची सायंकाळी पाच वाजता मंदिर प्रदक्षिणा
- सायंकाळी साडेसहा वाजता पालखी सोहळा इनामदार वाड्यात मुक्कामी

# अखेर कल्याणी देशपांडेला बेड्या

## गांजा विक्रीचा रॅकेटचा पर्दाफाश




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी- चिंचवड :** पुण्यातील कुप्रसिद्ध कल्याणी देशपांडे ला पिंपरी-चिंचवडच्या अंमली विरोधी पथकाने आंध्रप्रदेशमधून बेड्या ठोकल्या आहेत. पिटासह मोका गुन्ह्यामध्ये शिक्षा भोगून आलेली कल्याणी गांजा विक्री रॅकेटची मास्टरमाइंड आहे. काही दिवसांपूर्वी अंमली पदार्थ विरोधी पथकाने कल्याणी देशपांडेच्या गांजा रॅकेटचा पर्दाफाश केला होता. तिच्या पतीसह जावयाला देखील पोलिसांनी बेड्या ठोकल्या होत्या. तेव्हा, कल्याणी देशपांडे फरार होण्यात यशस्वी झाली होती.

कल्याणीचा शोध पिंपरी-चिंचवड पोलीस घेत होते. याच दरम्यान कल्याणी देशपांडे ही आंध्रप्रदेशमधील इस्ट गोदावरी जिल्ह्यातील राजनगरममध्ये भाड्याच्या खोलीने राहत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. अंमली पदार्थ विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांच्या टीम त्याठिकाणी पोहचली. सापळा रचून तिला अटक करण्यात आली आहे.

### अमली पदार्थ विरोधी पथकाची कामगिरी

- कल्याणी देशपांडे गांजाच रॅकेट चालवायची. काही दिवसांपूर्वी बावधन येथील निवस्थानी छाप मारून २० किलो गांजा जप्त केला होता. पती, जावई ला बेड्या ठोकल्या होत्या. कल्याणीचा शोध घेत असताना तिला देखील आंध्रप्रदेशमधून अटक करण्यात आली आहे. कल्याणी देशपांडेच काही वर्षांपूर्वी वेश्याव्यवसायाच जाळ होत. पिटा आणि मोका गुन्ह्यात शिक्षा भोगून आलेली आहे. अधिक चा तपास अमली पदार्थ विरोधी पथक करत आहे.

# बालघरे वस्तीत सुरळीत पाणी पुरवठासाठी बैठक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कुदळवाडी :** कुदळवाडीतील बालघरे वस्ती येथे पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी प्रितम बाविस्कर आणि स्थानिक लोकप्रतिनिधी दिनेश यादव यांच्या उपस्थितीत एक महत्वपूर्ण बैठक नुकतीच पार पडली.

या भागात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या अनियमित व अपुरा पाणी पुरवठ्यामुळे नागरिक, विशेषतः महिलावर्ग, त्रस्त झाला होता. त्यामुळे समस्या समजून घेण्यासाठी आणि तातडीने उपाययोजना करण्यासाठी ही बैठक आयोजित केली होती. बैठकीस मोठ्या संख्येने महिला नागरिक उपस्थित होत्या. त्यांनी थेट अधिकाऱ्यांपुढे आपल्याला भेडसावणाऱ्या समस्या स्पष्टपणे मांडल्या. यामध्ये वेळेवर पाणी न मिळणे, कमी दाबाने येणारे पाणी, पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता, तसेच टँकर सेवा असमाधानकारक असणे यासारख्या गंभीर मुद्द्यांचा समावेश होता.

नियमित व वेळेवर पाणी पुरवठा, वारंवार होणाऱ्या पाणीटंचाईवर कायमस्वरूपी उपाय, पाईपलाइनमधील बिघाडाचे तत्काळ निराकरण, पाण्याच्या गुणवत्तेची तपासणी व उपाय या विषयी चर्चा झाली.

अधिकारी प्रितम बाविस्कर यांनी महिलांच्या सर्व तक्रारी लक्षपूर्वक ऐकून घेतल्या आणि तात्काळ उपाययोजना केली जातील, असे आश्वासन दिले. लोकप्रतिनिधी दिनेश यादव यांनी प्रशासन आणि नागरिक यांच्यातील संवादाचे महत्त्व अधोरेखित केले आणि भविष्यात अशा संवादात्मक बैठका अधिक नियमितपणे घेण्याचे आश्वासन दिले. बैठक सकारात्मक वातावरणात पार पडली आणि त्यातून प्रशासन व नागरिकांमधील परस्पर विश्वास अधिक दृढ झाला.



# विद्यार्थी आणि महिलांसाठी २७ योजनांची अंमलबजावणी सुरु करा : वाघेरे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील शाळा व महाविद्यालय सुरु झाले असूनही विद्यार्थ्यांसाठी आणि महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या महत्त्वाच्या योजना अद्याप जाहीर झालेल्या नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, साहित्य, तसेच इतर लाभ वेळेवर मिळत नाहीत. या पार्श्वभूमीवर, माजी नगरसेवक संदीप वाघेरे यांनी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे २७ योजनांची अंमलबजावणी तातडीने सुरू करण्याचे निवेदन दिले आहे.

**निवेदनामध्ये मागणी केलेल्या योजना**

०१) इयत्ता ८वी ते १०वीतील विद्यार्थिनींना सायकलसाठी अर्थसहाय्य
०२) SSCमंडळातील इयत्ता १०वीतील मुलींना शैक्षणिक साहित्य खरेदीसाठी सहाय्य
०३) मा. रामभाऊ म्हाळगी योजना-मुलींना तांत्रिक/अभियांत्रिकी प्रशिक्षणासाठी मदत
०४) लोकनायक गोपीनाथ मुंडे योजना-१२वी नंतर वैद्यकीय/अभियांत्रिकी/नर्सिंग अभ्यासक्रमासाठी आर्थिक सहाय्य
०५) सावित्रीबाई फुले पुरस्कार-सामाजिक संस्थांना स्मृतिचिन्ह प्रदान करणे
०६) नोंदणीकृत बचत गटांना व्यवसायासाठी गाळे उपलब्ध करून देणे
०७) राणी लक्ष्मीबाई योजना-मुलींसाठी कुंगफू व कराटे प्रशिक्षण
०८) महिलांसाठी योग प्रशिक्षण
०९) महिलांसाठी व्यवसाय कौशल्यवर्धन प्रशिक्षण
१०) महिलांसाठी चारचाकी वाहन प्रशिक्षण
११) १०वीत ९०% पेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीस
१२) १०वीत ८०% ते ९०% गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीस
१३) १२वीत ९०% पेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीस
१४) १२वीत ८०% ते ९०% गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीस
१५) इ. १ ली ते पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या अनाथ/निराधार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती
१६) ० ते २१ वयोगटातील HIV/AIDSबाधित मुलांचे संगोपन करणाऱ्या पालक/संस्थांना मदत
१७) HIV/AIDS बाधित व्यक्तींना PMPML मोफत बस पास
१८) अल्पसंख्याक समाजातील युवक-युवतींना व्यवसाय प्रशिक्षण
१९) महापालिकेच्या शाळांमधील घरकाम करणाऱ्या मुलांसाठी वार्षिक शिष्यवृत्ती
२०) कचरावेचकांच्या मुला-मुलींना १०वी व १२वीसाठी शिष्यवृत्ती
२१) ८वी ते १०वीत शिक्षण घेणाऱ्या कचरावेचकांच्या मुलांना मोफत सायकल
२२) पं. दीनदयाल उपाध्याय योजना-४ ते १८ वयोगटातील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती
२३) दिव्यांग असल्यामुळे शाळेत जाऊ न शकणाऱ्या मुलांसाठी आर्थिक सहाय्य
२४) दिव्यांग व्यक्तींना PMPML मोफत बस पास सुविधा
२५) ६० वर्षांवरील अंध व्यक्तीसोबत असणाऱ्या एका व्यक्तीस PMPML मोफत बस पास
२६) दिव्यांग विद्यार्थ्यांनाMS-CIT, DTP, TALLYसंगणक प्रशिक्षण
२७) विविध सामाजिक संस्थांना ऐच्छिक अनुदान

ह्या सर्व २७ योजना लवकरात लवकर सुरु झाल्यास पालिकेच्या हद्दीतील हजारो विद्यार्थी, महिला व विशेष घटकांना मोठा दिलासा मिळेल तसेच संबधित विभागास त्वरित कार्यवाही करण्याचे निर्देश द्यावेत अशी आग्रही मागणी आहे.

**- संदीप वाघेरे**



# 'प्रभुणे यांचे कार्य दिशादर्शन करणारे!' : डॉ. पंडित विद्यासागर




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** 'गिरीश प्रभुणे हे कर्मतपस्वी असून सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रांतील त्यांचे कार्य समाजाला दिशादर्शन करणारे आहे!' असे गौरवोद्गार रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर यांनी सोहम् सार्वजनिक ग्रंथालय, संत तुकारामनगर, पिंपरी येथे सोमवार, दिनांक १६ जून २०२५ रोजी काढले. कलारंजन प्रतिष्ठान आणि सोहम् सार्वजनिक ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ समाजसुधारक पद्मश्री गिरीश प्रभुणे यांचा अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त विशेष सत्कार करताना डॉ. पंडित विद्यासागर बोलत होते. महाराष्ट्र ग्रंथालय सेवानिवृत्त उपसंचालक बाबुराव हंद्राळे, भटक्याविमुक्त चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते महादेव गायकवाड, उपमुख्याध्यापक अविनाश यादवाडकर आदी उपस्थिती होते.

डॉ. पंडित विद्यासागर पुढे म्हणाले, 'केंद्र सरकार कौशल्यावर आधारित नवीन अभ्यासक्रमाची आत्ता आखणी करीत आहे; परंतु पुनरुत्थान समरसता गुरुकुलमच्या माध्यमातून गिरीश प्रभुणे यांनी भटक्याविमुक्त समाजातील पारंपरिक कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमाची केलेली अंमलबजावणी हे त्यांच्या द्रष्टेपणाचे द्योतक आहे!'

याप्रसंगी सोहम् ग्रंथालयाच्या अभ्यासिकेतून अभ्यास करून इयत्ता दहावी, बारावी आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह प्रदान करून सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना गिरीश प्रभुणे यांनी. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश संपादन केलेल्या राधिका पिसे यांनी विद्यार्थ्यांच्या वतीने प्रातिनिधिक मनोगत व्यक्त करताना आपल्या यशात सोहम् ग्रंथालयाचा खूप मोठा वाटा आहे, असे नमूद केले.

'पिंपरी - चिंचवड शहराचा नावलौकिक देशपातळीवर नेण्यात गिरीश प्रभुणे यांचे खूप मोठे योगदान असल्याने सत्काराच्या माध्यमातून त्यांच्या कार्याला अभिवादन करण्याची सुसंधी आम्ही घेतली!'. जगन्नाथ नेरकर यांनी ग्रंथालय आणि अभ्यासिकेची माहिती देताना 'अधिकारी घडविणारी संस्था' असा सोहमचा समाजात लौकिक प्रस्थापित झाल्यामुळे मनापासून आनंद वाटतो.

**-श्रीकांत चौगुले**

संपादकीय विशेष

# दिल्लीमध्ये ठसा कुणाचा...

दिल्लीत सहा महिन्यांपुर्वी सत्तेत आलेल्या भाजपने निवडणुकीपूर्वी दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करणे आवश्यक आहे. मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांचे सरकार त्या दिशेने काम करायला लागले आहे; परंतु सरकार योग्य काम करते आहे की नाही, हे पाहण्याची जबाबदारी 'आप'वर आहे. माजी मुख्यमंत्री आतिशी या सरकारविरोधात एकाकी आवाज उठवत असताना 'आप'मधील दिग्गज मात्र निवडणुकीतील पराभवातून अद्यापही सावरलेले नाहीत. 'आप'चे संयोजक अरविंद केजरीवाल पराभवानंतर विजनवासात निघून गेल्यासारखी स्थिती आहे. सरकारला काम करायला संधी दिली पाहिजे. सत्तेत आल्या दिवसांपासून विरोध नको, हे बरोबर असले तरी चार-पाच महिने लोकांच्या प्रश्नांकडे विरोधी पक्षांनी पाठ फिरवणेही योग्य नाही. पराभवातून बाहेर येऊन जनतेबरोबर आहोत, हे दाखवायला 'आप'चे नेते कमी पडत आहेत. उलट, पराभवानंतर पक्ष बांधून ठेवणे हे 'आप'च्या नेत्यांपुढील आव्हान बनत आहे. दिल्लीमध्ये काँग्रेस पक्ष गेल्या 11 वर्षांपासून अस्तित्त्वासाठी संघर्ष करत आहे. विधानसभेत काँग्रेसला खातेही उघडता आले नाही. अशा परिस्थितीत दिल्लीत 'आप' निष्क्रिय रहायला लागला, तर लोक सत्ताधारी पक्षाला पर्याय म्हणून काँग्रेसचाही विचार करायला लागू शकतात. याचा अर्थ लगेच काँग्रेस सत्तेत येईल, असे नाही; परंतु द्विपक्षीय राजकारणाकडे दिल्लीची वाटचाल सुरू होऊ शकेल.



अरविंद केजरीवाल यांनी गेल्या सहा महिन्यांमध्ये जितके लक्ष पंजाब, हरयाणामध्ये घातले, तितके दिल्लीत घातले नाही. हरयाणामध्ये त्यांची जागा काय आहे, हे गेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये दिसले आहे. पंजाबमध्येही सरकारचे फार काही आलबेल आहे, असे दिसत नाही. अशा वेळी 11 वर्षांहून अधिक काळ सत्ता असणाऱ्या दिल्लीकडे त्यांनी पाठ फिरवणे योग्य नाही. त्यामुळे कार्यकर्ते सैरभैर होऊ शकतात. चळवळीतून पुढे आलेल्या पक्षाला एका पराभवाने इतके नाउमेद केल्यास दीर्घकाळ राजकारणात पाय रोवता येणार नाहीत, हे स्पष्ट आहे. लोकसभेत अवघे दोन खासदार निवडून आल्यानंतर फिनिक्स पक्षाप्रमाणे उंच झेप घेणाऱ्या भाजपचा आदर्श अशा बाबतीत तरी घ्यायला हवा. सत्तेत आल्यानंतरआपल्या सरकारने पहिल्या शंभर दिवसांमध्ये काय केले, याचा आढावा मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी अलिकडेच घेतला. गुप्ता यांनी त्यांच्या सरकारला 'लोकांसाठी काम करणारे सरकार' असे संबोधले. अपेक्षांचा डोंगर, राजधानीला जागतिक दर्जाचे बनवण्याची जबाबदारी आणि यमुना स्वच्छतेचे काम हे अजिबात सोपे नाही; पण अशक्यही नाही. पहिल्या शंभर दिवसांमध्ये रेखा गुप्ता सरकारने धोरणात्मक पातळीवर आयुष्मान योजना लागू केली आहे. खासगी शाळांची मनमानी थांबवण्यासाठी शालेय शिक्षण विधेयक, कामगारांचे किमान वेतन वाढवणे आणि यमुना स्वच्छतेसाठी 34 नवीन एसटीपींना मान्यता देणे ही काही कामे समाविष्ट आहेत.

रेखाजींनी केलेल्या इतर काही महत्वाच्या कामांमध्ये आंबेडकर स्टायपँड योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना दरमहा एक हजार रुपये स्टायपँड देण्याची व्यवस्था केली. दिल्लीतील लांबच्या अंतरापर्यंत 'देवी' नावाच्या इलेक्ट्रिक बसेस पोहोचू लागल्या आहेत. दिल्लीमध्ये पहिल्या टप्प्यात 31 आरोग्य मंदिरे सुरू झाली. दिल्लीत पहिले बाल अनुवंशशास्त्र क्लिनिक उघडण्यात आले. ते मुलांच्या दुर्मिळ आजारांवर उपचार करेल. पोलिसांच्या मदतीने महिलांसाठी संवेदनशील ठिकाणी 50 हजार सीसीटीव्ही बसवण्यात आले असून महिला पोलिस कर्मचाऱ्यांची संख्या वाढवण्यात आली आहे. सरकारतर्फे गर्भवती महिलांसाठी 21 हजार रुपयांची मदत देण्याची घोषणा करण्यात आली आहे. केंद्र सरकारच्या पूर्वी दुर्लक्षित असणाऱ्या योजना आता लोकांपर्यंत पोहोचत आहेत. नवे सरकार जाहीरनामा आणि आश्वासनावर काम करत असताना काही घोषणांची मात्र अद्यापही पूर्तता झालेली नाही. महिला सन्मान निधीसाठी पाच हजार कोटींचे बजेट देण्यात आले होते; परंतु अद्यापही महिलांच्या खात्यात 2500 रुपये आले नाहीत. जे जे कॉलनीतील अटल कॅन्टीन अंतर्गत पाच रुपयांत जेवण दिले जाईल, असे सांगण्यात आले. मात्र या आश्वासनाची पूर्तता झालेली नाही. दिल्लीतील अनेक ठिकाणी अजूनही पाण्याची समस्या कायम आहे. आता तर खाण्यापेक्षा पाणी महाग अशी स्थिती झाली आहे. गरजू विद्यार्थ्यांना चार हजार रुपयांपर्यंत मेट्रोमध्ये मोफत प्रवास करण्याचे आश्वासन देण्यात आले होते, ते अजून हवेतच आहे. 'जहां झुग्गी वाहन घर योजने'अंतर्गत काम अद्याप सुरू झालेले नाही. एकंदरीत, सरकारवर दिल्लीला जागतिक दर्जाचे बनवण्याची जबाबदारी आहेच; पण रेखा गुप्ता यांनाही क्षमता सिद्ध करण्याची सुवर्णसंधी आहे.

सरकार स्थापन झाल्यानंतर लगेचच मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी सर्व विभाग आणि राज्य संस्थांना पुढील 100 दिवस, सहा महिने, नऊ महिने आणि एक वर्षात करावयाच्या कामाचा आराखडा सादर करण्यास सांगितले होते. त्यानुसार, मंत्र्यांनी आपापल्या विभागांमध्ये सुरू केलेल्या सर्व प्रकल्पांचे दस्तावेजीकरण करण्यास सुरुवात केली आहे, तसेच कामगिरीची कालमर्यादादेखील नमूद केली आहे. नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर भाजप सरकारने दिल्लीसाठी एक लाख कोटी रुपयांचा अर्थसंकल्प सादर केला. त्यामुळे दिल्लीतील जनतेच्या या सरकारकडून खूप अपेक्षा आहेत. केंद्र सरकार आणि दिल्ली सरकारने यमुना नदीला दिल्लीची जीवनरेखा बनवण्यासाठी आणि तिचे पुनरुज्जीवन करण्यासाठी कामाला गती दिली आहे. केंद्रीय गृह मंत्रालयही यमुना नदी स्वच्छ आणि शुद्ध करण्यासाठी सक्रिय झाले आहे. यमुना नदीच्या पुनरुज्जीवनाच्या बाबतीत आता फक्त दोन मुख्य समित्या काम करतील, इतर सर्व रद्द केल्या जातील. यमुना स्वच्छतेशी आणि पुनरुज्जीवनाशी संबंधित अनेक महत्त्वाच्या बाबींवर बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन होणारी मुख्य समिती ही एक उच्चस्तरीय समिती असेल. दिल्लीतील औद्योगिक क्षेत्रांचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आणि त्यांना स्वच्छ तसेच प्रदूषणमुक्त करण्यासाठी दिल्ली सरकारने सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) स्वीकारण्याचा निर्णय घेतला आहे. नरेला-बवाना येथील पीपीपी मॉडेलच्या यशानंतर आता भोरगड आणि उर्वरित दहा औद्योगिक क्षेत्रेदेखील याद्वारे विकसित केली जातील. त्यावर सरकारने काम सुरू केले आहे.

# आत्मशुद्धीचे साधन : वारी



प्रासंगिक

विठ्ठल वळसेपाटील



पंढरीचा महिमा । देतां आणिक उपमा ।। १ ।।
ऐसा ठाव नाहीं कोठें । देव उभाउभीं भेटे ।। २ ।।
आहेति सकळ । तीर्थे काळे देती फळ ।। ३ ।।
तुका म्हणे पेठ । भूमीवरी हे वैकुंठ ।। ४ ।।

तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगवाणीतून पंढरपूरचा व विठ्ठलाचा महिमा सांगितला आहे. आषाढी व कार्तिकी एकादशी निमित्त विठ्ठलाचा भक्त हा पंढरपूर तिर्थक्षेत्राला विठुरायाला भेटायला जात असतो. तो वारीच्या मार्गाने विठ्ठल नामाचा व संतांचा जयघोष करत जाणे अधिक पसंत करतो. या वारीत सर्व जाती धर्माचे, गरीब-श्रीमंत, लहान थोर मंडळी पंढरीला जातात. या त्रैलोकात पंढरीसारखे दुसरे पवित्र ठिकाण नाही. येथे अंतःकरणापासून भक्ती करणाऱ्या भक्ताला देव दर्शन देतो. तो आपल्या भक्तांच्यात भेदभाव करत नाही. तिथले वातावरण भक्तिमय व पवित्र व निर्मळ झालेले असते. विठ्ठलाची मुर्ती व पंढरीचा सोहळा अनुभवताना जणू काही स्वर्गच अवतरला आहे असे वाटते. यामुळे सोहळा बघून तुकाराम महाराज म्हणतात, हि पंढरी म्हणजे पृथ्वीतलावर उतरलेला स्वर्ग (वैकुंठ) आहे. या वारीत मग्न होऊन चालताना कुठलाच भेदभाव नसल्याने होणाऱ्या भेटीतून मनातील अनेक विकार नाहीसे होतात. यातून आत्मशुद्धीकडे मन सरकते.

१२ व्या शतकापासून अखंडित सुरु असलेली पंढरीची वारी मराठी संस्कृतीचे लेणे लाभलेली परंपरा आहे. युगे युगे या जगात उच्च नीच, व्रण भेद, जाती भेद, धर्म भेद, प्रांत भेद, भाषा भेद अशा अनेक भेदाभेदीने समाज पोखरून गेला होता. यावर संत चोखामेळा महाराजांनी १३ व्या शतकातील समाजव्यवस्थेचे वर्णन आपल्या अभांगातून केले आहे.

'जन्मता विटाळ मरता विटाळ। चोखा म्हणे विटाळ आदिअंती।।'

'आदि अंती अवघा, विटाळ साचला। सोवळा तो झाला कोण न कळे।

उपेक्षित बांधवाच्या उद्धारासाठी, त्यांना माणूस म्हणून जगण्यासाठी समाजातील तेढ कमी व्हावी, जातींमधील संघर्षाची भ्रामक कल्पना नष्ट व्हावी यासाठी त्यांनी भक्तिमार्गाद्वारे प्रयत्न केले. समाजातील अमंगल भेद नष्ट करण्याचे काम संत महात्म्यांनी केले हि परंपरा महाराष्ट्राने जगाला दिली. ती समाजमन शुद्धकरणाची सर्वात मोठी संस्था म्हणजे पंढरीची वारी होय .

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म
भेदाभेद भ्रम अमंगळ ।।
आईका जी तुम्ही भक्त भागवत
कराल ते हित सत्य करा ।।
कोणाही जीवाचा न घडो मत्सर
वर्म सर्वेश्वर पूजनाचे ।।
तुका म्हणे एका देहाचे अवयव
सुख दुःख जीव भोग पावे ।।

संत तुकाराम महाराजांनी वारकरी असणाऱ्यांनी कसे जीवन जगावे याचे या अभांगातून मांडले आहे. वारकरी संप्रदायात विठ्ठल भक्ती बरोबर राम, कृष्ण, दत्त, विष्णू, शिव या देवतांच्या भक्त हि समाविष्ट झाले. शैव व वैष्णव यांचे ऐक साधले. अनेक पंथ यात सामावले गेले. वारकरी संप्रदायाने व्रत वैकल्य, कर्मठपणा, घनघोर तपश्चर्या, कर्मकांड, अंधश्रद्धा अश्या गोष्टींना मूठमाती देऊन त्याग, भोग, स्वधर्माचरण व नैष्कर्म्य यांचा मेळ घातला. अद्वैत भक्ती, ज्ञान, उपासना, श्रद्धा व विवेक यांच्या एकात्मता साधली. स्त्री व शूद्रांनाही या संप्रदायाने धर्म मंदिरात स्थान दिले. अभंगातून संत तुकाराम महाराज सांगतात जरी देह एक असला तरी अनेक अवयव मिळून तो बनला आहे. अवयवांच्या एकत्रीकरणाने एक देह तयार होतो त्यामध्ये एकरूपता निर्माण होते.त्यामुळे सर्वच प्राणिमात्र हे भिन्न दिसत असले तरी सर्वांच्या ठायी असणारा परमात्मा एकच आहे. त्यामुळे कोणाचा द्वेष किंवा मत्सर करू नये. आचरणातून द्वेष किंवा मत्सर निघून गेल्यावर मानवी मन हे शुद्धीकरणाकडे ओढले जाते. हाच खरा वारीचा महिमा आहे.

वारकरी संप्रदायात उपासनेसाठी तुळशीची माळ ग्रंथावर ठेवून गळ्यात घातली जाते. कपाळी बुक्का, गोपीचंदन कापळी व अंगावर लावले जाते. गेरूच्या रंगाने रंगवलेली पताका आणि मुखी रामकृष्ण हरि महामंत्राचा जप, "पुंडलिक वरदा हरि विठ्ठल श्रीगुरु ज्ञानदेव तुकाराम" हे वारकरी संप्रदायाच्या घोषवाक्याचे उच्चारण एवढे साधे मार्ग सांगितले आहेत. नित्य जीवनासाठी सत्य बोलण, परस्त्री मातेसमान, पापकर्मापासून रोखण्यास प्रार्थना, शाकाहारी जीवन, पंढरपूर यात्रा, एकादशीला उपवास व नामसंकीर्तन, रामकृष्ण हरि मन्त्र जप, सांप्रदायिक ग्रंथांचे वाचन, हरिपाठाचे वाचन व नित्य व्यवहारात विठ्ठल नामाचे स्मरण या गोष्टी सांगिल्या असून यात कोठेही कर्मकांड अथवा जीवघेणी उपासना नाही. त्यामुळे या संप्रदायाने एक समतेचा सुंदर विचार हा १२ व्या शतकात रोवला. वैष्णवां संगती सुख...

vithalvase@gmail.com

# हिमनद्यांच्या अस्तित्त्वालाच धोका

पर्यावरण

मिलिंद बेंडाळे

अभ्यासक

नेपाळमधील पर्यायाने आशियातील पहिली हिमनदी मृत झाली आहे. हिंदू कुश हिमालयाच्या ३५०० किलोमीटर लांबीच्या पर्वतरांगांमध्ये असलेल्या हिमनदीचे गेल्या दहा वर्षांपासून सतत निरीक्षण केले जात आहे. हिमालयातील ग्लेशियर (क्रायोस्फिअर) वेगाने वितळत असून हिमनद्यांचे अस्तित्त्व धोक्यात आले आहे. सरकार तसेच प्रशासनाच्या पातळीवर या घटनेची गांभिर्याने नोंद घेतली जायला हवी.

जगभरात हिमनद्यांच्या अस्तित्त्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. हिमालयाचा क्रायोस्फिअर किती वेगाने वितळत आहे याचा हा पुरावा आहे. क्रायोस्फिअर हा पृथ्वीच्या प्रणालीचा घटक आहे. त्यात हिमनद्या, बर्फाचे थर आणि गोठलेले पाणी यांचा समावेश होतो. 1975 पासून जगभरातील पर्वतीय हिमनद्यांमधून सुमारे नऊ ट्रिलियन टन बर्फ गायब झाला आहे. शास्त्रज्ञांच्या मते ही गती अशीच सुरू राहिली तर २१ व्या शतकाच्या अखेरीस बहुतेक हिमनद्या इतिहास बनू शकतात. हिमनद्या नष्ट होणे हे केवळ बर्फाचे नुकसान नाही, तर येणाऱ्या पिढ्यांसाठी पाण्याचे संकट आणि विनाशकारी पुराचा इशारा आहे. अफगाणिस्तान, बांगलादेश, भूतान, चीन, भारत, म्यानमार, नेपाळ आणि पाकिस्तान या आठ देशांमध्ये 3,500 किलोमीटरपेक्षा जास्त लांबीचे हिंदूकुश हिमालयीन पर्वत दहा प्रमुख नदी खोऱ्यांना पाणी पुरवतात. त्यावर 240 दशलक्ष लोक अवलंबून आहेत. सुमारे 1.65 अब्जाहून अधिक लोक पिण्यासाठी आणि स्वच्छता, शेती, जलविद्युत आणि परिसंस्थेच्या सेवांसाठी त्यांच्या पाण्यावर अवलंबून आहेत. हवामान बदलामुळे वाढत्या उष्णतेमुळे हिमनद्यांचे मोठे नुकसान झाले आहे. याचा परिणाम संपूर्ण परिसंस्थेवर होत आहे. हिमनद्या जलद गायब होण्याची प्रक्रिया हिमालयीन परिसंस्था, हवामान संतुलन आणि मानवी जीवनासाठी धोका आहे. हिमनदीसारखी उदाहरणे आपल्याला इशारा देत आहेत की, आपण त्वरित आणि ठोस पावले उचलली नाहीत, तर येत्या काही दशकांमध्ये आपल्याला पाणी संकट, भूस्खलन आणि विनाशकारी पुरांना सामोरे जावे लागेल.

'लँडसॅट ॲनालिसिस रेडी डेटा'मधून मिळवलेल्या 'हिंदू कुश हिमालयीन प्रदेशात २००१ ते २०२१ दरम्यान हिमालयीन प्रदेशात बर्फवृष्टी १३ टक्क्यांनी कमी झाली आहे. या काळात दर वर्षी सरासरी ७५१ चौरस किलोमीटर हिमवर्षाव कमी झाला आहे, जो हवामानबदलाच्या परिणामांचे प्रतिबिंब आहे. अलीकडेच शास्त्रज्ञांना आढळून आले की जून २०२४ पर्यंत सुत्री ढाका हिमनदीतील बर्फाची जाडी ५० टक्क्यांपेक्षा कमी झाली आहे. त्याच वेळी उपग्रह डेटाच्या विश्लेषणातून दिसून आले आहे की माउंट एव्हरेस्टच्या वरच्या भागात बर्फ १५० मीटरने कमी झाला आहे. संशोधकांच्या मते आता बर्फ केवळ वितळत नाही, तर त्याचे थेट बाष्पीभवन होत आहे. त्यामुळे दररोज सुमारे 2.5 मिलीमीटर बर्फाचे नुकसान होत आहे. हे हवामानबदलाच्या वाढत्या परिणामाचे थेट संकेत आहेत. थेट बाष्पीभवन प्रक्रियेवरून स्पष्टपणे दिसून येते की तापमान वाढत आहे. हवेतील आर्द्रता कमी होत आहे आणि सूर्याची किरणे थेट हिमनदीवर पडत आहेत. हिमनद्यांसाठी हे खूप धोकादायक आहे. कारण या प्रक्रियेमुळे बर्फ वेगाने वितळून जातो. त्यामुळे पाणी साचू शकत नाही.


संयुक्त राष्ट्रांच्या पर्यावरण कार्यक्रमात प्रकाशित झालेल्या अहवालात म्हटले आहे की हिमालयासारख्या भागात वाढत्या तापमानाची समस्या तिप्पट आहे. त्यामुळे पर्वतीय हिमनदी वितळतात. परिणामी पूर येऊ शकतो. यामुळे हिमनदींची व्याप्ती कमी होते. त्यामुळे शेती आणि जलविद्युत यांच्यासाठी पाण्याची दीर्घकालीन उपलब्धता कमी होते. तज्ज्ञांचा विश्वास आहे की हिमनद्या वितळल्याने सुरुवातीला नद्यांमध्ये पाणी वाढू शकते; परंतु हळूहळू हिमनद्या संपल्यानंतर या नद्यांची पाण्याची पातळी कमी होऊ लागेल. त्यामुळे भविष्यात गंभीर जलसंकट निर्माण होऊ शकते. हिमनद्या वितळल्याने तयार झालेल्या तलावांमध्ये जास्त पाणी साचत आहे. त्यामुळे हिमनद्या फुटण्याच्या घटनांमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. याचा खालच्या प्रवाहातील जलसंपत्ती, समुद्रपातळी आणि भारतातील अनेक बारमाही नद्यांवर गंभीर परिणाम होईल.

जंगलातील आगी आणि पर्वतांवर वाहनांच्या वाढत्या संख्येमुळे निर्माण होणारे काळे कार्बन कण हिमनद्यांच्या पृष्ठभागावर जमा होतात आणि सूर्यकिरण शोषून घेतात. त्यामुळे बर्फ वितळण्याचा वेग अधिक प्रमाणात वाढतो. हे काळे कण आता हिमालयातील हिमनद्यांचे अदृश्य शत्रू बनले आहेत. वाऱ्यासह हा काळा कार्बन हिमनदीपर्यंत पोहोचत आहे. पर्वतांवर वाहनांची वाढती संख्या काळ्या कार्बन उत्सर्जनाचे एक प्रमुख कारण आहे. काळा कार्बन हा पीएम 2.5 चा एक प्रमुख घटक आहे. तो एक सूक्ष्म कण आहे. त्याच्या उत्सर्जनाचे आरोग्यावर गंभीर परिणाम होतात. २०२१ मध्ये काळ्या कार्बनमुळे होणारे वायूप्रदूषण 8 दशलक्षाहून अधिक अकाली मृत्यूंसाठी जबाबदार आहे. काळ्या कार्बन आणि धुळीसारख्या एरोसोलमुळे हिमालयाच्या पायथ्याशी मुसळधार पावसाच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे भारताचा गंगेचा मैदानी प्रदेश जगातील सर्वात प्रदूषित क्षेत्रांपैकी एक बनतो.

नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, राउरकेला, लाइपझिग इन्स्टिट्यूट फॉर मेटेरॉलॉजी, लाइपझिग विद्यापीठ, 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, मद्रास, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, कानपूर येथील संशोधकांच्या पथकाने केलेल्या अभ्यासात वर नमूद केलेले अनेक धोके समोर आले आहेत. या संशोधकांनी दाखवून दिले की कण उत्सर्जनामुळे ढग प्रणालींचे भौतिक गुणधर्म बदलू शकतात. परिणामी, प्रदूषित शहरी भागात पावसाच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. हिमाचल आणि नुब्रा खोऱ्यांमध्ये हिमवर्षाव कमी होत आहे. 'इस्रो' आणि 'हिमकोस्ट'च्या अहवालात म्हटले आहे की हिमाचल प्रदेश आणि नुब्रासारख्या खोऱ्यांमध्ये दर दशकात सरासरी दोन मिलीमीटर हिमवर्षाव कमी झाला आहे. त्याच वेळी पावसाच्या प्रमाणात वाढ झाल्याने हवामान असंतुलन आणखी वाढले आहे. ही खोरी काराकोरम आणि ग्रेट हिमालयीन पर्वतरांगांमध्ये येतात. हवामानबदलामुळे दोन्ही खोऱ्यांमध्ये बर्फवृष्टी कमी झाली आहे; परंतु पाऊस वाढला आहे. गेल्या तीन दशकांमध्ये डिसेंबर महिन्यात बरेच चढउतार दिसून आले आहेत. 'डीआरडीओ'चे शास्त्रज्ञ एम. आर. भुतियानी यांनी एका संशोधनात भाकित केले आहे की, पुढील 120 वर्षांमध्ये वायव्य हिमालयातील कमाल तापमान तीन अंशांनी वाढू शकते. तापमानात झालेल्या या वाढीमुळे पर्वतांच्या हवामानात बदल होईल. अशा परिस्थितीत येणाऱ्या काळात बर्फवृष्टीत आणखी घट दिसून येऊ शकते.

'चायनीज अॅकेडमी ऑफ सायन्स अँड कॉलेज ऑफ अर्थ अँड एन्व्हायर्नमेंटल सायन्स'च्या संशोधकांना संशोधनात आढळून आले की सामान्यतः हिमनदीतील बर्फावर सूर्यप्रकाश पडतो, तेव्हा तो शंभर टक्के परावर्तीत होतो; परंतु बर्फावर जमा होणारे प्लास्टिकचे छोटे कण सूर्यप्रकाश शोषून घेतात. यामुळे तापमान वाढते आणि हिमनदी वितळू लागते.

२१ व्या शतकात तिबेटी पठारावर साठलेल्या हिमनद्या २१ टक्क्यांपर्यंत वितळतील, अशी अपेक्षा आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात हिमनद्यांमधून येथून निघणाऱ्या नद्यांमध्ये येणाऱ्या पाण्याचे प्रमाण 28 टक्क्यांपर्यंत कमी होऊ शकते. एका अभ्यासानुसार १९६० ते २००० दरम्यान तिबेटमधील नाम को सरोवराजवळील हिमनदीच्या जलद वितळण्यात मायक्रोप्लास्टिक्सचा वाटा आठ टक्के होता. लहान प्लास्टिक कणांमुळे येथील तापमान अडीच अंशांनी वाढले. मायक्रोप्लास्टिक्स व्यतिरिक्त काळ्या कार्बनमुळे हिमनद्या वेगाने वितळत आहेत. आर्क्टिकच्या काही भागात काळ्या कार्बनमुळे जुलै ते सप्टेंबर दरम्यान बर्फ वितळण्याचा दर एक ते तीन टक्क्यांनी वाढला. यावरून हिमनद्या नष्ट करण्यास हवामानबदल आणि मानव कसा जबाबदार आहे, हे लक्षात येते. या घडामोडींची गांभिर्याने नोंद घेणे आवश्यक आहे.




## राशीभविष्य

- **मेष** : अपेक्षित संधी लाभतील. महत्त्वाच्या घटना घडतील. अनुकूलता वाढेल.
- **वृषभ** : नव्या ओळखी वाढतील. स्थावर मालमत्तेचे प्रश्न मार्गी लागतील. प्रगती साधाल.
- **मिथुन** : अडचणीतून मार्ग निघेल. दगदग करू नये. विनाकारण वितंडवाद टाळावेत.
- **कर्क** : नव्या योजना मार्गी लागतील. अपेक्षित घटना घडतील. कला– गुणांचा विकास होईल.
- **सिंह** : सौख्याच्या घटना घडतील. मित्रांचे सहकार्य लाभेल. चांगली वार्ता कळेल.
- **कन्या** : आर्थिक स्थितीत समाधानकारक प्रगती होईल. नव्या विचारांना गती येईल. अनुकूलता वाढेल.
- **तूळ** : अंगीकृत कार्यात अनुकूलता वाढेल. महत्त्वाच्या गाठीभेटी होतील. समाधानी रहाल.
- **वृश्चिक** : कौटुंबिक जीवनात आनंददायक घटना घडतील. आवक चांगली राहील. उत्तम दिवस.
- **धनु** : मतभेदाचे प्रसंग टाळावेत. प्रगतीच्या घटना घडतील. प्रकृतीच्या तक्रारी संभवतात.
- **मकर** : अडचणीतून मार्ग निघेल. योजना मार्गी लावू शकाल. घरगुती तक्रारींना तोंड द्यावे लागेल.
- **कुंभ** : महत्त्वाचे व्यवहार मार्गी लागतील. अनावश्यक खर्च टाळावा. प्रगतीच्या संधी लाभतील.
- **मीन** : आर्थिक प्राप्ती समाधानकारक राहील. कौटुंबिक सुख लाभेल. घाईने निर्णय घेऊ नका.

## स्टाईल स्टेटमेंट — स्टायलिंग ऑफ शोल्डरचं

कालातील बदलानुसार आजकाल अनेक महिला–मुलीही ऑफ शोल्डरची स्टाईल आपलीशी करताना दिसत आहेत. या स्टायलिंगमधील काही नवे ट्रेंडस जाणून घेऊ.

✻ अनेक महिला अप्पर बॉडीचं वजन जास्त असल्याने ऑफ शोल्डर ड्रेस कॅरी करणं टाळतात. अशांसाठी टिअर ऑफ शोल्डर ड्रेस उत्तम पर्याय आहे. पण तुम्ही स्लिम असाल तर बेल्ट लावून कर्व्हज हायलाईट करू शकता. ✻ इव्हनिंग पार्टीला जाण्याच्या तयारीत असाल तर ट्युनिक ऑफ शोल्डर ड्रेस सर्वोत्तम पर्याय आहे. यावर फक्त नेकलेस घालून पार्टीसाठी तयार होऊ शकता. ✻ ऑफ शोल्डर स्टायलिंगला खुलवणारा ड्रेस प्रकार म्हणजे गाऊन. यावर पर्ल किंवा स्टोन्सचे एअरिंग्ज घातल्यानंतर एलिगंट लूक मिळण्यास मदत होईल. ✻ ऑफ शोल्डर ड्रेससोबत फ्रिल्स किंवा कट स्लीव्हज टॉपही ट्रेंडमध्ये आहेत. क्रॉप टॉप वर तर हायवेस्ट जेगिंग्ज किंवा जीन्स ट्राय करू शकता. ✻ ऑफ शोल्डर टॉप ऑफिसमध्ये कॅरी करणार असाल तर इलास्टिकवाल्या टॉपची निवड करावी. या टॉप्सना डेनिमसोबत पेअर करावं.

## १८ जून — दिनविशेष

- **२०१३ :** उत्तर भारतात पावसाचा कहर. उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेशमध्ये हजारो पर्यटक अडकले.
- **२०१५ :** 'स्विस' बँकेमध्ये भारतीयांच्या पैशांत घट होत असल्याची माहिती.
- **२०१७ :** एक जुलैपासून जीएसटी लागू होणार असल्याचं अर्थमंत्र्यांचं प्रतिपादन.
- **२०१८ :** नायब राज्यपालांच्या कार्यालयात धरणे आंदोलन करण्याची परवानगी कोणी दिली, दिल्ली उच्च न्यायालयाची 'आप' सरकारकडे विचारणा.

## सफर देशांची — उगवत्या सूर्याचा देश

जपान हा देश इतर अनेक बाबतीतही वैशिष्ट्यपुर्ण आहे. या देशात लेखनाच्या चार पद्धती आहेत. सुमो रेसलिंग हा जपानचा राष्ट्रीय खेळ आहे. हे सुमो रेसलर्स इतर खेळाडूंच्या मानाने तसे बेढब असतात. परंतु जपानमध्ये त्यांना मोठा मान दिला जातो. ग्रेटर टोकियो हा जगातला सर्वाधिक शहरीकरण झालेला भाग आहे. ३० दशलक्षांपेक्षा जास्त लोक या भागात राहतात. टोकियोतलं 'त्सुकिजी' हे जगातलं सर्वात लांब माशांचं मार्केट आहे. जपान हा ऑटोमोबाईल क्षेत्रातला आघाडीचा देश आहे. इथले लोक भरपूर प्रमाणात भात खातात. नाश्त्यापासून रात्रीच्या जेवणापर्यंत त्याच्या आहारात तांदळापासून बनलेल्या पदार्थांचा समावेश असतो. जपानमध्ये तांदूळ, भाज्या, बीट, यांचं उत्पादन होतं. येन हे जपानचं चलन आहे. या देशात जपानी भाषा बोलली जाते. इथले लोक बौद्ध आणि शिंतो अशा दोन धर्मांचं पालन करतात. धर्मांचा त्यांच्यावर फार मोठा प्रभाव नसला तरी काही धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन केलं जातं. विशेष म्हणजे दुसऱ्या महायुद्धात जपानमधील हिरोशिमा आणि नागासाकी या शहरांवर अमेरिकेने अणुबॉंब टाकूनही जपानने मोठी प्रगती केली आहे.

## पंचांग

**बुधवार, १८ जून २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
ज्येष्ठ कृ. ७, नक्षत्र : पू. भाद्रपदा
चंद्रराशी : कुंभ, योग : प्रीती आयुष्मान
सूर्योदय: ६.०४, सूर्यास्त: ७.१६

## फॉरवर्डस

**तालाबों पर चौकीदारी करने वालें...**

**समुंदर पे राज नही करतें।**

## आरोग्यमंत्र — लोआइंसिस, दुर्मिळ आजार

लोआइंसिस हा एक दुर्मिळ आजार आहे. लोआ लोआ फाईलेरियासिस, आफ्रिकन आय वर्म, फ्युजिटिव स्वेलिंग आदी नावांनी हा आजार ओळखला जातो. या आजारामध्ये डोळ्यांबरोबरच त्वचादेखील प्रभावित होते.

लोआ लोआ नामक कृमीमुळे हा आजार बळावतो. एका विशिष्ट प्रजातीच्या माशीच्या डंखातून माणसाला या आजाराची लागण होते. या डंखामधून लोआ लोआ नामक कृमी शरीरात प्रवेश करतात आणि मुक्त संचार करु लागतात. डोळ्यांमध्ये त्यांची उपस्थिती, त्यांचं वळवळणं स्पष्ट दिसू शकतं. त्यांच्या हालचालीमुळे डोळ्यांमध्ये वेदना जाणवू लागतात. या कृमी त्वचेच्या खालच्या भागामध्ये वावरत असताना खाज अथवा कंड जाणवतो आणि संबंधित भाग सुजतो, लाल होतो. कृमी वयस्क होण्याची प्रक्रिया चार वर्षं चालते. या पूर्ण कार्यकाळात कृमींची संख्या प्रचंड वाढते. या कृमी शरीरामध्ये मुक्त संचार करत असल्यामुळे वेळोवेळी शरीराच्या वेगवेगळ्या भागांमध्ये सूज जाणवते आणि खाज उत्पन्न होत राहते.

काही दिवसांनंतर रुग्णाची त्वचा अत्यंत संवेदनशील बनते. या कृमी मेंदूपर्यंत पोहोचल्यास इनसिफेलायटिसचं कारण बनतात. म्हणूनच याकडे तातडीनं लक्ष द्यावं.

## भटकंती

आयुष्यात एकदा तरी परदेशवारी करावी, अशी प्रत्येकाची इच्छा असते. पैशांच्या बाबतीत मित्रमंडळी आणि ब्लॉग्जवर अवलंबून राहू नका. स्वस्त आणि महाग याबाबतीतली प्रत्येकाची व्याख्या वेगळी असू शकते. फॉरेन ट्रिप यशस्वी व्हावी, यासाठी काय करावं याविषयी...

✻ प्रवासाला लागणारा कालावधी लक्षात घ्या. तुम्हाला छोटी ट्रिप करायची आहे की पंधरा वीस दिवसांसाठी फिरायला जाणार आहातयाचा विचार करा. छोट्या कालावधीतील सहलींच्या तुलनेत जास्त कालावधीच्या सहलींमुळे पैशात बचत होऊ शकते. क्रमशः

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

## At a Glance

### सुधाकर बडगुजर यांचा भाजपमध्ये प्रवेश

**मुंबई :** नाशिकमधील मोठे नेते सुधाकर बडगुजर यांनी आज भाजपमध्ये प्रवेश केला. मुंबईमधील पक्ष कार्यालयात हा प्रवेश सोहळा पार पडला. सुधाकर बडगुजर यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याने नाशिकच्या राजकारणाला कलाटणी मिळण्याची शक्यता आहे. या प्रवेशामुळे नाशिक महापालिकेच्या निवडणुकीपूर्वी भाजपची ताकद वाढली. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन आणि कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थित हा पक्षप्रवेश पार पडला. भाजपमध्ये पक्षप्रवेश करण्यापूर्वी सुधाकर बडगुजर यांनी जोरदार शक्तिप्रदर्शन केले. त्यांच्या कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली.

### पुणे काँग्रेसचा गोंधळ थांबवण्यासाठी मुंबईत निर्णायक बैठक

**पुणे :** पुणे शहर काँग्रेसमध्ये गेल्या काही महिन्यांपासून सुरू असलेली अंतर्गत गटबाजी, नेतृत्वावरून निर्माण झालेला संघर्ष आणि पक्षातून होत असलेली गळती यामुळे पक्षाची अवस्था चिंताजनक झाली आहे. आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या गोंधळावर तोडगा काढण्याच्या उद्देशाने काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पुढाकार घेतला आहे. या पार्श्वभूमीवर सपकाळ यांनी पुण्यातील काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांना मुंबईत बोलावून घेतले असून, बुधवारी (१८ जून) या सर्व नेत्यांची एक महत्त्वपूर्ण बैठक मुंबईत होणार आहे.

# महत्त्वाकांक्षी आरोग्य मित्र योजना

## महिला आयोगाकडून इतिहासात प्रथमच ऊसतोड महिलांसाठी व्यापक आरोग्य कार्यक्रम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



> ऊसतोड महिला कामगार हा आता शोषित घटक नसून तो सर्वात सुरक्षित घटक म्हणून समजला जाईल या वर्गाच्या कष्टाच्या आणि वेदनेचा आता अंत होणार आहे सर्वतोपरी सामाजिक आणि आरोग्य सुरक्षा प्रदान करत या घटकाला आम्ही सन्मान मिळवून देऊ यासाठी आरोग्य मित्र ही योजना प्रस्तावित करण्यात आली आहे **-रूपालीताई चाकणकर, अध्यक्षा, महाराष्ट्र राज्य महिला आयोग**

**छत्रपती संभाजीनगर :** गेल्या अनेक वर्षांपासून दुर्लक्षित राहिलेल्या राज्यातील ऊसतोड महिला साठी राज्य महिला आयोगाने आरोग्य मित्र योजना पुढे आणली आहे. या योजनेच्या माध्यमातून ऊसतोड कामगार महिलांच्या आरोग्य समस्या बालविवाह महिला अत्याचार विषयक आढावा घेत त्यांना न्याय देण्याची भूमिका पार पाडली जाणार आहे. राज्याच्या इतिहासात इतक्या व्यापक प्रमाणात केवळ एका घटकाकरिता असा व्यापक कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे.

महिलांवरील अन्याय, अत्याचार थांबवून त्यांना सुरक्षितता प्रदान करण्यासाठी तसेच त्यांना तक्रारी दाखल करण्यासाठी योग्य व्यासपीठ मिळावे, यासाठी महिला आयोग कायम आपल्या सोबत आहे. ऊसतोडणी कामगार महिलांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी 'आरोग्य मित्र' उपक्रम राबविण्यात येईल, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी येथे केले. बालविवाह रोखण्याची मोहिम प्रभावीपणे राबवावी असे आवाहनही त्यांनी केले.

विभागीय आयुक्त कार्यालयात ऊसतोड कामगार महिलांच्या गर्भपिशवी काढणे तसेच त्यांच्या आरोग्य समस्या, बालविवाह, महिला अत्याचार याबाबत महिला आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती चाकणकर यांनी आढावा घेतला. त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी आयोगाच्या उपसचिव डॉ. पद्मश्री बैनाडे, छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र, पोलीस आयुक्त श्री प्रवीण पवार, छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, अपर आयुक्त विजयसिंह देशमुख, पोलिस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अंकित, बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव साळुंके यांच्यासह विविध विभागाचे विभागप्रमुख यावेळी उपस्थित होते.

चाकणकर म्हणाल्या की, महिला आयोगाच्या वतीने राज्यात बालविवाह, गर्भलिंग निदानचाचणी, स्त्रीभ्रूणहत्या, हुंडाबळी, विधवा, एकल महिला यांच्या समस्या आदींबाबत जनजागृती करण्यात येत आहे. बालविवाह रोखण्यासाठी सर्व पातळीवर प्रयत्न सुरू आहेत. या कामामध्ये गावपातळीवर सरपंच, पोलीस पाटील, ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्त्यांची महत्वाची भूमिका असून गावातील नागरिकांनी स्थानिक प्रशासनाच्या मदतीने कोणाच्या दबाबाला बळी न पडता बालविवाह आदी कुप्रथा रोखण्यासाठी संकल्प करावा. समाजातील वाढती बालविवाहाची कुप्रथा रोखणे हे सर्वांचे कर्तव्य असून बालविवाह रोखण्याची मोहिम प्रभावीपणे राबवावी, यासाठी प्रशासकीय यंत्रणांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

बीडसह मराठवाडयातील अनेक जिल्हयात ऊसतोड महिला कामगार स्थलांतर करतात, त्यांच्या आरोग्याच्या अनेक समस्या समोर आल्या आहेत, यासाठी बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या संकल्पनेतून यावर्षी 'आरोग्य मित्र' उपक्रम राबविण्यात येत आहे, या उपक्रमा अंतर्गत ऊसतोडणीसाठी स्थलांतर करणाऱ्या महिलेसाठी त्याच समुहातील एकाची आरोग्य मित्र म्हणून नेमणूक करण्यात येणार आहे, आरोग्य मित्र ऊसतोड महिलेला येणाऱ्या आरोग्याच्या समस्याबाबात गावातील आशासेविका तसेच अंगणवाडी सेविकांच्या संपर्कात असेल. यातून ऊसतोडणीसाठी स्थलांतर करणाऱ्या महिलांना आरोग्याच्या सेवा तत्परतेने देणे शक्य होणार आहे, ही अभिनव संकल्पना नक्कीच उपयुक्त ठरेल, असा विश्वास चाकणकर यांनी व्यक्त केला.

# रशियाकडून युक्रेनमध्ये ड्रोन, क्षेपणास्त्रांचा मारा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** रशियाने युक्रेनवर केलेल्या ड्रोन आणि क्षेपणास्त्रांच्या माऱ्यात किमान १५ जण ठार झाले आणि ११६ जण जखमी झाले आहेत. रशियाने राजधानी किव्हवर रात्रीच्यावेळी केलेल्या या हल्ल्याच्यावेळी स्थानिक नागरिक झोपेतच होते.

या बॉम्बफेकीमुळे राजधानी किव्हमधील ९ मजली इमारत कोसळली असून डझनभर अन्य इमारतींचे मोठे नुकसान झाले आहे. किव्हमध्ये १४ जण ठार आणि ९९ जण जखमी झाले असल्याचे किव्ह शहराच्या लष्करी प्रशासकांनी सांगितले.

याशिवाय रशियाने युक्रेनच्या दक्षिणेकडील ओडेसा या बंदराच्या शहरावर देखील ड्रोनचा मारा केला. त्यात एक ठार झाला आणि १७ जण जखमी झाले. रशियाच्या सैन्याने रात्रीभरात युक्रेनवर ४४० पेक्षा जास्त ड्रोन आणि ३२ क्षेपणास्त्रे डागली.

रशियाने थेट नागरी वसाहतींवर हा हल्ला केला. जवळपास ९ तास हा ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचा मारा सुरू होता. एकूण २७ ठिकाणी रशियाने ड्रोन आणि क्षेपणास्त्रे डागली. स्वियातोशिंस्की आणि सोलोमियान्स्की या जिल्ह्यातही काहीजण जखमी झाले आहेत. या माऱ्यात जखमी झालेल्यांमध्ये अमेरिकेच्या एका नागरिकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला, असे स्थानिक अधिकाऱ्यांनी सांगितले.

# अयातुल्ला खामेनी यांना फासावर लटकवणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** \इस्रायल आणि इराणमधील तणाव शिगेला पोहोचला आहे. इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांना जीवे मारण्याची धमकी दिली आहे. ते म्हणाले की, खामेनी मारले जातील, तरच हे युद्ध थांबेल.

असे म्हटले जाते की, यापूर्वी इस्रायलने खामेनी यांच्या हत्येची पूर्ण योजना आखली होती, पण ऐनवेळी अमेरिकेच्या डोनाल्ड ट्रम्प सरकारने इस्रायलच्या योजनेला ब्रेक लावला. आता इस्रायलचे संरक्षणमंत्री इस्रायल काट्झ यांनी मंगळवारी मोठी धमकी दिली. ते म्हणाले की, खामेनी यांचे नशीब इराकचे हुकूमशहा सद्दाम हुसेन यांचेही असणार आहे. सद्दामप्रमाणेच खामेनी यांनाही इराणमध्ये फासावर लटकवण्यात येणार आहे. हा आतापर्यंतचा सर्वात थेट आणि गंभीर धोका मानला जात आहे. त्याचबरोबर इस्रायल लवकरच काहीतरी मोठं करणार असल्याचंही संकेत मिळत आहेत. दरम्यान, इस्रायलला या धोकादायक योजनेची चिंता सतावत आहे.

# बंगळुरू चेंगराचेंगरी- उच्च न्यायालयाची नोटीस

## याचिकेची पुढील सुनावणी २३ जून २०२५ रोजी निश्चित

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बंगळुरू :** चिन्नास्वामी स्टेडियममध्ये झालेल्या चेंगराचेंगरीप्रकरणी मंगळवारी उच्च न्यायालयाने आरसीबी, डीएनए कंपनी आणि केएससीए यांना नोटीस बजावली आहे. बेंगळुरूच्या एम. चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर ४ जून २०२५ रोजी रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू (आरसीबी)च्या आयपीएल विजयाच्या उत्सवात झालेल्या चेंगराचेंगरीच्या दुर्घटनेने संपूर्ण क्रिकेट विश्व हादरले. या घटनेत ११ जणांचा मृत्यू झाला आणि ५६ हून अधिक जण जखमी झाले.



या प्रकरणी कर्नाटक उच्च न्यायालयाने स्वतःहून (सु-मोटो) जनहित याचिका दाखल करत रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू (आरसीबी), इव्हेंट मॅनेजमेंट कंपनी डीएनए एंटरटेनमेंट नेटवर्क्स प्रायव्हेट लिमिटेड आणि कर्नाटक राज्य क्रिकेट असोसिएशन (केएससीए) यांना नोटीस बजावली आहे. याचिकेची पुढील सुनावणी २३ जून २०२५ रोजी निश्चित करण्यात आली आहे. या दुर्घटनेची चौकशी करुन राज्य सरकारने या प्रकरणाबाबत न्यायालयाला अहवाल सादर केला आहे.

सध्या जखमींवर स्थानिक रुग्णालयांमध्ये उपचार सुरू आहेत आणि पोलीस प्रशासनाने घटनेच्या चौकशीसाठी स्वतंत्र समिती नियुक्त केली आहे. सोशल मीडियावर या कार्यक्रमातील अनियंत्रित गर्दीचे व्हिडीओ मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाले होते.

४ जून रोजी आरसीबीच्या ऐतिहासिक आयपीएल विजयाचा उत्सव साजरा करण्यासाठी हजारो चाहत्यांनी स्टेडियमबाहेर गर्दी केली होती. गर्दी नियंत्रणात आणण्यात यंत्रणांना अपयश आल्याने अचानक चेंगराचेंगरी झाली. या दुर्घटनेमुळे कर्नाटकातील प्रशासन, पोलिस आणि आयोजक संस्थांच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. न्यायालयीन चौकशी आणि २३ रोजी होणाऱ्या सुनावणीमुळे या प्रकरणातील संबधित काय कारवाई होणार याकडे अनेकांचं लक्ष लागून राहिले आहे.

# अमरनाथ यात्रेसाठी युद्धपातळीवर तयारी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** अमरनाथ यात्रा ३ जुलैपासून सुरू होणार असून, यात्रेनिमित्त कडक सुरक्षा व्यवस्था करण्यात येत आहे. सरकारने एक मोठा निर्णय घेतला आहे. यात्रेची सुरक्षा मजबूत करण्यासाठी गृह मंत्रालयाच्या सल्ल्यानुसार जम्मू-काश्मीर सरकारने पहलगाम आणि बालताल एक्सप्रेसवर हवाई निर्बंध लादले आहेत. यामुळे, संपूर्ण तीर्थयात्रा मार्ग आता 'नो फ्लाइंग झोन' म्हणून घोषित करण्यात आला आहे. सरकारने हे पाऊल सुरक्षेसाठी उचलले आहे. केंद्रशासित प्रदेशाच्या गृह विभागाने पहलगाम आणि बालटाल मार्गांसह सर्व अमरनाथ यात्रा मार्गांना 'नो फ्लाइंग झोन' म्हणून घोषित केले आहे.

# बिहार विधानसभा निवडणूक लढवणार - अरविंद केजरीवाल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पाटणा :** बिहारमधील विधानसभा निवडणुकीपूर्वी यांच्या आम आदमी पक्षाने एक मोठी घोषणा केली आहे. पक्षाने निवडणुकीत स्वतःचे उमेदवार उभे करणार असल्याचे जाहीर केले आहे. आप विधानसभा निवडणुका जोरदारपणे लढेल. जागांबद्दल येथील मित्रपक्ष आणि केंद्रीय नेतृत्व निर्णय घेईल असेही आपचे खासदार संजय सिंह यांनी सांगितले.

सिंह यांनी भाजप-जेडीयू युतीवर निशाणा साधत म्हटले की, सुशासनाचे दावे दररोज उघड होत आहेत. आज येथे येण्याचा उद्देश असा आहे की, भाजप आणि पंतप्रधान मोदी बिहारमधील लोकांवर जे प्रेम दाखवतात, त्याचप्रमाणे दिल्लीतील भाजपचे लोक बिहारच्या लोकांना शत्रू मानतात. ज्या घरांमध्ये हे लोक ४०-५० वर्षे राहत होते, तिथे त्यांच्या घरांवर बुलडोझर चालवले जात आहेत. दिल्ली विधानसभा निवडणुकीपूर्वी भाजपच्या लोकांनी बिहार, उत्तर प्रदेश आणि पूर्वांचलमधील लोकांना बांगलादेशी म्हटले आणि त्यांचा अपमान केला. मी संसदेतही आवाज उठवला. आम्ही बिहारमधील लोकांना सांगू इच्छितो की बिहारमधील लोकांना दिल्लीतून हाकलून लावणाऱ्या भाजपला बिहारमधून हाकलून लावा, असे आवाहन त्यांनी केले.

पान १ वरून

### शेतीसाठी एआय धोरण मंजूर

विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सुविधा उपलब्ध होणार. (महसूल विभाग)

धारावी पुनर्विकास प्रकल्पातील विशेष हेतू कंपनी आणि अन्य यंत्रणा दरम्यानच्या भाडेपट्टा करारावरील मुद्रांक शुल्क माफ. लोकहितार्थ मोठा प्रकल्प असल्याने, पुनर्वसन व पुनर्विकास योजनेला गती लाभणार. योजनेची अंमलबजावणी सुलभ रीतीने होणार. (महसूल विभाग)

केंद्र सरकारच्या प्रकल्पाअंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्रांची उभारणी करण्यात येणार. यासाठी महावेध प्रकल्पास मुदतवाढ देण्याचा निर्णय. राज्यातील सर्व गावांमध्ये हवामान विषयक अचूक माहिती मिळावी यासाठीचा प्रकल्प. शेतक-यांना हवामानाधारित कृषि विषयक सल्ला व मार्गदर्शनासाठी महत्वाचा प्रकल्प. (कृषि विभाग)

मुंबई मेट्रो मार्ग-२अ, २ ब आणि ७ या मेट्रो प्रकल्पांकरिता एशियन डेव्हलपमेंट बँक व न्यू डेव्हलपमेंट बँक यांच्याकडून घेण्यात येणा-या कर्जास मुदतवाढ (नगरविकास विभाग)

विरार-अलिबाग बहुउद्देशीय वाहतूक मार्गिका प्रकल्प आता "बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा" या तत्त्वावर हाती घेण्यास मान्यता. (सार्वजनिक बांधकाम विभाग)

आणीबाणीत कारावास भोगलेल्यांच्या मानधनात दुप्पटीने वाढ. हयात जोडीदारालाही मानधन मिळणार. गौरव योजनेमध्ये सुधारणा.

(सामान्य प्रशासन विभाग)

अनिवासी भारतीयांच्या मुलांना, पाल्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश मिळणार. विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थेतील अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अनिवासी भारतीयांच्या व्याख्येत बदल. तसेच प्रवेश व शुल्क यांचे विनियमन अधिनियम, २०१५ मध्ये सुधारणा. (उच्च व तंत्र शिक्षण विभाग)

### मध्य पूर्वेतील संघर्षाने चिंता

आणि वायूचे साठे कमी होतील, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. आपण किती तयारी केली आहे हे महत्वाचे नाही. जगभरातील सर्वच अर्थव्यवस्थांना याचा फटका बसणार आहे. पुरवठा खंडित झाल्यास तेलाच्या किमतीतही वाढ होणार आहे. अतिरिक्त पुरवठ्यासाठी भारत पश्चिम आफ्रिकेकडे वळला, तर इतर आयातदारही याच मार्गाने जातील.

भारत आपल्या गरजेपैकी ९० टक्के कच्च्या तेलाची आयात करतो. यात सर्वाधिक वाटा आखाती देशांचा आहे. भारताच्या एकूण कच्च्या तेलापैकी ३५ टक्के रशियाकडून, ४० टक्के आखाती देशांतून आणि उर्वरित आफ्रिका, अमेरिका आणि इतर देशांमधून येते. आफ्रिकेने मे महिन्यात केवळ पाच टक्के तेल आयात केले होते, तर एप्रिलमध्ये ते १२ टक्के होते. एवढं सगळं असूनही भारतीय रिफायनरी सध्या 'पॅनिक बायकिंग' टाळत आहेत.

### संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी समन्वय आवश्यक - जिल्हाधिकारी

व्यापकस्वरुपात जनजागृती करावी. पावसाळ्यात धोकादायक नसलेल्या तथापि पाणी साचणाऱ्या रस्त्यावर बॅरिकेट करावे. पर्यटकांच्या सुरक्षितेतच्यादृष्टीने त्यांना धोकादायक पयर्टनस्थळी जाण्यास प्रतिबंधित करावे तसेच पर्यटनस्थळी व रस्त्यावर दिशादर्शक फलके लावावीत, याठिकाणी वन व्यवस्थापन समितीची मदत घ्यावी, आवश्यकतेप्रमाणे अतिरिक्त कर्मचाऱ्यांची नियुक्त करावी. धोकादायक ठिकाणी मॉकड्रील आयोजित करावे. तालुकास्तरीय नियंत्रण कक्ष २४ तास सुरु ठेवावेत.

मान्सून काळात संभाव्य पुरपरिस्थिती लक्षात घेता पूरबाधित गावांची पाहणी करुन आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. नदी पात्रातील पूररेषेखाली येणाऱ्या झोपडपट्ट्या, अतिक्रमणे काढण्याची कार्यवाही संबंधितांनी करावी. आपदा मित्रांना आवश्यतेप्रमाणे पायाभूत सूविधा उपलब्ध करुन देण्यासोबतच त्यांची कार्यशाळा आयोजित करावी. चांगले काम करणाऱ्या आपदा मित्रांना सन्मानित करावे. आरोग्य विभागाने रुग्णालय, खाटा, वैद्यकीय अधिकारी, रुग्णवाहिका, रक्तपेढी, औषधे साठा तयार ठेवावे. गावातील रेनगेज स्टेशनची सद्यस्थिती पडताळून कार्यान्वित असल्याची खात्री करावी. गर्दीच्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त व जीवरक्षक पथकाची नियुक्ती करावी. महावितरणने वीजेचे खाब, रोहित्र, तारांची तपासणी करावी, असेही त्यांनी सांगितले.

### नागपूरमध्ये फार्मा कंपनीत स्फोट

अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. दरम्यान, भिलगाव येथील अंकित पल्प्स अँड बोर्ड्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या युनिटच्या काचेच्या लाईन रिॲक्टरमध्ये हा स्फोट झाल्याचं पोलिसांनी सांगितलं. परंतु या स्फोटाचं कारण लगेच कळू शकलं नाही.

# वरंध घाट ३ महिने अवजड वाहतुकीसाठी बंद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्यात पावसाने जोर धरलेला असताना काही भागांत पूरस्थिती तर काही ठिकाणी दरड कोसळण्याचे प्रकार घडत आहेत. या पार्श्वभूमीवर सुरक्षिततेचा उपाय म्हणून पुणे जिल्हा प्रशासनाने पुणे-भोर मार्गे महाडकडे जाणारा वरंध घाट तीन महिन्यांसाठी अवजड वाहनांसाठी बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.



**प्रशासनाची सुरक्षिततेसाठी आग्रही भूमिका**

● घाटातील वाहनचालक व प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी हा निर्णय घेतल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले असून, नागरिकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहनही करण्यात आले आहे. रस्त्याची स्थिती सुधारल्यावर आणि हवामान स्थिर झाल्यानंतर घाट पुन्हा वाहतुकीसाठी खुला करण्यात येईल, असेही प्रशासनाने सांगितले.

वरंध घाट हा पुणे जिल्ह्यातून कोकणातील महाडकडे जाणारा एक महत्त्वाचा घाटमार्ग असून, पावसाळ्यात येथे दरडी कोसळणे, रस्ते खचणे आणि माती वाहून जाण्यासारख्या घटना वारंवार घडतात. सध्या घाटात रस्त्याचे रुंदीकरणाचे काम सुरू असल्याने अनेक ठिकाणी चिखल आणि घसरणीची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे संभाव्य अपघात टाळण्यासाठी प्रशासनाने हा निर्णय घेतल्याचे स्पष्ट केले आहे.

हा घाटमार्ग केवळ अवजड वाहनांसाठीच नव्हे, तर हवामान विभागाने रेड अलर्ट किंवा ऑरेंज अलर्ट जारी केल्यास हलक्या वाहनांसाठीही तात्पुरता बंद ठेवण्यात येणार आहे. यासंदर्भातील आदेश जिल्हाधिकाऱ्यांकडून जारी करण्यात आले आहेत.

सुमारे १० किलोमीटर लांबीचा वरंध घाट निसर्गसौंदर्याने समृद्ध असून, पावसाळ्यात तो अधिकच आकर्षक दिसतो. धबधबे, तलाव, दाट जंगल व हिरवाईने नटलेला हा घाट पर्यटकांना आकर्षित करतो. मात्र, याच निसर्गरम्य वातावरणात दरडी कोसळण्याचा धोका कायम असतो.

### उजनी धरणात ५० टक्के साठा

असल्याने उजनी धरण भरण्यास मदत होत आहे. येत्या पंधरा दिवसांत आणखी जोरदार हजेरी लावल्यास उजनी यंदा जून महिन्यातच शंभरी गाठण्याची शक्यता आहे.

गेल्या वर्षी १६ जूनला उजनी धरण वजा पातळीत होते. त्यावेळी धरणात वजा २६.२५ टीएमसी पाणीसाठा होता. यंदा १६ जूनला पाणी पातळी २६.६ टीएमसी इतकी आहे. गेल्या वर्षी एकूण पाणीसाठा हा ३७.४३ टीएमसी इतका तर यंदा तो ९०.३० टीएमसी इतका आहे.

### सोनू सूद-उर्वशी ...

समजते, जे बॅन करण्यात आले होते. सूत्रांनुसार, बेटिंग प्लॅटफॉर्म्स जाहिरात कॅम्पेन्समध्ये स्पोर्टिंग लाईन्सचा वापर करण्यात आला होता. एक प्रकारचे जाहिरातीत क्यू-आर कोड असतात, जे युजर्सना सट्टेबाजी साईट्सवर री-डायरेक्ट करतात. हे भारतीय कायद्याचे उल्लंघन ठरते.

### उबाठाची एमआयएमशी ..

शिवसेनेमध्ये खडाजंगी सुरू झाली आहे. दरम्यान, महापालिका निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर स्थानिक पातळीवर युती-आघाड्यांची चर्चा वेग धरणार आहे. पक्षफुटीनंतर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला नव्या मित्राची गरज भासणार आहे. काँग्रेस, राष्ट्रवादीची शहरात फारशी ताकद नसल्याने पक्ष वेगळा विचार करू शकतो. तो एमआयएमसोबत जाण्याचा असू शकतो, अशी चर्चा सध्या जिल्ह्याच्या राजकारणात सुरू आहे.

### केंद्र सरकारने नेमली...

आले नसल्याचे मोहोळ यांनी सांगितले". तसंच, 'विमानाच्या ब्लॅक बॉक्स डेटामुळे अपघाताचे कारण स्पष्ट होईल,' अशी आशाही त्यांनी व्यक्त केली.

अहमदाबाद येथील रुग्णालयात २७० डीएनए सँपल घेतली असून, ७० ते ८० मृतदेह नातेवाईकांना दिले गेले असून जसंजसे सँपल जुळले जात आहेत, तसंतसं मृतदेह नातेवाईकांना दिले जात असल्याची माहितीही यावेळी मुरलीधर मोहोळ यांनी दिली.

### ठग लाईफ चित्रपट प्रकरणी सर्वोच्च ...

कर्नाटकमध्ये घालण्यात आलेल्या बंदीवर सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी (दि. १७) ताशेरे ओढले. तसेच या प्रकरणी कमल हसन यांना माफी मागा, अशी सूचना करणाऱ्या उच्च न्यायालयास फटकारत न्यायमूर्ती मनमोहन आणि न्यायमूर्ती भुयान यांच्या खंडपीठाने कर्नाटक सरकारला नोटीसही बजावली. सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सर्टिफिकेशन (सीबीएफसी) कडून 'ठग लाईफ'चित्रपटाला मंजुरी मिळाली आहे. आता हा चित्रपट प्रदर्शित होऊ दिला पाहिजे. हा चित्रपट पाहावा की नको, याच निर्णय लोक घेतील; परंतु चित्रपट प्रदर्शितच होवू देणार नाही, अशी धमकी देऊ शकत नाही, असेही न्यायालयाने कर्नाकमधील विविध संघटनांना सुनावले. कायद्याचे राज्य जमावाच्या धमक्यांकडे ओलीस ठेवता येणार नाही आणि गुंडांच्या टोळ्या थिएटरमध्ये काय प्रदर्शित करायचे हे ठरवण्याची परवानगी देता येणार नाही, असे खडेबोल सुनावत या प्रकरणी राज्य सरकारने बुधवार, १८ जूनपर्यंत उत्तर दाखल करावे असे आदेश खंडपीठाने दिले.

### एअर इंडियाचे ...

भारतातील विमान सेवांच्या तांत्रिक गुणवत्तेवर आणि ग्राहक सेवा व्यवस्थापनावरही नव्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत. अहमदाबादमध्ये गुरुवारी झालेल्या विमान दुर्घटनेनंतर पाच दिवसांनी एअर इंडियाला एकाच दिवसात पाच उड्डाणे रद्द करावी लागली. त्यामागे तांत्रिक त्रुटी असल्याचे एअर इंडियाने म्हटले आहे.

### इंडिगोच्या विमानात...

सुखरूप उतरले आहे. येथे सुरक्षा यंत्रणांनी पूर्ण दक्षता घेऊन सर्व प्रवाशांना विमानातून बाहेर काढले. यानंतर सर्व प्रोटोकॉलचे पालन करत विमानाची कसून तपासणी करण्यात आली. हे प्रकरणही गंभीर होते कारण धमकी देणाऱ्या व्यक्तीने विमानाचा नंबरही सांगितला होता. ही धमकी मिळाली तेव्हा विमानाने कोचीहून उड्डाण केले होते. धोक्याचे गांभीर्य लक्षात घेऊन ते नागपूरच्या दिशेने वळविण्यात आले. सध्या हे विमान तिथेच उभे आहे.

### राष्ट्रवादीसोबत युती...

त्यामुळे कुणाशीही संबंध ठेवा. पण भाजपशी संबंध हा काँग्रेसचा विचार असूच शकत नाही. त्यामुळे संधी साधूपणाचं राजकारण प्रोत्साहीत करायचं नाही. त्यादृष्टीने पावलं टाकायचं आहे. आम्ही संधीसाधूंसोबत जाणार नाही", असं शरद पवार म्हणाले."प्रत्येकाला आपलं मत मांडण्याचा अधिकार" असे अजित पवारांनी म्हटले. त्यामुळे अजित पवार आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचं एकीकरण होणार नसल्याचं स्पष्ट झालं आहे.

### रत्नागिरी, पुणे, सातारा,...

जिल्ह्यात पाण्यात बुडून एक व्यक्ती आणि मातीच्या ढिगाऱ्याखाली सापडून एक व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. तर झाड पडून तीन व्यक्ती जखमी, स्लॅब पडून दोन व्यक्ती जखमी आणि भिंत पडून दोन व्यक्ती जखमी झाल्यात. तसेच यवतमाळ जिल्ह्यात पाण्यात बुडून एका व्यक्तीचा मृत्यू झाला असून, धुळे जिल्ह्यात भिंत पडून चार प्राण्यांचा मृत्यू झाला आहे, अशी माहिती राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून देण्यात आलीय.

## लाचखोरीच्या आरोपावरून डॉक्टर निलंबित



**बेंगळुरू :** चिक्काबल्लापुरा जिल्ह्यातील गुडीबांडे येथील सरकारी रुग्णालयातील एका सर्जनला लाचखोरीच्या आरोपांनंतर चौकशी पूर्ण होईपर्यंत निलंबित करण्यात आले आहे. ११ जून रोजी एका टेलिव्हिजन वृत्तवाहिनीवर प्रसारित झालेल्या व्हिडिओनंतर ही कारवाई करण्यात आली आहे, ज्यामध्ये डॉ. नरसिंहमूर्ती शस्त्रक्रिया करण्याच्या बदल्यात रुग्णांकडून पैसे मागत आणि स्वीकारत असल्याचे दाखवण्यात आले आहे. या फुटेजमुळे जनतेत संताप निर्माण झाला आहे आणि विभागासाठी ही लाजिरवाणा बाब मानली जात आहे.

## मंडीमध्ये बस दरीत कोसळली, १५ जण जखमी



**शिमला :** हिमाचल प्रदेशातील मंडी जिल्ह्यातील मंडी-जाहू रस्त्यावर पत्रीघाटजवळ मंगळवारी सकाळी बस दरीत कोसळल्याने १५ हून अधिक प्रवासी जखमी झाले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. अपघात झाला तेव्हा बस जाहूहून मंडीला जात होती. प्राथमिक माहितीनुसार, या अपघातात १५ हून अधिक लोक जखमी झाले आहेत.

## उडुपी येथील शाळेला बॉम्बने उडवण्याची धमकी



**उडुपी (कर्नाटक) :** शहरातील एका खासगी शाळेला सोमवारी ईमेलद्वारे बॉम्बची धमकी मिळाली, त्यानंतर विद्यार्थ्यांना बाहेर काढण्यात आले, असे पोलिसांनी सांगितले. येथील विद्यादय पब्लिक स्कूलच्या परिसरात सखोल शोध घेण्यात आला आणि ते खोटे असल्याचे निष्पन्न झाले, असे त्यांनी सांगितले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या ईमेलमुळे उडुपी पोलिसांना शाळेच्या परिसरात बॉम्ब निकामी करणारे पथक, तोडफोड विरोधी पथक आणि कुत्र्यांचा शोध पथकांसह एक व्यापक पथक तैनात करण्यास प्रवृत्त करण्यात आले. कॅम्पसमध्ये कोणतीही संशयास्पद वस्तू आढळली नाही, असे त्यांनी सांगितले.

## वडिलांकडून बलात्कार, पिडितेचा आत्महत्येचा प्रयत्न

**बेरहमपूर :** एका १६ वर्षीय मुलीने तिच्या मद्यपी वडिलांनी बलात्कार केल्याचा आरोप केल्यानंतर झोपेच्या गोळ्या खाऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला आणि आता ती ओडिशाच्या गंजम जिल्ह्यातील रुग्णालयात तिच्या आयुष्यासाठी झुंज देत आहे, असे पोलिसांनी सांगितले. रविवारी, जेव्हा जग फादर्स डे साजरा करत होते, तेव्हा मुलीच्या वडिलांना अटक करण्यात आली आणि सोमवारी न्यायालयाने त्यांना न्यायालयीन कोठडीत पाठवले. दिगापहांडी पोलिसांचे प्रभारी निरीक्षक पीके पात्रा म्हणाले की, ११ जून रोजी मुलगी तिच्या घरी एकटी होती तेव्हा वडिलांनी तिच्यावर बलात्कार केल्याचा आरोप आहे.

## बक्सरमध्ये वीज कोसळून तिघांचा मृत्यू

**बक्सर :** बिहारच्या बक्सर जिल्ह्यात सोमवारी वीज कोसळून किमान तीन जणांचा मृत्यू झाला, असे पोलिसांनी सांगितले. ही घटना दुपारी मुफस्सिल परिसरात घडली. पत्रकारांशी बोलताना मुफस्सिल पोलिस स्टेशनचे एसएचओ शंभू भगत म्हणाले, "सोमवारी दुपारी वीज पडून किमान तीन जणांचा मृत्यू झाला. माहिती मिळताच जिल्हा प्रशासनाचे अधिकारी घटनास्थळी पोहोचले आणि काही जखमींना जवळच्या सरकारी रुग्णालयात नेले."

## बंदुकीचा धाक दाखवून एसयूव्ही चोरली

**नवी दिल्ली :** नैऋत्य दिल्लीतील कुतुब इन्स्टिट्यूशनल एरियाजवळ बंदुकीचा धाक दाखवून तीन जणांनी एसयूव्ही चोरल्याचा आरोप आहे, असे पोलिसांनी मंगळवारी सांगितले. रविवारी पहाटे ५ वाजता शहीद जीत सिंग मार्गावर कार लुटताना आणि एक तासानंतर त्यांना गाडीतून काढून टाकल्यानंतर, या पुरूषांनी चालकाला जबरदस्तीने मागच्या सीटवर बसवले असा आरोप आहे. "ड्रायव्हर सागर हा एका रेस्टॉरंटच्या बाहेर त्याच्या मालकाच्या टाटा हॅरियर एसयूव्हीमध्ये वाट पाहत होता. त्याचा मालक आणि त्याची पत्नी एका पार्टीत सहभागी होण्यासाठी आत गेले असताना मागच्या दाराने तीन पुरुष (कारमध्ये) घुसले," असे एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले.

# भारतीयांना तेहरान सोडण्याचे आवाहन

## इस्रायली हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर सुरक्षेसाठी दूतावासाचे प्रयत्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** इस्त्रायलकडून इराणची राजधानी तेहरानवर होणाऱ्या हवाई हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर मंगळवारी भारतीय दूतावासाने आपल्या नागरिकांना तात्काळ शहर सोडून सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित होण्याचे आवाहन केले आहे. तसेच तेहरानमधून बाहेर पडण्यासाठी योग्य व्यवस्था होईपर्यंत त्यांनी भारतीय दूतावासाच्या संपर्कात राहण्यास आणि सुरक्षित ठिकाणी राहण्यास सांगितले आहे.

इराणमधील भारतीय दूतावासाने म्हटले आहे की, सर्व भारतीय नागरिकांना तेहरान शहराबाहेर सुरक्षित ठिकाणी जाण्याचा सल्ला देण्यात आला आहे. इराणमधील भारतीय दूतावासाने तेहरानमध्ये असलेल्या आणि दूतावासाच्या संपर्कात नसलेल्या सर्व भारतीय नागरिकांना तात्काळ दूतावासाशी संपर्क साधून त्यांचे स्थान आणि संपर्क क्रमांक देण्याची विनंती केली आहे. संपर्क क्रमांक +९८९०१०१४४५५७, +९८९१२८१०९११५ आणि +९८९१२८१०९१०९ असल्याचेही निवेदनात नमूद केले आहे.

इराण आणि इस्रायलमधील वाढत्या लष्करी तणावादरम्यान भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने इराणमधून भारतीय विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे परत आणण्याची प्रक्रिया सुरू केली होती. सध्या तीन विद्यापीठांमधील विद्यार्थ्यांना सुरक्षित ठिकाणी नेण्यात आले आहे. इराणमध्ये सुमारे १० हजार भारतीय विद्यार्थी आहेत, ज्यात १५०० काश्मिरी आहेत. बहुतेक विद्यार्थी वैद्यकीय शिक्षणासाठी तेथे वास्तव्यास आहेत.





इराणमध्ये अडकलेल्या १० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे बाहेर काढण्याचे सुनिश्चित करण्यासाठी भारताने इराणला आवाहन केले होते. प्रत्युत्तरादाखल, तेहरानने त्यांचे हवाई क्षेत्र बंद केल्याचे कारण देत विद्यार्थ्यांना अझरबैजान, तुर्कमेनिस्तान किंवा अफगाणिस्तानच्या जमिनीच्या सीमेवरून बाहेर पडण्याचा सल्ला दिला. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, इराणचे हवाई क्षेत्र बंद झाल्यामुळे विद्यार्थ्यांना आर्मेनिया मार्गे बाहेर काढले जात आहे. आर्मेनियातील विद्यार्थ्यांना जॉर्जिया आणि नंतर पश्चिम आशिया मार्गे भारतात आणता येईल. ११० विद्यार्थ्यांचा पहिला गट आर्मेनिया सीमेवर पोहोचला आहे. यापूर्वी, भारतीय दूतावासाने सोमवारी तेहरानमधून विद्यार्थ्यांना बाहेर काढण्यासाठी बसेसची व्यवस्था केली होती.

### इस्राएल-इराणमध्ये सलग पाचव्या दिवशी हल्ले-प्रतिहल्ले

मंगळवार सलग पाचव्या दिवशी इस्रायल आणि इराणमध्ये हल्ले-प्रतिहल्ले सुरुच राहिले. इराणने दावा केला आहे की, मागील पाच दिवस इस्त्रायलने केलेल्या हल्ल्यात २२४ नागरिकांचा मृत्यू झाला आहे. तर इस्रायलने २४ नागरिकांचा मृत्यू झाल्याची नोंद केली आहे. सुमारे ३ हजार इस्रायलींना बाहेर काढण्यात आले आहे. दरम्यान, जी-७ शिखर परिषद अर्धवट सोडणाऱ्या डोनाल्ड ट्रम्प यांनी मध्य पूर्वेतील सुरू असलेल्या तणावाचा आढावा घेण्यासाठी उच्च अधिकाऱ्यांसोबत सुरक्षा कक्षाची बैठक घेतली. तसेच इराणकडे अण्वस्त्र असू शकत नाही. प्रत्येकाने ताबडतोब तेहरान रिकामे करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

# अमेरिकी राष्ट्राध्यक्षांनी जी-७ परिषद अर्ध्यावरच सोडली

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी कॅनडामध्ये सुरू असलेली जी-७ शिखर परिषद अर्ध्यावरच सोडण्याचा निर्णय घेतला. परिषद सोडून डोनाल्ड ट्रम्प आता अमेरिकेत परतले आहेत. मध्यपूर्वेतील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, विशेषतः इराण आणि इस्रायलमधील परिस्थिती लक्षात घेता त्यांनी हे पाऊल उचलल्याचे सांगण्यात येत आहे.




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** डोनाल्ड ट्रम्प यांनी यापूर्वी सोशल मीडियावर तेहरानच्या लोकांना शहर रिकामे करण्याचा इशारा दिला होता, ज्यामुळे अमेरिका या प्रकरणाबाबत खूप गंभीर असल्याचे स्पष्ट झाले. सोमवारी व्हाईट हाऊसने एक निवेदन जारी करून म्हटले आहे की, राष्ट्राध्यक्ष ट्रम्प महत्त्वाच्या मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी अमेरिकेत परतले आहेत.

आता मोठा प्रश्न असा आहे की अमेरिका या युद्धात थेट सहभागी होणार आहे का? आणि ट्रम्प यांना परिषदेतून मध्येच परतावे लागले, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांनी आधीच इस्रायलला उघडपणे पाठिंबा दिला आहे, परंतु आतापर्यंत अमेरिकेने थेट युद्धात उडी घेण्याची कोणतीही औपचारिक घोषणा केलेली नाही. अशा परिस्थितीत ट्रम्प यांचे हे पाऊल जगाच्या दृष्टीने गंभीर संकेत देत आहे. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या विधानांवरून स्पष्ट होते की अमेरिका इस्रायलला जोरदार पाठिंबा देत आहे. तथापि, आतापर्यंत अमेरिकेने इराणवरील अलिकडच्या हल्ल्यांमध्ये थेट सहभाग नाकारला आहे.

अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी अलिकडेच म्हटले आहे की इराणवरील हल्ले केवळ इस्रायलने केले आहेत आणि या कृतींमध्ये अमेरिकेचा थेट सहभाग नाही. त्यांनी असेही म्हटले की, सध्या अमेरिकेची प्राथमिकता मध्य पूर्वेत तैनात असलेल्या आपल्या सैनिकांची सुरक्षा सुनिश्चित करणे आहे.

सुरक्षा तज्ज्ञांचे मत आहे की वेगाने बदलणाऱ्या परिस्थितीत अमेरिकेलाही या संघर्षात थेट भूमिका बजावावी लागू शकते. इराण आणि इस्रायलमधील वाढता तणाव आणि ट्रम्पची सक्रिय राजनैतिकता पाहता, ही भीती अधिकच बळकट होत चालली आहे.

## इंग्लंडचे लढाऊ विमान अजूनही भारतातच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** केरळमधील तिरुवनंतपुरम च्या आंतरराष्ट्रीय विमानतळावर ब्रिटिश रॉयल नेव्हीचे अत्याधुनिक एफ-३५ बी स्टेल्थ लढाऊ विमान गेल्या ४८ तासांपासून उभे आहे. हे जगातील सर्वात महागडे लढाऊ विमान मानले जाते. इंधनाचा तुटवडा आणि खराब हवामानामुळे शनिवारी (१४ जून) रात्री विमानाचे इमर्जन्सी लँडिंग करावे लागले. हायड्रोलिक बिघाडामुळे आतापर्यंत हे विमान आपल्या मूळ ठिकाणी म्हणजेच एचएमएस प्रिन्स ऑफ वेल्स विमानवाहू युद्धनौकेवर परत येऊ शकलेले नाही. विशे, म्हणजे हे विमान भारतीय हवाई दलाने लगेचच शोधून काढले. एफ-३५ बी स्टेल्थ लढाऊ विमान कोणत्याही रडारद्वारे शोधणे खूप कठीण मानले जाते.

हे लढाऊ विमान ब्रिटीश विमानवाहू युद्धनौका एचएमएस प्रिन्स ऑफ वेल्सच्या कॅरियर स्ट्राईक ग्रुपचा भाग होते, ज्याने नुकताच भारतीय नौदलासोबत संयुक्त लष्करी सराव पूर्ण केला आहे आणि सध्या इंडो-पॅसिफिक क्षेत्रात तैनात आहे. त्याची दुरुस्ती करण्यासाठी ब्रिटीश तांत्रिक पथकाकडून सध्या प्रयत्न सुरू आहेत. भारतीय हवाई दलाने या घटनेचे वर्णन 'सामान्य परिस्थिती' म्हणून केले असून ते ब्रिटिश हवाई दलाला तांत्रिक मदत करत असल्याचे म्हटले आहे. विशेषत: एफ-३५ सारख्या बहुप्रतीक्षित आणि महागड्या लढाऊ विमान कार्यक्रमाच्या बाबतीत परदेशी स्टेल्थ लढाऊ विमान इतके दिवस भारतीय भूमीवर उभे राहणे ही एक विलक्षण घटना मानली जाते.

भारतीय नौदलासोबत च्या संयुक्त युद्धाभ्यासानंतर शनिवारी रात्री ९ वाजून २० मिनिटांनी एफ-३५ बी लढाऊ विमानाने तिरुअनंतपुरम एअर ट्रॅफिक कंट्रोलला (एटीसी) इंधनाची कमतरता जाणवली. हे विमान हिंदी महासागरावर उडत होते, त्यांनी लगेच उतरण्याची परवानगी मागितली. विमानतळावर तातडीची तयारी करण्यात आली आणि रात्री ९ वाजून २८ मिनिटांनी विमान सुखरूप उतरले. मात्र, लँडिंगनंतर विमानातील तांत्रिक बिघाड, विशेषत: हायड्रोलिक यंत्रणेतील बिघाडामुळे विमानाला उड्डाण करता येत नसल्याचे निदर्शनास आले.

हे विमान आपल्या जहाजावर पुन्हा का उतरू शकले नाही, हे अद्याप समजू शकलेले नाही. खराब हवामानामुळे लँडिंगला सुरक्षित लँडिंग करता आले नाही, असे काही अहवालात म्हटले आहे, तर काहींनी यांत्रिक बिघाडामुळे लँडिंग रोखल्याचे म्हटले आहे.

## राक्षसी घटना : प्रेमीसमोरच तरुणीवर सामुहिक बलात्कार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**भुवनेश्वर :** ओडिशातील गोपालपूर समुद्रकिनाऱ्यावर एका २० वर्षीय तरुणीवर १० जणांनी सामूहिक बलात्कार केल्याची राक्षसी घटना समोर आली आहे. पोलिसांनी ही माहिती दिली. येथील एका खासगी महाविद्यालयातील पदवीधर विद्यार्थ्याने दिलेल्या फिर्यादीवरून सोमवारी गोपाळपूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

इतर तीन महिलांसोबत खासगी मेसमध्ये राहणारी ही मुलगी रविवारी राजा उत्सवानिमित्त वर्गमित्र आणि प्रियकरासोबत समुद्र किनाऱ्यावर गेली होती. मुलीने आपल्या तक्रारीत म्हटले आहे की, ते निर्जन ठिकाणी बसले असताना तीन मोटारसायकलवरून दहा जणांचा एक गट त्यांच्याजवळ आला आणि त्यांनी तिच्या प्रियकराला पकडले, त्यानंतर तिच्यावर बलात्कार केला. या टोळीने या जोडप्याचे फोटो काढून ते लीक करण्याची धमकी देण्यास सुरुवात केली. ब्रह्मपूरचे पोलीस अधीक्षक (एसपी) सरवण विवेक एम यांनी सांगितले की, या गुन्ह्यात सहभागी असल्याच्या आरोपाखाली किमान सात जणांना चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. एसपीसह अन्य वरिष्ठ पोलिस अधिकारी तपासासाठी घटनास्थळी दाखल झाले. ताब्यात घेतलेले सर्व जण प्रौढ असून, विविध ठिकाणी त्यांची चौकशी करत आहोत, असे पोलिस अधीक्षकांनी सांगितले. आणखी एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, ताब्यात घेतलेले लोक स्थानिक नव्हते, उत्सवासाठी समुद्रकिनाऱ्यावर आले होते. तपासाचा एक भाग म्हणून पीडित `ची आणि ताब्यात घेतलेल्यांची वैद्यकीय तपासणी केली जाईल, असे पोलिसांनी सांगितले.



**इस्रायल** इस्रायलमधील बात याम येथे इराणने इस्रायलवर केलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यानंतर इमारतींचे मोठे नुकसान झाले आहे.

# स्पॅम कॉल्सवर 'ट्राय'चा अंकुश, डिजिटल संमती आवश्यक




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** मोबाईल वापरकर्त्यांना त्रासदायक ठरणाऱ्या स्पॅम कॉल्स आणि अनावश्यक व्यावसायिक संदेशांना आळा घालण्यासाठी भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरण (ट्राय) ने मोठा निर्णय घेतला आहे. ट्रायने नव्याने लागू केलेल्या 'डिजिटल संमती' नियमांनुसार, ग्राहकांची स्पष्ट परवानगी मिळाल्याशिवाय कोणताही व्यावसायिक कॉल किंवा संदेश पाठवता येणार नाही, असा आदेश जारी केला आहे. यामुळे ग्राहकांची मोठ्या त्रासातून सुटका होणार आहे. याशिवाय डिजिटल अरेस्ट , ओटीपी किंवा लिंकच्या माध्यमातून होणारी फसवणूकसुद्धा टळणार आहे.

ट्रायच्या निरीक्षणानुसार, ग्राहकांकडून मोठ्या प्रमाणावर स्पॅम कॉल्स आणि मेसेजेस्विरोधात तक्रारी येत होत्या. अनेक व्यावसायिक कंपन्या ग्राहकांची संमती न घेता जाहिराती, ऑफर्स किंवा अन्य व्यावसायिक माहिती पाठवत होत्या. त्यामुळे ग्राहकांच्या गोपनीयतेचा भंग होत होता आणि त्यांना सतत त्रास सहन करावा लागत होता. नवीन नियमांनुसार, कंपन्यांना ग्राहकांकडून डिजिटल स्वरूपात स्पष्ट संमती घ्यावी लागणार आहे. ही संमती मिळाल्याशिवाय कोणताही व्यावसायिक कॉल, एसएमएस किंवा प्रमोशनल मेसेज पाठवता येणार नाही. ग्राहकांनी दिलेली संमती कधीही मागे घेता येईल, तसेच त्याबर नियंत्रण ठेवण्याचा अधिकारही ग्राहकांकडे राहील. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कंपन्यांवर कडक कारवाई करण्यात येणार आहे.

ट्रायच्या या निर्णयामुळे ग्राहकांना अनावश्यक कॉल्स आणि संदेशांपासून मोठा दिलासा मिळणार आहे.

तसेच ग्राहकांची गोपनीयता आणि अधिकार अधिक मजबूत होणार आहेत. ट्रायने दूरसंचार कंपन्यांना आणि व्यावसायिक संस्थांना नवीन नियमांची अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले असून लवकरच हे नियम देशभर लागू होणार आहेत. ग्राहकांनी स्पॅम कॉल्स किंवा संदेशांची तक्रार केल्यास संबंधित कंपन्यांवर त्वरित कारवाई केली जाईल, असे ट्रायने स्पष्ट केले आहे.

## शाळांमध्ये विद्यार्थ्यांचा किलबिलाट

**कारेगाव :** डोळ्यात कुतूहल, मनात हूरहूर, शाळेत जाण्याचा आनंद, नवीन वर्गाची उत्सुकता, शिक्षकांना भेटण्याची ओढ,नवीन शाळा, पाठीवर स्कुल बॅग,हातात टिफिन बॅग अशा थाटात विदयार्थ्यांनी शाळेच्या गेटमधून प्रवेश केला. दीर्घ उन्हाळी सुटीनंतर शाळेच्या पहिल्या दिवशी शिरुर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पाऊल ठेवताना विदयार्थ्यांच्या चेहऱ्यावर उत्साह दिसून आला. शिरुर येथील शिरुर शिक्षण प्रसारक मंडळाच्या विद्याधाम प्रशालेतील प्रांगणात इयत्ता पाचवीच्या नवागत विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प व पाठयपुस्तके देवून स्वागत करण्यात आले.त्यानंतर दिपक गुजर यांनी विद्यार्थ्यांना शाळेच्या शिस्तीचे महत्व, नियमांचे पालन आणि नवीन शैक्षणिक वर्षातील अभ्यासासाठी सातत्य व चिकाटीविषयी मार्गदर्शन केले.मुख्याद्यापक गुरुदत्त पाचर्णे यांनी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना यशस्वी शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी मुख्याद्यापक गुरुदत्त पाचर्णे,शिक्षक पालक संघांचे उपाध्यक्ष संभाजी दरोडे, सदस्य राजेंद्र बनकर,पोपटराव पाचंगे, पर्यवेक्षक एम. पी. बनकर, सी. बी. देविकर, डी. एस.नाईक विद्यार्थी, पालक,नागरिक व शिक्षक वृंद उपस्थित होते. पूर्वीच्या चार भागात विभागलेल्या अभ्यासक्रमाऐवजी यंदा एक संपूर्ण वार्षिक अभ्यासक्रम असलेली विषयानुसार पुस्तके विद्यार्थ्यांना दिली. शिरुर तालुक्यातील ३५४ शाळामधील ३० हजार ९६२ विदयार्थ्यांना मोफत पाठयपुस्तकांचे पहिल्या दिवशी वाटप करण्यात आले, असे गटशिक्षणाधिकारी बाळकृष्ण कळमकर यांनी सांगितले.

## पारगाव (शिंगवे) येथे नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील पारगाव (शिंगवे) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत नवागत विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन, ढोल ताशाच्या गजरात स्वागत करून विद्यार्थांना शालेय गणवेश, बूट आदी शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.अशी माहिती मुख्याध्यापक संतोष लबडे यांनी दिली. या प्रसंगी पारगावच्या सरपंच श्वेता ढोबळे, ग्रामपंचायत सदस्य रोहिणी देवडे, काळुराम लोखंडे, सुधीर ढोबळे, बजरंग देवडे, दताात्रय वाव्हळ,दतात्रय ढोबळे, दतात्रय अस्वारे, किसन ढोबळे,विवेक चव्हाण,सचिन दातखिळे, किरण ढोबळे, सचिन देवडे, अनिल ढोबळे, शिवाजी ढोबळे, ज्येष्ठ नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.यावेळी सर्वांचे स्वागत मुख्याध्यापक संतोष लबडे आणि शिक्षक वृंद यांनी केले.

## पहाडदरा येथे खरीप पूर्व तयारी कार्यक्रम



**लोणी-धामणी :** विकसित कृषि संकल्प अभियानांतर्गत पहाडदरा (ता. आंबेगाव) येथे खरीप पूर्व तयारी यावर कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमासाठी कृषि विज्ञान केंद्राच्या शास्त्रज्ञ निवेदिता शेटे, कृषि महाविद्यालय पुणे येथील डॉ.नजीर तांबोळी,कांदा व लसूण संशोधन केंद्र राजगुरुनगर येथील शास्त्रज्ञ आश्विनी बेनके, जयालक्ष्मी.के तसेच कृषि पर्यवेक्षक अधिकारी ए.बी जोरी, सहाय्यक कृषी अधिकारी सी.टी. शिंदे, खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष भगवान वाघ, सरपंच मच्छिंद्र वाघ, उपसरपंच कैलास वाघ, ग्रामपंचायत सदस्य संकेत वायकर, सोपान वायकर माजी नगरसेवक, तंटामुक्ती अध्यक्ष बाळासाहेब वायकर, टी.व्ही.एस. कंपनीचे सोमनाथ काटकर हे उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी शेतकरी मोठया संख्येने उपस्थित होते. टी.व्ही.एस.कंपनीचे सोमनाथ काटकर, सिंधू वायकर, सुशांत पवळे यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. कार्यक्रमासाठी उपस्थित यांचे आभार संकेत वायकर यांनी मानले.

## बागायती भागातून मेंढपाळ परतू लागले

**बारामती :** बारामती तालुक्याच्या पश्चिम जिरायत भागात मे महिन्याच्या अखेरीस व जून महिन्यात पडलेल्या चांगल्या पावसामुळे या परिसरात शेळ्या मेंढ्यांसाठी चांगले गवत उगवून चारा होऊ लागला आहे. उन्हाळ्यात परिसरात बकऱ्यांना चराईस चारा नसल्यामुळे बाहेरगावी गेलेले मेंढपाळ आपल्या हजारो मेंढ्यांसह झालेल्या जोरदार पावसामुळे आता गावाकडे परतू लागले आहेत. लोणी भापकर, पळशी, मासाळवाडी, सायंबाचीवाडी, माळवाडी, का-हाटी, खामगळवाडी, कानाडवाडी, मुर्टी-मोढवे आदी मार्गावर मेंढ्यांचे कळप रस्त्याच्या बाजूने चालताना दिसून येत आहेत. या भागात धनगर समाज मोठ्या प्रमाणावर शेळ्या मेंढ्यांचा व्यवसाय करीत आहेत. पूर्वीच्या तुलनेत आत्ता हा व्यवसाय कमी होऊ लागल्याचे दिसत आहे. उन्हाळ्यात चाऱ्याचा प्रश्न निर्माण होतो. अशा काळात दरवर्षी मेंढपाळ चाऱ्याच्या शोधात कोकण, मावळ, नाशिक, नगर तसेच बागायती भागामध्ये जातात. त्याठिकाणी माळरान, गावठाण चराईसाठी पीक मेंढपाळ करार करून ठरलेल्या रकमेवर दरवर्षी जात असतात. त्या जंगलातील पिकांची काढणी होताच मोकळ्या क्षेत्रात मेंढ्या चारतात. नाल्या खो-यातील चराईवर जून महिना येईपर्यंत मेंढ्या राहतात. त्याबदल्यात त्याच शिवारात एखाद्या शेतकऱ्याच्या शेतात ठरावीक रकमेवर मेंढ्या बसवून मिळणाऱ्या एकूण रकमेतून पीक संस्थेत ठरलेली रक्कम अदा करतात.

# कुंकूम पावलांनी स्वागत



पुरंदर — पुरंदर तालुक्यातील भिवडी येथे शाळा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने विद्यार्थ्यांचे वाजत-गाजत, फुले, मिठाई वाटप करून स्वागत करण्यात आले. (छायाचित्र - राजेंद्र बर्गे, सासवड.)

## भिवडी शाळेत शाळा प्रवेशोत्सव साजरा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** सन २०२५- २६ या शैक्षणिक वर्षातील शाळा आज सोमवार १६ जुन रोजी सुरू झाल्या असून शालेय शिक्षण विभागाने यावर्षीही मुलांचा शाळेतील पहिला प्रवेश प्रवेशोत्सव म्हणुन साजरा करण्याचा निर्णय घेतला. त्या अनुषंगाने सोमवारी सर्वत्र विद्यार्थ्यांचे वाजत गाजत, फुले, मिठाई वाटप करून स्वागत करण्यात आले.

इयत्ता पहिली मध्ये प्रवेश घेणाऱ्या चिमुकल्यांच्या कुंकुम पावलांनी वर्गात प्रवेश करून स्वागत करण्यात आले. सर्व मुलांचे औक्षण करून, त्यांना गुलाबाची फुले देऊन तसेच वर्गात प्रवेश करताना फुलांचा वर्षाव करत मोठ्या उत्साहात प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. मुलांना मसालेभाताचे जेवण देण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांस पहिल्याच दिवशी गणवेश आणि पाठ्य पुस्तके वितरीत करण्यात आली. तानाजी रिठे, वनिता टिळेकर, शरद बोबडे, अरुणा बोबडे कोमल पवार या शिक्षक वृंदांनी या देखण्या सोहळ्याचे आयोजन केले. शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सागर भिंताडे, माजी सभापती रमेश मोकाशी, सामाजिक कार्यकर्ते नाना वांढेकर यांसह ग्रामस्थ, पालक यांनी कार्यक्रमास उपस्थिती लावली.

# पाडेगाव प्राथमिक शाळेतील नवागतांच्या पहिल्या पाऊलांचे जतन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नीरा :** पाडेगाव (ता. फलटण ) येथील शाळेत नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचे सोमवारी (दि. १६) जंगी स्वागत करण्यात आले. मुलांनी आपले पहिले पाऊल आज शाळेत टाकले. हे पाऊल कायम आठवणीत राहावे या हेतूने शिक्षकांनी त्यांच्या पाऊलांचे रंगीत छाप पांढऱ्या कागदावर उमटवले.

शाळेत येणाऱ्या या पहिल्या पाऊलांची भेट नंतर विद्यार्थ्यांना दिली जाणार असून त्यामुळे त्यांचे शाळेतील पहिले पाऊल त्यांना आयुष्यभर पाहता येणार आहे.

गेल्या दोन वर्षात विविध उपक्रम राबवत पाडेगावच्या जिल्हा परिषद शाळेने रुपडे पालटले आहे. सोमवारी इयत्ता पहिलीसह इतर इयत्तात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे देखील स्वागत करण्यात आले. आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने प्रोजेक्टरवर विद्यार्थ्यांना व्हिडीओ फीत दाखविण्यात आली. कृतीवर्ग हा जिल्ह्यातील पहिलाच अभिनव उपक्रम असून तो येथे सुरु आहे.

यावेळी शिक्षकांनी उपस्थितांना या उपक्रमाची माहिती दिली व कृतीवर्गातील अध्यापनाची पद्धती सांगितली. यंदा पहिलीचा अभ्यासक्रम बदलला असल्याने नवीन बदलांची माहिती पालकांना देण्यात आली. यावेळी शाळा समितीचे अध्यक्ष सोमनाथ खरात, शीतल खरात, अक्षय केंजळे, मनीषा खरात, जयमाला चव्हाण, बापूराव गायकवाड उपस्थित होते.

यावेळी सोमनाथ खरात म्हणाले, "शाळेतील भौतिक सुविधांच्या पूर्ततेसाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने शाळा राबवीत असलेले उपक्रम प्रेरणादायी असून गावातील ग्रामस्थांचीही मदत होत आहे."

प्रस्तावना व सादरीकरण प्रविण जोशी यांनी केले तर बापूराव गायकवाड यांनी आभार मानले.



पाडेगांव येथील नवागत विद्यार्थ्यांचे पाठ्यपुस्तक देऊन स्वागत करताना ग्रामस्थ व शिक्षक.

## परिंचे कृषीमंडल अंतर्गत बियाणे वाटप



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** खरीप हंगाम २०२५ अंतर्गत महाराष्ट्र डी बीटी शेतकरी योजनेअंतर्गत पुरंदर तालुका कृषी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली मंडल कृषी विभाग परिंचे यांच्या वतीने गळीत धान्य प्रकल्प व प्रमाणित बियाणे कार्यक्रम अंतर्गत शेतकऱ्यांना भुईमूग व सोयाबीन बियाणाचे वाटप करण्यात आले. परिंचे येथे झालेल्या वाटप कार्यक्रमात हरगुडे, परिंचे, पांगारे, मांढर या गावच्या दीडशेहून अधिक लाभार्थ्यांना बीज वितरण करण्यात आले. बारामती विभागाच्या तंत्र अधिकारी रश्मी जोशी, विभागीय अधिकारी राजेंद्र डोंबाळे, परिंचे मंडलचे अनिल धूरगुडे यांसह अन्य अधिकारी व शेतकरी मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.

सदरच्या कार्यक्रमात अनिल धुरगुडे यांनी प्रमाणित बियाणे कार्यक्रम अंतर्गत ११ टन बियाणाचे लक्षांक देण्यात आल्याचे सांगत वाफसा झाल्यावर बीज प्रक्रिया करून गादी वाफा अथवा बी बी एफ पद्धतीने लागवड करण्याबाबत मार्गदर्शन केले.

कृषी विभागाच्या धनश्री रोटे, एम सी नाळे, ए. बी हिंगणे, यांसह उल्हास जाधव, संजय जाधव, मनोज ताकवले , श्रीकांत ताकवले, भूपेंद्र ताकवले व अन्य शेतकरी या प्रसंगी उपस्थित होते

## जेजुरीच्या अन्नछत्रासाठी कमर्शियल कटिंग मशीनची भेट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** श्री मार्तंड देवस्थान जेजुरी येथील अन्नछत्रसाठी श्री ज्ञानयोग सेवा ट्रस्टच्या अध्यक्षा मनीषा राजेंद्र खेडेकर यांनी कमर्शियल भाजी कापण्याचं मशीन, तसेच २५ हजारांची औषधे, भारत सरकारच्या महिला बालकल्याण विभागाच्या राष्ट्रीय सचिव डॉ श्रद्धा जंजवाल यांच्या हस्ते देण्यात आली. मशीनचे उद्‌घाटन सिनेमा अभिनेता श्रीश खेडेकर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी पुनम देवरे, मंत्रालयातील अधिकारी सचिन सेनगर, चेतन सातभाई, अनिल बारभाई, वैभव लांघी, अविनाश बारभाई, राहुल निकम,अमर बारभाई ,अरुण बारभाई, किरण बारभाई आदी उपस्थित होते.

जेजुरी देवसंस्थानच्या अन्नछत्र विभागांमध्ये दररोज सुमारे एक हजार भाविकांना स्वयंपाक करण्यासाठी सेवेकऱ्यांना दोन तास भाजी कापणे, निवडण्यासाठी जात असे. आता हे मशीन दिल्यानंतर अवघ्या वीस मिनिटांमध्ये त्यांचे काम होणार आहे. कमर्शियल कटिंग मशीनमुळे अन्नछत्राच्या कामात सुलभता येणार आहे, असे खेडेकर यांनी सांगितले. समाजातील दातृत्व असलेल्या लोकांच्या मुळेच खऱ्या अर्थाने मंदिरांचा विकास आणि येणाऱ्या भाविकांमुळे मंदिरांचे पावित्र्य राखले जाते, असे मत डॉ श्रद्धा यांनी व्यक्त केले.



# नीरेत विद्यार्थ्यांचे ढोल ताशाच्या गजरात जंगी स्वागत




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नीरा :** पुरंदर तालुक्यातील नीरा येथील प्राथमिक , माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा सोमवारी (दि. १६) सुरू झाल्या. यावेळी नीरा येथील विविध शाळांत नवागत विद्यार्थ्यांचे औक्षण , खाऊ, गुलाबपुष्प, पाठ्यपुस्तक व ढोल ताशाच्या गजरात मिरवणुक काढुन जंगी स्वागत करण्यात आले. दरम्यान, दीड महिन्यानंतर नविन शैक्षणिक वर्ष सुरू झाल्याने नीरा व परिसरातील विविध शाळांत विद्यार्थ्याच्या लगबगीने परिसरात उत्साही वातावरण होते.


पुरंदर तालुक्यातील नीरा येथील जि. प. प्राथमिक शाळेत इयत्ता पहिलीमध्ये प्रवेश घेतलेल्या नवागत विद्यार्थ्यांचे डायटच्या संपर्क अधिकारी वैशाली बच्छाव यांच्या हस्ते गुलाबपुष्प, चॉकलेट देऊन व औक्षण करून उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी उपसरपंच राजेश काकडे, ग्रा. पं. सदस्य अनिल चव्हाण, अभिषेक भालेराव, सुभाष पवार, मुख्याध्यापिका संगिता बालगुडे व शिक्षक उपस्थित होते. महात्मा गांधी विद्यालयात पाचवीतील नवागत विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प व पाठ्यपुस्तक देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक अनिल धुमाळ यांच्यासह स्कुल कमिटीचे सदस्य , शिक्षक उपस्थित होते. तर सौ. लिलावती रिखवलाल शहा कन्या शाळेतील पाचवीतील नवागत विद्यार्थीनीचे तसेच दहावीच्या परिक्षेत विशेष गुण मिळविलेल्या तसेच स्पर्धा परीक्षेमध्ये विशेष कामगिरी केलेल्या विद्यार्थिनींचे ढोल ताशाच्या गजरात मिरवणूक काढून हरिपाठाचे पुस्तक, गुलाबपुष्प व पाठ्यपुस्तक देऊन उत्साहात जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापिका निर्मला नायकोडी, ग्रा.पं. सदस्य अनिल चव्हाण, संतोष गांधी, सुनिल चव्हाण, बापुराव पाटोळे, मनोज शहा, अमोल साबळे यांच्यासह शिक्षक उपस्थित होते.

## कुरुळीत नवागतांचा प्रवेशोत्सव उत्साहात



**आळंदी :** शाळेचा पहिला दिवस म्हटलं की नवीन शाळे बाबत उत्सुकता, नवीन वर्ग, नवीन मित्र, नवीन शिक्षक, नवीन पुस्तके शिक्षणाची आवड हे सर्व काही नवीन शैक्षणिक सत्र २०२५-२६ या मध्ये मुलांना अनुभवता आले. यावेळी पुणे जिल्ह्याचे माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी भाऊसाहेब कारेकर यांनी भैरवनाथ माध्यमिक विद्यालयास भेट दिली. यावेळी मार्गदर्शन करताना कारेकर साहेबांनी सांगितले की विद्यार्थ्यांनी सिंहावलोकन करून सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करावे. यानंतर विद्यार्थ्यांचे स्वागत गुलाब पुष्प देऊन केले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षांसाठी तयारी करुन घेण्यात यावी व परीक्षेस बसवण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. शिक्षणाधिकारी यांच्या समवेत पंचायत समितीच्या विस्ताराधिकारी झिंजुरडे मॅडम व पंचायत समितीच्या अधिकारी भांगे मॅडम याही विद्यालयास भेटीसाठी आले होते. याप्रसंगी संस्थेच्या वतीने संस्थापक अध्यक्ष महादेव सोनवणे यांनी पुष्प गुच्छ देऊन स्वागत केले. विद्यालयाची यशोगाथा सांगितली. शाळेच्या स्थापने पासून विद्यायाचा निकाल ९५% पेक्षा आजतागायत की झालेला नाही. यावेळी संस्थेचे अध्यक्ष शांताराम सोनवणे, सचिव देवराम सोनवणे, कार्याध्यक्ष गुलाब सोनवणे, सहसचिव मधुकर नाईक उपस्थित होते. यावेळी विद्यार्थी, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी सुत्र संचलन बाळासाहेब मुळे व आभार विद्यालयाचे मुख्याध्यापक भाऊसाहेब थोरात यांनी मानले.

## आळंदीत नवोगत विद्यार्थ्याचे स्वागत उत्साहात



**आळंदी :** येथील आळंदी नगरपरिषदेच्या शाळा क्रमांक एक ते चार मध्ये शालेय वर्षाचे पहिल्या दिवशी सोमवारी (दि. १६) शालेय स्तरावर मुख्याधिकारी माधव खांडेकर यांचे प्रमुख उपस्थितीत नवागतांचे स्वागत, प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. या प्रसंगी शिक्षण विभागाचे शाळा क्रमांक १ चे १७ शिक्षक व

### मुख्याधिकारी खांडेकर यांनी साधला संवाद

९१ विद्यार्थी, शाळा क्रमांक २ मधील ६ शिक्षक व ३२ विद्यार्थी, शाळा क्रमांक ३ चे ११ शिक्षक व ४३ विद्यार्थी व शाळा क्रमांक ४ चे ११ शिक्षक व ७७ विद्यार्थी पहिल्या दिवशी उपस्थित होते. शिक्षक वृंद व मुख्याध्यापक यांनी उपस्थित राहून नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत केले. विद्यार्थ्यांना आवश्यक सूचना दिल्या. सर्व विद्यार्थ्यांना मुख्याधिकारी माधव खांडेकर यांच्या हस्ते पाठ्य पुस्तक व गणवेश वाटप करण्यात आले. प्रत्येक शाळेत मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी प्रत्यक्ष भेटी देत संवाद साधला. मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी विद्यार्थ्यांना बहुमूल्य असे मार्गदर्शन केले. शिक्षकांना गुणवत्ता वाढवण्यासाठी विविध नावीन्य पूर्ण उपक्रम राबविण्यास सांगितले. शालेय मुलांचे कला गुणांना वाव देण्यास प्रयत्नशील रहाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## गावठी पिस्तूल व काडतुसांसह एकाला अटक



**शिरूर :** शिरूर येथील रामलींग परिसरात गावठी बनावटीची दोन पिस्तुले व सहा जिवंत काडतुसे बाळगणाऱ्या इसमास शिरूर पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने अचूक सापळा रचून अटक केली. सदर कारवाईने परिसरात खळबळ उडाली असून, गुन्हेगारी प्रवृत्तीच्या विरोधात शिरूर पोलिसांनी उचललेले पाऊल उल्लेखनीय ठरत आहे. दि.१५ जून रोजी पोलीस अंमलदार विजय गजानन शिंदे यांना बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, मौजे रामलींग येथील रूद्र टाईल्स दुकानाच्या शेजारी एक इसम गावठी पिस्तूल घेऊन फिरत आहे. ही माहिती पोलिस निरीक्षक श्री. संदेश केंजळे यांच्याकडे देण्यात आली. त्यांनी तात्काळ पोलीस उपनिरीक्षक शुभम चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली पोलीस पथक गठीत करून कारवाईचे आदेश दिले. पथकाने तत्काळ घटनास्थळी जाऊन खात्री करत प्रदीप श्रीकिसन तिवारी (वय ४२, रा. साईनगर, बी जे हाउसींग सोसायटी, शिरूर) याला शिताफीने अटक केली. तपासादरम्यान त्याच्याकडून गावठी बनावटीची दोन पिस्तुले व सहा जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली. यासंदर्भात शिरूर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## शाळांची घंटा वाजली



बारामती बारामती येथील शाळांमध्ये शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ढोल-ताशा वाजवत तसेच गुलाबपुष्प देत विद्यार्थ्यांचे स्वागत केले गेले.

## टेक्निकल विद्यालयात गुलाबपुष्प देऊन स्वागत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** बारामतीच्या अग्रवाल टेक्निकल विद्यालय व ज्युनिअर कॉलेज या विद्यालयात नवीन विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ ची सुरुवात राज्यभर एकाच दिवशी म्हणजे १६ जून पासून झाली. नवीन आलेल्या इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशी पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले.

शैक्षणिक वर्षाची सुरुवात विदर्भ वगळता इतर सर्व विभागांत सोमवारी तर विदर्भात पुढील सोमवारी (दि. २३) पासून होणार आहे.

शाळेची गुणवत्ता वृद्धींगत करण्यासाठी तसेच मुलांची उपस्थिती वाढविण्याकरीता शालेय शिक्षण विभागामार्फत राज्यभर 'शाळा प्रवेशोत्सव' उपक्रम साजरा करण्यात येत आहे.

यावेळी विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन प्राचार्य भगवान भिसे, पर्यवेक्षक अलका चौधर, तसेच उपस्थित सर्व शिक्षकांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. ढोल ताशा वाजवत विद्यार्थ्यांचे स्वागत झाल्याने विद्यार्थी खूप आनंदी होते.

# अखेर शाळा आली रस्त्यावर

## रस्ता नसल्याने जिल्हा परिषद शाळा भरली दत्त मंदिरात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**उरुळी कांचन :** एकीकडे राज्यात विद्यार्थ्यांच्या शाळेतील स्वागतासाठी विविध उपक्रम राबवले जात असताना, कोरेगांव मूळ ग्रामपंचायत हद्दीतील बोधे - काकडे वस्ती परिसरातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला रस्ता नसल्याने शाळा बोधे - काकडे वस्तीतील रस्त्यावरील दत्त मंदिरात शाळा भरवण्यात आली.

जिल्ह्यात सोमवारपासून (ता. १६) शाळा सुरु झाल्या. मात्र, कोरेगाव मूळ (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील बोधे - काकडे वस्ती वरील जिल्हा परिषद शाळेला जायला रस्ता नसल्याने विद्यार्थी शाळेत जाणार का? रस्ता सुरु होणार का? याकडे परिसरातील नागरिकांचे व पालकांचे लक्ष लागले होते. पण शाळेत जायला रस्ता उपलब्ध न झाल्याने शाळेच्या शिक्षकांनी व ग्रामस्थांनी सदरची शाळा मंदिरात भरवली.

कोरेगाव मूळ हद्दीतील बोधे - काकडे वस्ती परिसरातील १९६३ पासून सुरू असलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत व अंगणवाडीत सुमारे ६० ते ६५ मुले शिकत आहेत. या शाळेसाठी खासगी जागेतून रस्ता होता. तो सुमारे ६० वर्षांपासूनचा शाळेच्या वहिवाटीत असलेला रस्ता अचानक जागामालकांनी बंद केला त्यामुळे शिक्षणाची आवड असलेली मुले या भिंतीवरून त्या भिंतीवर उड्या मारून दररोज शाळेत न चुकता येत राहीली.या विद्यार्थ्यांची नेहमीची ही कसरत बघून प्रशासन काही उपाययोजना करणार का? रस्ता उपलब्ध करून देणार का? असा प्रश्न स्थानिक ग्रामस्थ व पालक उपस्थित करत आहेत.

याबाबत बोलताना कोरेगाव मूळच्या ग्राम अधिकारी स्वाती राजगुरू म्हणाल्या, "शाळा सुरु करण्यासाठी तात्पुरत्या स्वरुपात रस्ता करून घ्या अशा सूचना गटविकास अधिकारी शिवाजी नागवे यांनी दिल्या आहेत. त्यानुसार शेजारील शेती मालकाशी चर्चा करून एक महिन्याच्या मुदतीवर रस्ता करून शाळा सुरु करत आहोत." हवेलीचे शिक्षणाधिकारी ज्ञानदेव खोसे म्हणाले, " मी स्वतः आज त्या ठिकाणी जाऊन पाहणी केली. हवेलीचे गटविकास अधिकारी यांच्याकडे ग्रामपंचायतीचा ठराव करून त्याची तक्रार देणार आहोत. तसेच शाळेला रस्ता लवकर मिळावा यासाठी पाठपुरावा करणार आहोत. यावेळी ग्रामपंचायतीचे आजी - माजी सरपंच, सदस्य, पालक उपस्थित होते.

## भैरवनाथ विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी स्कूलबस सेवा



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** नव्या शैक्षणिक वर्षामध्ये सोमवारी (दि. १६) पहिल्या दिवशी दोंदे, ता. खेड येथील भैरवनाथ विद्यालयामध्ये विविध झाडांची रोपे व भेटवस्तू देऊन नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. विशेष बाब म्हणजे यावर्षीपासून विद्यालयाने स्वतंत्र स्कूलबस सेवा सुरु केली असल्याचे मुख्याध्यापिका डॉ. सौ. नंदा भोर यांनी सांगितले. शाळेच्या पहिल्या दिवशी इयत्ता आठवीमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे ढोलताशांच्या गजरात स्वागत करण्यात आले.

यावेळी दोंदे शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष नंदकुमार कोहिनकर, उपाध्यक्ष आनंदराव कदम, सहसचिव भरत उढाणे, संचालक मच्छिंद्र सुकाळे, बाळासाहेब मंडलिक, किसन लगड, प्रवीण मेहेत्रे, माजी उपाध्यक्ष केशवराव बनकर उपस्थित होते. यावेळी झालेल्या कार्यक्रमात इयत्ता दहावीमध्ये पहिल्या पाच क्रमांकात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

दोंदे विद्यालयाची शैक्षणिक गुणवत्ता चांगली असल्याने विविध गावांमधून विद्यार्थी संख्या वाढत आहे. त्यामुळे यावर्षी पासून विद्यालयाच्या वतीने राजगुरुनगर ते दोंदे, रानमळा ते दोंदे, गारगोटवाडी ते दोंदे या मार्गावर स्कूलबस सेवा सुरु करण्यात आली आहे.

या बससेवेचेही यावेळी उद्घाटन झाले. वर्षा कुमठेकर यांनी प्रास्ताविक केले. शोभा भोंगाळे यांनी सूत्रसंचालन केले. रोहिणी कदम यांनी आभार मानले. शिक्षक के. डी. पोखरकर, के. डी. भगत, दत्तात्रय जोशी, चंद्रकांत बो-हाडे, सुदाम निळकंठ, सलीम सय्यद,लक्ष्मण जाधव यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.

## निघोजे येथील शाळा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी :** अनेक अधिकाऱ्यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषदेच्या शाळेत झाले आहे. जिल्हा परिषदेच्या शाळेत गुणवत्ता पूर्ण शिक्षणाची सुविधा उपलब्ध आहे. मी स्वतः जिल्हा परिषदेच्या शाळेचा विद्यार्थी असून पालकांनी आपली मुले जिल्हा परिषदेच्या शाळेत घातली पाहिजेत असे आवाहन पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी केले.

डॉ. पुलकुंडवार यांच्या उपस्थितीत नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी खेड तालुक्यातील निघोजे येथील पुणे जिल्हा परिषद शाळेत उत्साहात शाळा प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, शिक्षणाधिकारी प्राथमिक संजय नाईकडे, गटविकास अधिकारी विशाल शिंदे, गटशिक्षण अधिकारी अमोल जंगले, सरपंच सुनीता येळवंडे आदी मान्यवर उपस्थित होते. या शाळेत पहिल्या वर्गात प्रवेश घेणा-या बालकांना विभागीय आयुक्त डॉ. पुलकुंडवार यांनी बोट धरून शाळेत नेले.

याप्रसंगी विद्यार्थ्यांचे वाजतगाजत स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके, गणवेश, खाऊ, फुगे व फुले देऊन आनंददायी वातावरणात नव्या वर्षाची सुरुवात करण्यात आली. नववी-दहावीच्या वर्गाचे उद्घाटन आणि कंपन्यांचा सामाजिक उत्तरदायित्व निधी (सीएसआर) अंतर्गत किचनशेडचे लोकार्पणही यावेळी करण्यात आले. निघोजे शाळेची एकूण पटसंख्या ८३६ असून, यापुढे मुलींना नववी व दहावीच्या शिक्षणासाठी लांब जाण्याची गरज भासणार नाही. हे शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी जिल्हा परिषदेच्या वतीने जिल्ह्यातील निघोजे, गलांडवाडी व धानोरे या तीन जिल्हा परिषद शाळांमध्ये नववी-दहावीच्या वर्गांना मान्यता दिली आहे. ही बाब महाराष्ट्रात प्रथमच घडली असून, जिल्हा परिषद शाळांमध्ये माध्यमिक शिक्षणाची उपलब्धता वाढवण्यात मोठा टप्पा गाठण्यात आला आहे. ग्रामस्थांनी याबाबत समाधान व्यक्त केले.



# पालखी सोहळ्यासाठी पंचायत समिती खेड आरोग्य विभाग सज्ज




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी :** खेड पंचायत समिती आरोग्य विभाग आळंदीत संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज पायी वारी पालखी सोहळ्यास आलेल्या वारकरी भाविकांचे तसेच नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यास सज्ज झाला आहे. आषाढी यात्रा सोहळा अंतर्गत आरोग्य विषयक प्रतिबंध व उपाय योजना सुविधांसाठी आरोग्य विभागाने जय्यत तयारी पूर्ण केली असल्याची माहिती वैद्यकीय अधिकारी डॉ. इंदिरा पारखे यांनी दिली.

उपसंचालक आरोग्य सेवा डॉ. राधाकिशन पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य कर्मचारी कार्यरत आहेत. आळंदी शहराचे १३ भागांमध्ये विभागणी व भाग निहाय हॉटेल तपासणी, टँकर तपासणी, धर्मशाळा व सर्व पाणी स्रोत यांचे तपासणीसाठी १३ आरोग्य पथके तैनात करण्यात आली आहेत. सार्वजनिक पाणी स्रोतांची तपासणी पूर्ण झालेली असून सर्व स्रोत तपासणी नुसार पिण्यास योग्य आहेत. हिवताप व डेंग्यू यांसारखे आजार होऊ नयेत यासाठी डास अळ्या असलेले पाणी साठे व भांड्यांचा शोध घेऊन ती मोकळी करण्यात येत आहेत. सर्व पिण्याच्या पाण्याचे क्लोरीनेशन करण्यात येत आहे. ब्लिचिंग पावडरचा पुरेसा साठा उपलब्ध करण्यात आला आहे.

पुणे जिल्हा परिषद आरोग्य विभाग यांचे मार्फत आळंदी शहरात एकूण १३ आरोग्य पथके तैनात आहेत. १० पेक्षा अधिक रुग्णवाहिका रुग्णांची ने आण करण्यास सज्ज करण्यात आलेल्या आहेत. आरोग्य विभागा कडून पुरेसा औषध साठा उपलब्ध करण्यात आला आहे. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. विलास माने यांच्या नेतृत्वाखाली वैद्यकीय अधिकारी व सर्व कर्मचारी उत्साहाने माऊलीच्या सेवेसाठी कार्यरत झाले आहेत. थोरवे विहीर येथे देखील विहीर शुद्धीकरण तपासणी करतांना आरोग्य पथक सेवेत होते. येथील आळंदी ग्रामीण रुग्णालय देखील भाविकांच्या आरोग्याची काळजी घेण्यास सज्ज झाले आहे. पुरेशा प्रमाणात औषध साठा, कर्मचारी उपलब्ध असून आरोग्य सेवा भाविकांचे स्वागत तसेच आरोग्य सेवेस सज्ज झाली असल्याचे आरोग्य विभाग अंतर्गत आळंदी ग्रामीण रुग्णालय देखील कार्यरत झाले असल्याचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. उर्मिला शिंदे यांनी सांगितले.

## एकटेपणा कसा घालवू?

मी ३० वर्षांचा तरूण आहे. गेल्या १८ महिन्यांपासून कुवेतमध्ये नोकरी करतोय. आसपास अनेक लोक असले तरी खूप एकटं वाटतं. घरची आठवण येते. लवकरच माझं लग्न होणार आहे. एकटेपणाच्या भावनेमुळे माझ्या नात्यावर परिणाम होत आहे. मी



बरेचदा संशय घेतो. मला खूप लवकर राग येतो. होणाऱ्या बायकोवर खूप प्रेम आहे. तिच्याशी सतत बोलत राहावं असं वाटतं. पण हे शक्य नाही हेही जाणतो. मी तिला स्पेस देत नाही असं वाटतं. याबद्दल अपराधीही वाटतं. मी काय करायला हवं? या मनस्थितीतून कसा बाहेर पडू? मला कोणतंही नातं गमवायचं नाही.

विचारा प्रश्न

**उत्तर :** एकटेपणाने अनेकांच्या आयुष्यात समस्या निर्माण होतात. ताणाच्या काळात मनात संशय निर्माण होतो. असुरक्षिततेची भावना दाटून येते. लग्नात एकमेकांवर विश्वास हवा. एकमेकांप्रती आदर हवा. जबाबदारी, काळजी हवी. स्वत:चा एकटेपणा घालवण्यासाठी आवडत्या गोष्टींसाठी वेळ द्या. छंद जोपासा. स्वत:चं वर्तुळ तयारा. कुटुंब आणि मित्रांसोबत नातं जपा. चांगलं साहित्य वाचा. नियमित व्यायाम करा. कामात व्यग्र राहा. ताण घेऊ नका.

## 'सोशल मीडिया'मुळे तरुणांमध्ये तणाव

आजच्या डिजिटल युगात 'सोशल मीडिया' हा जीवनाचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे. तरुण पिढीचा त्यात तासनतास वाया जात आहे. अभ्यासातून असे दिसून आले आहे, की 'सोशल मीडिया' हे तरुणांमध्ये तणावाचे प्रमुख कारण बनू शकते. लोक सोशल मीडियावर वेळ घालवतात, तेव्हा ते त्यांच्या काम, अभ्यास, मैत्री आणि कौटुंबिक नातेसंबंध यांसारख्या इतर क्रियाकलापांपासून दूर जातात. ही परिस्थिती त्यांना एकाकी बनवते आणि ते मानसिक तणावाचे बळी ठरतात. तरुण स्वतःची तुलना इतरांशी करू लागतात. त्यामुळे त्यांच्यात न्यूनगंड आणि तणाव निर्माण होतो. युवा पिढी रात्री उशिरापर्यंत स्मार्टफोनचा वापर करते. त्यामुळे त्यांची दिनचर्या विस्कळीत होते. रात्री उशिरा झोपल्याने पुरेशी झोप मिळत नाही. त्यामुळे चिडचिड होते. रात्री उशिरापर्यंत फेसबुक, इन्स्टाग्राम आणि व्हॉट्सॲपसारख्या 'सोशल मीडिया'चा वापर केल्याने डोळ्यांमध्ये झोपेसाठी जबाबदार असलेल्या मेलोटोनियम हार्मोनचे उत्सर्जन थांबते.

चर्चेत

'सोशल मीडिया'मुळे आपल्याला सतत काहीतरी चुकत असल्याची जाणीव होत असते. 'फोमो' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या भीतीमुळे मानसिक तणाव आणि चिंता निर्माण होऊ शकते. अनेक वेळा तरुणांना 'सोशल मीडिया'वर ऑनलाइन छळवणूक आणि धमक्यांना सामोरे जावे लागते. त्यामुळे त्यांच्यात मानसिक तणाव निर्माण होतो. आजकाल 'सोशल मीडिया'वर अश्लीलता आणि असभ्यता सामान्य मानली जाते. त्यामुळे तरुणांचा वास्तविक जगाशी संपर्क तुटतो आणि त्यांना सामाजिक एकटेपणा जाणवतो. त्यामुळे तणाव वाढतो. एका दिवसात किंवा आठवड्यात 'सोशल मीडिया'वर किती वेळ घालवायचा




आहे ते ठरवा आणि त्याप्रमाणे वागा. कुटुंब आणि मित्रांसोबत वेळ घालवा. लोक 'सोशल मीडिया'वर त्यांचे आयुष्य सर्वोत्तम आहे, असे दाखवतात. त्यामुळे इतरांशी स्वतःची तुलना करणे टाळा. तुम्हाला त्रास देणाऱ्या बातम्या आणि पोस्ट टाळा.

**डॉ. प्रसन्न नेने**

## क्लासच्या दडपणामुळे मुले मानसिक विकाराची बळी

आजकाल बदलत्या काळानुसार शिक्षणाचे स्वरूपही बदलत चालले आहे. अनेक पालक आपल्या मुलांना लहान वयातच खूप साऱ्या ट्यूशन, 'ग्रुमिंग क्लासेस'ला पाठवतात. त्याचा काही मुलांवर तणाव येतो. मुलांबाबत पालकांनाही अनेक प्रकारचे तणाव असतात. यामध्ये त्यांना चांगले शिक्षण देण्यापासून त्यांना चांगल्या सवयी लावण्यापर्यंत अनेक गोष्टींचा समावेश आहे; परंतु या प्रक्रियेत अनेक वेळा काही पालक लक्ष देत नाहीत किंबहुना देऊ शकत नाही. यामुळे मुलांवर एक वेगळाच दबाव निर्माण होतो. त्यामुळे मुले अनेक प्रकारच्या मानसिक विकारांना बळी पडू शकतात.



बदलत्या काळामुळे लोकांची विचारसरणी, जीवनशैली आणि खाण्याच्या सवयींमध्येही झालेला बदल दिसून येतो; मात्र या बदलामध्ये इतरही अनेक गोष्टींचा समावेश आहे, त्यातील एक म्हणजे शिक्षण व्यवस्था. वाचन आणि लेखनाचा चांगल्या भविष्याशी थेट संबंध आहे; पण यामुळे मुलांवर सुरुवातीपासूनच वेगळ्या प्रकारचे दडपण असते. त्यामुळे विद्यार्थ्यांना अनेक प्रकारच्या मानसिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. लहान वयातच मुलांमधील वाढत्या मानसिक समस्या हा चिंतेचा विषय आहे. बाहेर चाललेली स्पर्धा पाहता विद्यार्थ्यांवर चांगल्या कामगिरीचे वेगळेच दडपण असते. यामुळे त्यांना राग येतो, ती आक्रमक होतात आणि कधी कधी त्यांना आत्मविश्वास कमी वाटू शकतो. त्यामुळे डोकेदुखी, पोटदुखी, निद्रानाश यांसारखी लक्षणेही जाणवू शकतात.

काळजी घ्यावी

काही प्रकरणांमध्ये, या मानसिक समस्या स्वतःला हानी पोहोचवण्याचे कारण बनू शकतात. मूल नेहमी रागावत असेल, लोकांशी पूर्वीपेक्षा कमी संवाद साधत असेल, त्याच्या आहाराकडे लक्ष देत नसेल आणि त्याच्या झोपेच्या पद्धतीत बदल होत असेल तर ही तणाव आणि नैराश्याची लक्षणे आहेत. त्याची वेळीच ओळख करून घेतल्यास त्याला गंभीर परिस्थितीपर्यंत पोहोचण्यापासून रोखू शकतो. वाचन आणि लेखन महत्त्वाचे आहे; परंतु मुलांवर इतका दबाव टाकू नका की ते लहानपणीही तणावाला बळी पडतील. अभ्यासासोबतच घर, शाळा, कोचिंग या सर्व ठिकाणी मुले त्यांच्या समस्यांवर मोकळेपणाने चर्चा करू शकतील, असे वातावरण तयार करा. मुलांना हे स्वातंत्र्य देऊन त्यांना तणाव आणि नैराश्याला बळी पडण्यापासून वाचवू शकता. तसेच त्यांना समजावून सांगा, की शारीरिकदृष्ट्या निरोगी असण्याइतकेच मानसिकदृष्ट्या निरोगी असणेदेखील महत्त्वाचे आहे. यासाठी एखाद्या तज्ज्ञाची मदत घेण्यास अजिबात संकोच करू नका.

**डॉ. अनिल गुंजाळ**

## गर्भाशयाच्या विकाराने चार कोटी महिला त्रस्त


अलीकडेच बॉलिवूड अभिनेत्री शमिता शेट्टीवर 'एंडोमेट्रिओसिस'ची शस्त्रक्रिया झाली. शमिताने स्वत: तिच्या 'सोशल मीडिया' अकाऊंटवर एक व्हिडीओ शेअर करून लोकांना गर्भाशयाच्या या आजाराबाबत सावधगिरी बाळगण्याचा सल्ला दिला. देशात सुमारे चार कोटी वीस लाख स्त्रिया 'एंडोमेट्रिओसिस रोगाने ग्रस्त आहेत; परंतु त्यांना हा रोग वेळेवर ओळखता येत नाही. कारण ते सामान्य वेदना, रक्तस्राव किंवा पेटके म्हणून दुर्लक्ष करतात. नंतर'एंडोमेट्रिओसिस'ची समस्या उद्भवू शकते. 'एंडोमेट्रिओसिस' हा



महिलांच्या गर्भाशयाशी संबंधित आजार आहे. वास्तविक, गर्भाशयाच्या अस्तराला 'एंडोमेट्रियम' म्हणतात. मासिक पाळीच्या दरम्यान महिलांच्या शरीरातून एंडोमेट्रियम बाहेर पडतो; परंतु हे एंडोमेट्रियम अंडाशय, आतडे आणि श्रोणि पोकळीसारख्या ठिकाणी वाढतो. त्यामुळे आतमध्ये रक्तस्राव होतो. रक्तस्राव ट्यूबमध्येच जमा झाल्यामुळे गर्भाशयाशी संबंधित समस्या उद्भवू शकतात आणि गर्भधारणेदरम्यान महिलांना समस्यांना सामोरे जावे लागते. 'एंडोमेट्रिओसिस'मध्ये ओटीपोटाच्या वेदना, मासिक पाळी किंवा ओव्हुलेशन दरम्यान असह्य वेदना, लैंगिक संभोग करताना सौम्य किंवा तीव्र वेदना, लघवीला त्रास, मासिक पाळी दरम्यान जोरदार रक्तस्राव अशा लक्षणाचा समावेश आहे.

व्याधीवेध

'एंडोमेट्रिओसिस'ने पीडित महिलांना सतत थकवा आणि अशक्तपणा जाणवतो. यावर हार्मोनल थेरपी खूप प्रभावी आहे. याशिवाय, 'एंडोमेट्रिओसिस'ची स्थिती वाढल्यास लॅपरोस्कोपी शस्त्रक्रियेद्वारेदेखील तो बरा होऊ शकतो. महिलांनी निरोगी जीवनशैली जगली पाहिजे. त्यात संतुलित आहार, व्यायाम, तणावमुक्त जीवनशैलीचा अवलंब केला पाहिजे, जेणेकरून त्या 'एंडोमेट्रिओसिस'पासून स्वतःचा बचाव करू शकतील. बहुतेक महिलांना या आजाराबद्दल माहिती नसते. ही अनास्था टाळायला हवी.



## चिकन खाण्यामुळे प्रतिकारशक्ती होते कमी

सेंटर फॉर सायन्स अँड एन्व्हायर्नमेंट' (सीएई) च्या प्रयोगशाळेतील संशोधनात असे आढळून आले आहे, की चिकनमध्ये ४० टक्के प्रतिजैविकांचे अवशेष असतात. चिकनमध्ये प्रथिने, जीवनसत्त्वे आणि खनिजे असतात असे मानले जाते; परंतु अलीकडील काही संशोधनात असेही समोर आले आहे, की चिकन खाणाऱ्यांची प्रतिकारशक्ती कमी होऊ शकते. त्यांच्यावर प्रतिजैविकांचाचा प्रभाव खूपच कमी होऊ शकतो.

जाणून घ्या

कोंबड्यांना वेगवेगळ्या रोगांपासून वाचवण्यासाठी किंवा त्यांना लवकर मोठे करण्यासाठी तसेच त्यांचे वजन वाढवण्यासाठी अँटीबायोटिक दिले जाते. मात्र चिकनमधील अँटिबायोटिक्स शरीरात जातात. त्यानंतर त्याची आपल्या शरीराला सवय होते. पण एखादी व्यक्ती आजारी पडते, तेव्हा त्याच्यावर अँटीबायोटिक्स लवकर काम करत नाहीत, त्यासाठी मग त्यांना जास्त डोस दिले जातात. ते शरीरासाठी हानिकारक असू शकतात.



**डॉ. सतीश सोनवणे**

## दुष्परिणाम उंच टाचेच्या चपलांचे

सणवार असो किंवा लग्नसमारंभ किंवा एखादी मिटिंग, महिला उंच टाचेच्या चपलांना प्राधान्य देतात. एखादी तरी उंच टाचेची चप्पल महिलांकडे असते. उंच टाचेच्या चपलांमुळे व्यक्तिमत्त्व खुलत असलं तरी त्याचे बरेच दुष्परिणाम आहेत. हे दुष्परिणाम जाणून घेतले तर उंच टाचेच्या चप्पल घालायचा मोह तुम्ही नक्की टाळाल.

✻ उंच टाचेच्या चप्पल घातल्यानंतर आपण ताठ चालतो. यामुळे पायांची हालचाल नैसर्गिक पद्धतीने होत नाही. यामुळे सगळा भार गुडघ्यांवर येतो. गुडघेदुखी सुरू होते आणि भविष्यात ऑस्टिओआर्थ्रायटिसचा धोका उद्भवतो.

✻ उंच टाचेच्या चपलांमुळे पाठीचं दुखणं मागे लागू शकतं. अशा चपलांमुळे शरीराचं समतोल साधला जात नाही आणि पाठीचा खालचा भाग दुखू लागतो.

✻ दिवसभर उंच टाचेच्या चप्पल घालून फिरल्यानंतर पावलं आणि टाचा दुखू लागतात.

✻ चपलांच्या आकाराचा रक्ताभिसरणाशी जवळचा संबंध असतो. चपलांच्या आकारामुळे नसांना होणाऱ्या



रक्तपुरवठ्यात अडथळे येऊ शकतात. यामुळे डोकेदुखीची समस्या निर्माण होऊ शकते.

✻ आपल्या पावलांचा आकार सर्वसाधारणपणे लांबुळका चौकोनी असतो. दुसरीकडे उंच टाचेच्या चपला निमुळत्या आणि रुंद असतात. यामुळे नखांची वाढ खुंटू शकते. चपलांच्या निमुळत्या आकारामुळे पायांच्या बोटांवर खूप ताण येतो आणि नखं आतल्या भागातच वाढतात.

आपण कुठे चुकतो?

✻ उंच टाचेच्या चप्पल घालण्याची वेळ आली तर पॅडचा वापर करा. यामुळे पायांवरचा ताण कमी होईल.

## कारणं पाठीच्या दुखण्यांची

प्रत्येकालाच कधी ना कधी पाठीचं दुखणं सतावतं. बैठं काम करणाऱ्या लोकांना तसंच व्यायामाचा अभाव असणाऱ्यांना पाठीच्या दुखण्याचा त्रास होतो. हे अत्यंत सर्वसामान्य असं दुखणं आहे. या दुखण्याच्या उगमाबाबत नेमकेपणाने काहीच सांगता येणार नाही. पण पाठीच्या चकत्यांशी संबंधित विकार, स्पायनल आर्थरायटिस तसंच स्नायूंशी संबंधित समस्यांमुळे पाठीचं दुखणं उद्भवू शकतं. यासोबतच पाठीच्या दुखण्याला इतर काही गोष्टी कारणीभूत ठरू शकतात. पाठीच्या दुखण्याची कारणं जाणून घेतली तर तुम्हाला नक्कीच धक्का बसेल. या कारणांबद्दल आपण अनभिज्ञ असतो. पाठीच्या दुखण्याच्या कारणांविषयी जाणून घेऊ या.



✻ पाठीच्या दुखण्याचे तीन प्रकार आहेत. पाठीच्या वरच्या भागाचं दुखणं, खालच्या भागाचं दुखणं आणि मधल्या भागाचं दुखणं.

आरोग्यमंत्र

✻ धूम्रपान करणाऱ्यांना पाठीच्या दुखण्याचा त्रास होऊ शकतो. धूम्रपान करणाऱ्यांच्या पाठीची चकती कमकुवत होते. अनेकांच्या हे लक्षातही येत नाही. वाढत्या वयानुसार पाठीच्या कण्यांमधली चकती कमकुवत होत असली तरी धूम्रपानामुळे या प्रक्रियेचा वेग वाढतो. यामुळे तीव्र स्वरूपाची पाठदुखी होते. सिगारेटमधल्या निकोटिनमुळे पाठीच्या कण्याचं नुकसान होतं.

✻ अतिताण पाठीच्या दुखण्याला कारणीभूत ठरू शकतो. खूप ताण घेतल्याने पाठीच्या स्नायूंवरही ताण येतो. यामुळे पाठीच्या खालच्या भागाचं दुखणं मागे लागू शकतं. कालांतराने हे दुखणं वाढू शकतं.

✻ व्यायामादरम्यान किंवा व्यायामानंतर पाठीचं दुखणं वाढू शकतं. सायकलिंग केल्यानंतर पाठीचं दुखणं वाढतं. यामागे बरीच कारणं असतात. व्यायाम करताना थोडी काळजी घेतली तर ही दुखणी टाळता येऊ शकतात. तसंच शरीर ताणण्याचे व्यायामही करता येतील.

✻ शरीराचं वजन झेलून त्याची योग्य पद्धतीने विभागणी करण्याचं काम पाठीचा कणा करतो. त्याचप्रमाणे त्याची रचना केलेली असते. स्थूलपणामुळे पाठीचं दुखणं उद्भवू शकतो. जास्त वजनामुळे पाठीच्या कण्यावर ताण येतो. शरीराचं अतिरिक्त वजन झेलताना कण्याला जास्त मेहनत करावी लागते. यामुळे पाठीचं दुखणं मागे लागू शकतं.

✻ पायांच्या लांबीत फरक असलेल्या लोकांना पाठीच्या दुखण्याचा त्रास होऊ शकतो. पायाच्या लांबीतला अगदी थोडासा फरकही पाठीच्या दुखण्याला कारणीभूत ठरू शकतो.

✻ पाठीच्या स्नायूंना जोडलेल्या इतर स्नायूंना दुखापत झाली तर पाठीचं दुखणं उद्भवू शकतं. पाठीचा कणा आणि स्नायूंच्या आसपास हे दुखणं पसरत जातं आणि वेदनेची तीव्रता वाढते.

नवसंशोधन

### औषधांचा पुनर्वापर ठरतो धोकादायक!

एखादा आजार पुन्हा उद्भवला तर आपण आधीच्या औषधांचा डोस पुन्हा घेतो. सर्दी-खोकला किंवा इतर काही विकारांची उरलेली औषधं कुटुंबातल्या किंवा कुटुंबाबाहेरच्या सदस्यांना देतो. पण हे चुकीचं आहे. अशा प्रकारे उरलेली औषधं देण्यामुळे औषधांना प्रतिकार करणाऱ्या बॅक्टेरियांची क्षमता वाढते आणि प्रतिजैविकांना प्रतिकार करणाऱ्या जंतूसंसर्गाचं प्रमाण वाढतं, असं एका संशोधनातून समोर आलं आहे. आपली औषधं दुसऱ्या व्यक्तीला दिल्याने संबंधित व्यक्तीचं आरोग्य धोक्यात येतंच शिवाय संपूर्ण समाजाच्या दृष्टीनेही ही कृती धोक्याची असल्याचं तज्ज्ञांचं म्हणणं आहे.



डोळ्यांचं आरोग्य

### कॉन्टॅक्ट लेन्स की बँडेज?

ऑस्ट्रेलियातल्या संशोधकांनी नव्या औषधी कॉन्टॅक्ट लेन्सचा शोध लावला आहे. ही कॉन्टॅक्ट लेन्स डोळ्यांच्या पृष्ठभागावरच्या जखमांवर बँडेजप्रमाणे उपयुक्त ठरू शकते. या संशोधनामुळे डोळ्यांशी संबंधित दुखापती झालेल्या रुग्णांना दिलासा मिळू शकतो. कॉर्निअल अल्सर तसंच इतर काही विकारांमध्ये कॉन्टॅक्ट लेन्सचा हा गुणधर्म उपयुक्त ठरू शकतो. या लेन्सच्या चाचण्या करण्यात येतील. त्यानंतर सर्वसामान्य रुग्णांसाठी या लेन्स उपलब्ध करून देण्यात येतील.



दंतारोग्य

### कॅविटीला कारणीभूत ठरणारे पदार्थ

लहान मुलांना कॅविटी होण्याची शक्यता बरीच जास्त असते. मुलांच्या आहारात गोडाचं प्रमाण जास्त असतं. आईसक्रीम, केक, चॉकलेट असे पदार्थ मुलं खातात. यामुळे दात किडू शकतात. डबाबंद फळांच्या रसात खूप साखर असते. यामुळे दात किडू शकतात. पॉपकॉर्नमुळेही दातांचं आरोग्य बिघडू शकतं. हे पॉपकॉर्न दातांमध्ये अडकून बसतात. त्यात बॅक्टेरियांची वाढ होते आणि कॅविटी निर्माण होतात. ब्रेड आणि पिनट बटरमधली साखरही घातक असते. ताज्या फळांचे रस, मनुका, स्टार्चयुक्त पदार्थ, सॅलाड ड्रेसिंग, मांसाहार यामुळेही मुलांच्या दातांमध्ये कॅविटी होऊ शकतात.



आजीबाईंचा बटवा

### बहुगुणी धने

धन्यांमुळे पदार्थाला छान चव येते. त्याचप्रमाणे धने आरोग्यदायी असतात. धन्यांमध्ये जीवनसत्त्वं आणि खनिजं मुबलक प्रमाणात असतात. वजन कमी करताना धने उपयुक्त ठरतात. धने मिश्रित पाणी नियमित प्यायल्याने वजन कमी व्हायला मदत होते. धन्यांमुळे हार्मोन्सचं संतुलन राखलं जातं. थायरॉइडमध्ये धने खायला हवे. धने रात्रभर पाण्यात भिजवून ठेवावे. दुसऱ्या दिवशी सकाळी हे पाणी प्यावं. यामुळे मधुमेह नियंत्रणात राहतो. धन्यांच्या सेवनामुळे कोलेस्टेरॉल नियंत्रणात राहतं. ॲनिमियावर ते लाभदायी आहेत. तसंच त्वचेलाही यामुळे तजेला मिळतो.





"भारत आणि इंग्लंड यांच्यातीत बहुप्रतीक्षित पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेस २० तारखेपासून सुरुवात होत आहे. यातील पहिलाच सामना लीड्स येथे होणार आहे, तर मॅचेस्टर येथे मालिकेतील चौथा सामना नियोजित आहे. हे दोन्ही सामने जिंकणे भारतासाठी महत्त्वाचे आहे. लीड्स आणि मँचेस्टर येथील सामने जिंकले तर भारताला इंग्लंडविरुद्धची कसोटी मालिका जिंकण्याची अधिक संधी आहे."

— मॅथ्यू हेडन माजी क्रिकेटपटू, ऑस्ट्रेलिया



# प्रीमियर लीग स्पर्धेत सातारा वॉरियर्सचा रत्नागिरी जेट्सवर विजय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या वतीने आयोजित अदानी महाराष्ट्र प्रीमियर लीग(एमपीएल) २०२५ स्पर्धेत आयपीएल स्टार खेळाडू राजवर्धन हंगरगेकर( ३-१४) याने केलेल्या सुरेख गोलंदाजीच्या जोरावर सातारा वॉरियर्स संघाने रत्नागिरी जेट्स संघाचा डकवर्थ लुईस नुसार १४ धावांनी विजय मिळवला.

गहुंजे येथील महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या मैदानावर सुरु असलेल्या या स्पर्धेत सातारा वॉरियर्स संघाने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना रत्नागिरी जेट्स संघाने २० षटकात ९बाद १४६धावाचे आव्हान उभे केले. पॉवरप्लेमध्ये अथर्व धर्माधिकारी(७), धीरज फटांगरे(१२) हे बाद झाल्यामुळे रत्नागिरी जेट्स संघ २बाद ४३ अशा स्थितीत होता. त्यानंतर किरण चोरमलेने अफलातून फटकेबाजी करत ३८ चेंडूत अर्धशतक साजरे केले. किरण चोरमलेने दिव्यांग हिंगणेकरच्या साथीत पाचव्या विकेटसाठी ३४ चेंडूत ४२ धावांची महत्वपूर्ण भागीदारी करून संघाचा डाव सावरला. किरणने ४१चेंडूत ५२ धावांची खेळी केली. त्यात त्याने २चौकार व ३षटकार मारले. दिव्यांग हिंगणेकर १४ धावावर तंबूत परतला. हे दोघेही बाद झाल्यानंतर अभिषेक पवारने १०चेंडूत १चौकार व ३ षटकाराच्या साहाय्याने २५ धावा काढून संघाला १४६धावापर्यंत मजल मारली.

या आव्हानाचा पाठलाग करताना ओम भोसले(७)ला रत्नागिरीच्या प्रदीप दाढेने त्रिफळा बाद केले. त्यानंतर सलामवीर पवन शहाने २२चेंडूत ४५धावांची आक्रमक खेळी केली. त्याने ९चौकार मारले. त्याचे पाच धावांनी अर्धशतक हुकले. पवन व अनिरुद्ध साबळे(१७) यांनी दुसऱ्या विकेटसाठी १९चेंडूत २९ धावांची भागीदारी केली. नवव्या षटकात फिरकीपटू सत्यजीत बच्चावने पवन शहा(४५), सौरभ नवले(०)ला एकापाठोपाठ बाद करून सातारा वॉरियर्सला अडचणीत टाकले. त्यानंतर अनिकेत पोरवाल नाबाद २७धावा,हर्षल काटे नाबाद १६ धावा काढून संघाचा डाव सावरला. सातारा वॉरियर्स संघ १४.४ षटकात ४बाद ११६धावा अशा स्थितीत होता. पाऊस सुरु झाल्यामुळे खेळ थांबवण्यात आला. पावसाच्या व्यत्ययामुळे डकवर्थ लुईस नियमानुसार सातारा वॉरियर्स संघाने १४ धावांनी विजय मिळवला.

## बुद्धीबळ स्पर्धेत खुल्या गटात

# निर्वाण शहा, मुलींच्या गटात भूमिका वाघले यांना विजेतेपद



**पुणे :** पुणे जिल्हा बुद्धिबळ सर्कल यांच्या वतीने आयोजित व एमसीए यांच्या मान्यतेखाली होत असलेल्या एच2इ पॉवर सिस्टीम महाराष्ट्र राज्य 11 वर्षाखालील खुल्या व मुलींच्या गटात फिडे रेटेड निवड बुद्धीबळ स्पर्धेत खुल्या गटात मुंबई शहरच्या निर्वाण शहाने, मुलींच्या गटात संभाजीनगरच्या भूमिका वाघलेने विजेतेपद संपादन केले. कर्वे रोड येथील श्री गणेश सभागृह या ठिकाणी पार पडलेल्या या स्पर्धेत खुल्या गटात पहिल्या पटावरील लढतीत मुंबई शहराच्या निर्वाण शहाने मुंबई उपनगरच्या विहान अग्रवालचा पराभव करून 7.5गुणांसह विजेतेपद पटकावले. मुंबई उपनगरच्या विहान अग्रवालने 7 गुणांसह दुसरे स्थान मिळवले. कोल्हापूरच्या विवान सोनी याने मुंबई शहराच्या रेयांश वेंकटला बरोबरीत रोखले व 7गुण(40.5बुकोल्स कट) सह तिसरा क्रमांक पटकावला.

मुलींच्या गटात संभाजीनगरच्या भूमिका वाघलेने रायगडच्या प्रिशा घोलपला बरोबरीत रोखले व 7 गुणांसह विजेतेपदाचा मान पटकावला. मुंबई शहरच्या त्वेशा जैनने साताऱ्याच्या रेवा चरणकरचा पराभव करून 6.5गुणांसह दुसरे स्थान मिळवले. तर, ठाण्याच्या कार्तिक उत्तराने मुंबई शहराच्या मृण्मयी डावरेचा पराभव करून 6.5गुण व 37.5बुकोल्स कट गुण सरासरीच्या जोरावर तिसरे स्थान पटकावले. स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना करंडक व रोख रकमेची अशी पारितोषिके देण्यात आली. स्पर्धेचे पारितोषिक वितरण आंतरराष्ट्रीय मास्टर प्रथमेश मोकल आणि आबासाहेब गरवारे कॉलेजचे प्राध्यापक डॉ. सुधीर गाडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्पर्धा संचालक प्रकाश कुंटे, चीफ आरबीटर आयए अथर्व गोडबोले आदी मान्यवर उपस्थित होते.

## चौथी पीवायसी रावेतकर फुटबॉललीग स्पर्धा

# ग्लॅडिएटर्सची स्ट्रायकर्सवर मात



**पुणे :** पीवायसी हिंदु जिमखाना तर्फे आयोजित चौथ्या पीवायसी रावेतकर फुटबॉल लीग स्पर्धेत वरिष्ठ गटात साखळी फेरीत सिद्धार्थ भोळे ३२, ३३मि याने नोंदवलेल्या दोन गोलांच्या जोरावर ग्लॅडिएटर्स संघाने स्ट्रायकर्स संघाचा ३-१ असा पराभव करून विजयी सलामी दिली. पीवायसी हिंदू जिमखाना क्लब येथील मैदानावर सुरु असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत सामन्यात पाचव्या मिनिटाला ग्लॅडिएटर्सच्या शक्ती चितळेने गोल करून संघाचे खाते उघडले. पिछाडीवर असलेल्या आघाडीच्या फळीने जोरदार चढाया केल्या, पण ग्लॅडिएटर्स संघाने बचावफळीने थोपवून लावले. पूर्वार्धात ही आघाडी कायम होती.

उत्तरार्धात दोन्ही संघांनी जोरदार खेळ केला. 30व्या मिनिटाला स्ट्रायकर्स च्या विश्व रुकारीने गोल करून संघाला बरोबरी साधून दिली. पण ही आघाडी त्यांना फार काळ टिकवता आली नाही. ग्लॅडिएटर्सच्या सिद्धार्थ भोळे ने गोल करून संघाला 2-1 अशी आघाडी मिळवून दिली. पुढच्याच मिनिटाला ग्लॅडिएटर्सच्या सिद्धार्थ भोळे याने आणखी एक गोल करून संघाला 3-1 अशी भक्कम आघाडी मिळवून दिली. सामन्याच्या शेवटपर्यंत आपली आघाडी कायम ठेवत ग्लॅडिएटर्स संघाने स्ट्रायकर्स संघाचा ३-१ असा पराभव केला.

# स्मृती मानधना नंबर वन! ६ वर्षांनी पुन्हा सिंहासन काबीज

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये भारतीय क्रिकेटपटूंचे वर्चस्व दिसून येत आहे. आता नुकतीच मंगळवारी (१७ जून) आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने ताजी महिला वनडे क्रमवारी जाहीर केली आहे. या क्रमवारी भारताची उपकर्णधार स्मृती मानधनाने मोठी झेप घेतली आहे. मानधनाने अव्वल क्रमांकाचे सिंहासन पुन्हा पटावले आहे.

२७ वर्षीय मानधना महिला वनडे क्रमवारी फलंदाजांच्या यादीत अव्वल क्रमांकावर विराजमान झाली आहे. तिने दक्षिण आफ्रिकेच्या लौरा वोल्वार्डला मागे टाकले आहे. वोल्वार्डने १९ रेटिंग पॉइंट्स गमावले आहेत. त्यामुळे ती दुसऱ्या क्रमांकावर घसरली आहे. तिचे ७१९ पॉइंट्स आहेत. तिच्यासह दुसऱ्या क्रमांकावर ७१९ पॉइंट्ससह इंग्लंडची नतालिया सायव्हर-ब्रंटदेखील आहे. स्मृती मानधनाचे ७२७ रेटिंग पॉइंट्स आहेत.

दरम्यान, वनडे क्रमवारीत अव्वल क्रमांकावर येण्याची मानधनाची ही दुसरी वेळ आहे. यापूर्वी मानधना सर्वातआधी २०१९ मध्ये वनडे क्रमवारीत अव्वल क्रमांकावर आली होती. यानंतर ती सातत्याने पहिल्या १० फलंदाजांमध्ये राहिली. पण २०१९ नंतर ६ वर्षांनी पुन्हा ती अव्वल क्रमांकाची फलंदाज ठरली आहे.

# स्नुकर अजिंक्यपद स्पर्धेत अभिजीत रानाडे, पारस गुप्ता यांच्यामध्ये विजेतेपदासाठी लढत





■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** ब्रिजसँग ट्रेनिंग्ज आणि कॉर्नर पॉकेट्स स्नुकर अॅकॅडमी यांच्या तर्फे आयोजित 'व्हेनकॉब-कॉर्नर पॉकेट करंडक' खुली अखिल भारतीय १०-रेड स्नुकर अजिंक्यपद स्पर्धेत पुण्याच्या अभिजीत रानाडे आणि आग्राच्या पारस गुप्ता यांच्यामध्ये विजेतेपदासाठी लढत होणार आहे.

पुण्यातील कँप भागातील कॉर्नर पॉकेट स्नुकर अॅकॅडमी येथे सुरू असलेल्या या स्पर्धेच्या मुख्य ड्रॉच्या उपांत्य फेरीमध्ये पारस गुप्ता याने कॉर्नर पॉकेट्सच्या पिनाक अनाप याचा सरळ फ्रेममध्ये ५४-३३, ४९-२८, ५९-३८, ४६-२७, ५५-३८ असा पराभव केला. पारस याने सामन्यावर वर्चस्व गाजवताना एकही फ्रेम न गमवताना विजय मिळवला.

चुरशीच्या झालेल्या दुसऱ्या उपांत्य फेरीमध्ये पीवायसी हिंदु जिमखाना क्लबच्या अभिजीत रानाडे याने मध्यप्रदेशच्या इम्रान खान याचा ५-४ असा पराभव केला. सुमारे साडेचार तास सुरू असलेल्या या सामन्यामध्ये अभिजीत याने इम्रान याचा २-४ अशा पिछाडीवरून मात करून अंतिम फेरी गाठली. पहिल्या चार फ्रेमनंतर २-२ अशी बरोबरी सामन्यामध्ये होती. पाचवी आणि सहावी फ्रेम ५२-३१, ५४-२० अशी जिंकून इम्रान याने ४-२ अशी आघाडी घेतली होती. सामना जिंकून अंतिम फेरीमध्ये पोचण्यासाठी त्याला फक्त एक फ्रेम जिंकायची होती. परंतु पिछाडीवरून दबावाखाली उत्तम खेळ करून अभिजीतने ५०-१५, ५०-२१, ६१-४४ अशा सलग तीन फ्रेम जिंकल्या आणि अंतिम फेरी गाठली.

# स्व. चेतन फटाले यांच्या स्मरणार्थ बॉक्सिंग स्पर्धा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पुणे शहर बॉक्सिंग संघटनेच्या मान्यतेने शिवम फाउंडेशन च्या वतीने स्व. चेतन रवींद्र फटाले यांच्या स्मरणार्थ दि. १५ जुन, २०२५ रोजी क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे बॉक्सिंग प्रशिक्षण केंद्र, जनरल अरुण कुमार वैद्य स्टेडियम, पुणे येथे आयोजित २५ वी भव्य जिल्हास्तरीय बॉक्सिंग स्पर्धेचे उद्घाटन श्री जयसिंगराव मोहिते अध्यक्ष शिवम फाउंडेशन. यांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेमध्ये पुणे शहर, पिंपरी चिंचवड व पुणे जिल्ह्यातील १५० खेळाडूंनी सहभाग घेतला होता.

साई बॉक्सिंग क्लब सांगवी चा खेळाडू प्रज्वल सितापुरे ने नेत्रदीपक खेळाचे प्रदर्शन करून स्पर्धेतील "बेस्ट बॉक्सर" पुरस्कार पटकावला. एम.आय जे.एस. बॉक्सिंग क्लब गार्गी तांबे ने "मोस्ट प्रॉमिसिंग बॉक्सर", तर महाराणा प्रताप बॉक्सिंग क्लबच्या प्रितेश राठोड ने "बेस्ट चॅलेंजर" हा बहुमान पटकावला.

स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ

लायन्स क्लब, पुणे शहर चे अध्यक्ष श्री दीपक थोरात ,पुणे शहर बॉक्सिंग संघटनेचे अध्यक्ष मा. नगरसेवक श्री .अविनाश बागवे,रवींद्र फटाले राजेंद्र तांबेकर, राजेश टिकार , शिवम फाउंडेशन चे सचिव सुरज रेणुसे , शिवम फाउंडेशन चे कार्याध्यक्ष स्पर्धेचे मुख्य आयोजक प्रकाश रेणुसे यांच्या शुभहस्ते करण्यात आला.

याप्रसंगी महाराष्ट्र बॉक्सिंग संघटनेचे तांत्रिक अधिकारी भरतकुमार व्हावळ, आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक शहर संघटनेचे सचिव विजय गुजर पुणे जिल्हा बॉक्सिंग संघटनेचे सचिव अभिमन्यू सूर्यवंशी , आंतरराष्ट्रीय ऑफिशियल कॅप्टन सुरेश कदम , आंतरराष्ट्रीय खेळाडू कॅप्टन तुक बहादूर थापा आदी मान्यवर उपस्थित होते.

या स्पर्धेत पुणे शहराचे ROC कमिशन चेअरमन सुरेश गायकवाड, महाराष्ट्र टेक्निकल ऑफिसर अशोक मेमजादे, डॉ. राहुल पाटील, जीवन निंदाने, असिफ शेख, रॉबर्ट दास, उमेश जगदाळे, प्रदीप वाघे, कुणाल पालकर, शकील शेख ई. पंचांनी स्पर्धेचे आयोजनात मोलाची कामगिरी केली. कार्यक्रमचे सूत्रसंचालन राष्ट्रीय पंच ऋषीकांत वचकल यांनी केला

# बॅडमिंटन स्पर्धेत निवेथा एम, तनिष्का देशपांडे, बावधाराणी जेआर, अश्मिता चलीहा यांचा मुख्य फेरीत प्रवेश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क





**पुणे :** पुणे जिल्हा मेट्रोपॉलिटन बॅडमिंटन संघटना(पीडीएमबीए) यांच्या वतीने आयोजित बीएआय आणि एमबीए यांच्या मान्यतेखाली होत असलेल्या व्ही.व्ही.नातु स्मृती करंडक योनेक्स सनराईज अखिल भारतीय वरिष्ठ मानांकन बॅडमिंटन स्पर्धेत महिला गटात निवेथा एम, तनिष्का देशपांडे, बावधाराणी जेआर, अश्मिता चलीहा यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून मुख्य फेरीत प्रवेश केला.

पी.ई.सोसायटीज मॉडर्न पीडीएमबीए स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, शिवाजीनगर व पीवायसी हिंदू जिमखाना येथील बॅडमिंटन हॉलमध्ये सुरू असलेल्या या स्पर्धेत अंतिम पात्रता फेरीत महिला गटात अव्वल मानांकित क्रिशिका महाजनने प्रणाली वाडकरचा 15-07, 13-15, 15-11 असा पराभव केला.शेणन क्रिस्टीयन याने दुसऱ्या मानांकित रक्षा कांदस्वामीचा 05-15, 15-13, 15-12 असा तीन गेममध्ये संघर्षपूर्ण पराभव केला.

चौथ्या मानांकित तनिष्का देशपांडेने अनेरी कोटकचा 15-07, 15-05 असा तर, पाचव्या मानांकित मेघना रेड्डी एमने किया चांदणीचा 15-12, 15-12 असा पराभव करून मुख्य फेरी गाठली. निवेथा एमने नेहा कोसाराजूवर 12-15, 15-04, 15-11 असा विजय मिळवला.बावधाराणी जेआर हिने जिज्ञासा चौधरीचे आव्हान 15-07, 11-15, 15-08 असे मोडीत काढले. अश्मिता चलीहाने आशी रावतला 15-11, 12-15, 15-11 असे नमविले.

## शिवशक्ती महिला संघ आयोजित सुरू असलेली पहीली युवा महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा

# मुलींमध्ये ठाणेशहर पुणे ग्रामीण आणि लातूर यांची बादफेरीकडे आगेकूच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** म्हाळुंगे बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुल येथे शिवशक्ती महिला संघ आयोजित सुरू असलेल्या १ ली युवा महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेच्या तिसऱ्या दिवशी मुलांमध्ये रायगड, पालघर, पिंपरी चिंचवड व मुलींमध्ये ठाणेशहर पुणे ग्रामीण आणि लातुर य़ांची बादफेरीकडे आगेकुच केली आहे. सायंकाळच्या सत्रात मुलांच्या रायगड संघाने सोलापूर संघावर ४०-३० अशी मात करीत विजय मिळविला. मद्यंतराला रायगड संघाकडे २३-१४ अशी आघाडी होती. रायगड संघाच्या यतीन घरत, सार्थ सातमकर यांनी जोरदार चढाया करीत विजय साकारला. यश वाघवले यांनी पकडी घेतल्या. सोलापूरच्या रोमेश जाधव व संग्रामसिंग सारक यांनी चांगल्या चढाया केल्या तर आदर्श गायकवाड यांनी पकडी घेतल्या. पालघर संघाने जालना संघावर ४९-३८ असा विजय मिळविला. मद्यंतराला पालघर संघाकडे १७-१६ अशी निसटती आघाडी होती. पालघर संघाच्या करण रामगडे, जित मारडे यांनी जोरदार हल्ला चढवित जालना संघाचा बचाव मोडून काढला. समवेद पाटील याने चांगल्या पकडी केल्या. जालन्याच्या रितेश अडे यांनी एकाकी लढत दिली. तर युवराज राठ़ोड याने पकडी घेतल्या.

पिंपरी चिंचवड व पुणे शहर संघ यांच्यात झालेला अटीतटीचा सामना ४७-४७ असा समान गुण संख्येवर संपला. त्यामुळे त्यांना साखळी १-१ गुण मिळाला. मद्यंतराला पिंपरी चिंचवड संघाकडे ३२-२० अशी आघाडी होती. पिंपरी चिंचवडच्या पार्थ चाजड, श्लोक वडेवालकर यांनी आक्रमक चढाया केल्या. याशीर सुतार यांनी पकडी घेतल्या. पुणे शहर संघाच्या विशाल गाढवे व अथर्व सोनावणे यांनी चांगला प्रतिकार केला. तर यश पवार याने पकडी घेत चांगली साथ दिली.

मुलांचे इतर झालेले सामने- रत्नागिरी वि.वि. नांदेड (४०-२९), मुंबई उपनगर पूर्व वि.वि. सिंधुदुर्ग(५०-२३), नाशिक शहर वि.वि. हिंगोली(३९-१८),

मुलींमध्ये ठाणे शहर व सांगली यांच्यात अत्यंत अटीतटीच्या झालेल्या सामन्यात ठाणे शहर संघाने सांगली संघावर २७-२५ असा निसटता विजय मिळविला. मद्यंतराला ठाणे शहर संघाकडे १६-१० अशी आघाडी होती. ठाणे शहरच्या आरती शेळके हिने चौफेर आक्रमण करीत आपल्या संघाला विजय मिळवून दिला. तर जान्हवी पार्टे हिने पकडी घेत सुरेख साथ दिली. सांगलीच्या सनी कोळी हिने चांगल्या चढाया केल्या तर तबसुम पठाण हिने पकडी घेतल्या.

पुणे ग्रामीण संघाने अहमदनगर संगावर ३८-३३ अशी मात करीत आपली विजय मिळविला. मद्यंतराला पुणे ग्रामीण संघाकडे २३-२० अशी आघाडी होती. पुणे ग्रामीणच्या वर्षा बनसुडे व सानिका वासके यांनी चांगल्या चढाया करीत आपल्या संघाला विजय मिळवून दिला. सई शिंदे हिने पकडी घेतल्या. अहमदनगरच्या फौजीया शेख व ज्ञानेश्वरी धवन यांनी जोरदार प्रतिकार केला मात्र त्यांना मात्र त्यांना यश मिळाले नाही. श्रेया अडसुळ हिने पकडी घेतल्या.

#रा